शब्द रुची

५१

ग्रंथाली

जानेवारी–मार्च २०२६ । मूल्य १० रुपये

जन्मशताब्दी...

नारायण सुर्वे



भाऊ पाध्ये

मुंबई जिल्हा साहित्य संमेलन.... क्षणचित्रे





ग्रंथाली वाचक चळवळीची त्रैमासिक पुस्तिका

शब्द रुची

जानेवारी–मार्च २०२६
त्रैमासिक पुस्तिका चौथी, मूल्य १० रु.

संपादक : **अरुण जोशी**
मुखपृष्ठ आणि कविताचित्रे : **सरदार जाधव**

कार्यालयीन संपर्क
ग्रंथाली संगणक विभाग
shabdruchee24@gmail.com
जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप
वेबसाइट डिझाइन व डिजिटल एडिटिंग – समीर कदम

संपर्क
ग्रंथाली, १०१, १/बी विंग, 'द नेस्ट', पिंपळेश्वर को-ऑप. हौसिंग सोसायटी, टायकलवाडी, स्टार सिटी सिनेमासमोर, मनोरमा नगरकर मार्ग, माहीम (प.), मुंबई ४०००१६
फोन : २४२१६०५० **(वेळ : दुपारी १ ते ६.३०)**

अंकासाठी लेख व प्रतिक्रिया खालील मेलवर पाठवावी.
shabdruchee24@gmail.com

ऑफिस वेळ : दुपारी १ ते सायं. ७
संपर्क/फोन/पुस्तके खरेदी करण्यासाठी

अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.

अनुक्रम

साहित्य संमेलनांचा समाजावरील प्रभाव / ५
रणधीर शिंदे

माणसं वाचायला शिकवणारा माणूस / १०
डॉ. नेहा सावंत

२०२५ मध्ये भाऊ पाध्येची 'वासूनाका' वाचताना... / १४
प्रा. डॉ. अविनाश कोल्हे

उत्तुंग पर्व / १९
अपर्णा पाटील

सदाबहार उत्साहाचा खळखळता प्रवाह...! / २४
शांताराम पंदेरे

एडिंबर्ग बुक फेस्टिव्हल / २७
नंदन जोशी

विदुषी इरावती कर्वे / ३१
संजीवनी खेर

कविता
अफजर / ३४
नीलकंठ कदम
मुक्ती / ३५
सुचिता खल्लाळ

जागतिक साहित्याची ओळख घडवणारं पुस्तक / ३६
मुकेश थळी

वृत्तांत / ३९

ग्रंथपाने / ४७ ते ५०

पुढल्या वर्षी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे शताब्दी वर्ष आहे. संमेलन आणि वाद हे अनेक वर्षांपासून घडत आले आहे. तरी जिथे लेखक, कवी यांचे प्रत्यक्ष दर्शन होते, त्यांचे विचार ऐकता येतात, सर्व प्रकारचे साहित्य पाहता-विकत घेता येते... अशी समाजाला विचारसमृद्ध करणारी संमेलने, निखळ मनोरंजन करणारी संमेलने वादाच्या पलीकडे अनुभवावीशी वाटत असत, असा एक काळ होता. गेल्या काही वर्षांतले चित्र पाहता, या संमेलनांचा मराठी समाजावर काय प्रभाव होता आणि आता काय आहे, हा महत्त्वाचा विषय आहे. रणधीर शिंदे यांनी त्यावरची निरीक्षणे या अंकात मांडली आहेत.

कामगारजगताशी नाळ आणि साहित्यातील बंडखोरी हे समान घटक असलेल्या नारायण सुर्वे आणि भाऊ (प्रभाकर) पाध्ये यांचे हे जन्मशताब्दी वर्ष. त्यांच्या साहित्य आणि व्यक्तित्वाचा वेध अनुक्रमे डॉ. नेहा सावंत आणि प्रा. डॉ. अविनाश कोल्हे यांनी घेतला आहे. तर संजीवनी खेर यांनी विदुषी इरावती कर्वे यांच्याविषयी 'ग्लोकल लेखिका'मध्ये लिहिले आहे.

सामाजिक चळवळीतील तीन अग्रणी काळाच्या पडद्याआड गेले. कामगार, कष्टकरी, तळच्या समाजासाठी आयुष्य वेचले त्या पन्नालाल सुराणा, डॉ. बाबा आढाव आणि आनंद करंदीकर यांचे निधन क्लेशकारक आहे. या अंकात आनंद करंदीकर यांचे सहकारी शांताराम पंदेरे यांनी त्यांच्या आठवणी जागवल्या आहेत. कन्नड साहित्यिक भैरप्पा यांच्या निधनाने एक अभिजात लेखक हरपला आहे. त्यांची जवळपास बावीस पुस्तके मराठीत अनुवादित झाली. त्यांनी आपल्याला विचारसमृद्ध केले. त्यांच्या कथानकामागील कौटुंबिक पार्श्वभूमीचा धागा उलगडण्याचा प्रयत्न अपर्णा पाटील यांनी केला आहे.

या वर्षीही आयोजित केलेल्या दिवाळी अंक संच योजना आणि त्यानिमित्त दिवाळीसंध्या कार्यक्रमांना प्रतिसाद चांगला होता, मात्र दिवाळी अंक वाचक कमी होत आहे, हे निरीक्षण एकूण साहित्याच्या वाचनाप्रमाणेच झालेले दिसते. सरकार मेहेरबान होऊन अनेक प्रकारची संमेलने भरवण्यास सढळ हस्ते निधी वाटत आहे, जेवणावळी उठत आहेत, मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे, तरी साहित्य संमेलनांना प्रेक्षक, श्रोता, रसिक वाचक रोडावत का आहे, याचा विचार व्हायला हवा. ग्रंथालीने वाचनप्रसाराची चळवळ उभारून जे वातावरण निर्माण केले तशा पुन्हा सर्व प्रकाशकांनी एकत्रित राज्यव्यापी ग्रंथयात्रा योजल्या, त्यातून नवलेखक जोडले, नवकलाकारांना व्यासपीठ दिले आणि तरुणांचा सहभाग वाढण्यासाठी प्रोत्साहनात्मक काही योजले तर, एक घुसळण होऊन काहीतरी नवनीत निघेल.

ग्रंथालीला मुंबईत जिल्हा साहित्य संमेलन करण्याची संधी मिळाली. शासनाचा मराठी भाषा विभाग व महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांच्या अनुदानातून हे संमेलन आयोजित केले गेले. त्याला चांगला प्रतिसाद होता. २५ डिसेंबर या ग्रंथालीचा वाचकदिनी प्रसिद्ध कथा-कादंबरीकार रंगनाथ पठारे यांची मुलाखत लेखक-संशोधक नीतीन रिंढे घेणार आहेत. तसेच, ग्रंथालीने या वर्षी मराठी वाचनानुकूल वातावरण नव्याने रुजावे, वाचनप्रसार व्हावा या उद्देशाने मुंबईबाहेर वाचकदिन साजरा करण्यासाठी साहित्यप्रेमी संस्थांना अनुदान देण्याचे योजले. त्यानुसार मराठी ग्रंथसंग्रहालय, ठाणे आणि वसई-विरार येथे वाचकदिन साजरे झाले. प्रा. माणिकराव कीर्तने वाचनालय, वाशी यांच्या सहकार्याने वाचकदिन होणार आहे. त्रैमासिक केल्याने पुढील अंक एप्रिल-जूनचा असेल. त्यामुळे या कार्यक्रमांचे वृत्तांत स्वतंत्र प्रसिद्ध करू.

आता व्यक्तिगत स्पेस वगैरे तंत्र वाढलं आहे. जे घराघरात तेच समाजात. विविध संघटनाही आपापल्यापुरत्या विचार करतात. त्या साऱ्यांच्याही पुढे जनसहभाग हा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यासाठी स्त्रीमुक्ती संघटनेच्या संस्थापक-सदस्य शारदा साठे म्हणतात, एकमेका साहाय्य करण्यासाठी सर्वांनी एकत्र आलं पाहिजे. या चळवळीलाही नुकतीच पन्नास वर्षं झाली. त्यांचा विचार केवळ एकमेकांच्या कार्यक्रमांपुरता मर्यादित नाही, त्यापुढे जाऊन त्यांना वाटतं, आपल्याला वास्तू, कार्यकर्ते एकमेकांसाठी उपलब्ध करायला हवे. सामाजिक एकसंधता, समाजभान आणि समाजस्वास्थ्य यासाठी खरेच आज त्यांच्या आवाहनाचा विचार व्हायला हवा.

नववर्षाच्या शुभेच्छा.

– अरुण जोशी

रणधीर शिंदे

साहित्य संमेलनांचा समाजावरील प्रभाव

साहित्य संमेलन ही मराठी समाजाची खास अशी ओळख आहे. साहित्य संमेलनाचे ठिकाण ठरले, की संमेलनविषयक चर्चांनी अवकाश व्यापला जातो. ठिकाण ठरवण्यापासून अध्यक्ष निवडणूक ते कार्यक्रमपत्रिकांपर्यंतची रंगतदार चर्चा घडते. इसवी सन १८७८ साली. न्या. महादेव गोविंद रानडे यांनी या साहित्य संमेलनाची मुहूर्तमेढ रोवली. आरंभकाळात हे संमेलन 'महाराष्ट्र साहित्य संमेलन' म्हणून ओळखले जायचे. पुढे ते 'अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन' म्हणून ओळखले जाऊ लागले. विकीर्ण स्वरूपाच्या या संमेलनास अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळामुळे एकछत्रत्व प्राप्त झाले.

अखिल भारतीय साहित्य संमेलनाच्या नकारात्म बाजूही मोठ्या प्रमाणात आहेत. अध्यक्षीय निवडणूक प्रक्रिया, संमेलनातील वाद, संमेलनांचा एकरंगीपणा, ठराविकांचे संमेलन, संमेलनातील मानापमान, रटाळ भाषणे, परिसंवादांचे तेच ते विषय, पराकोटीचा राजकीय हस्तक्षेप असे अनेक विषय संमेलनप्रक्रियेत आहेत. या नकारात्मक बाजू असल्या तरी संमेलनांचा मराठी समाजावर काहीएक प्रभाव पडलेला आहे. संमेलने साहित्यसंस्कृतीतील महत्त्वाचा घटक मानला जातो. महाराष्ट्रात भारतीय पातळीवर अशा प्रकारची संमेलनसंस्कृती रुजली, वाढली, हे मराठी समाजाचे वैशिष्ट्य आहे.

साहित्य संमेलनसंस्कृतीवर काही पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्यामधूनदेखील साहित्य संमेलनातील बदलाचे, परिवर्तनाचे स्वरूप लक्षात येते. कौतिकराव ठाले-पाटील यांच्या 'संमेलनांच्या मांडवाखालून' तसेच 'अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन : संकल्पनेतील परिवर्तन' या लेखात ('मराठी भाषक आणि वाङ्मयीन संस्कृती') संमेलनातील परिवर्तनाच्या नोंदी आहेत. भीमराव कुलकर्णी यांचे 'साहित्य संमेलनांचे महाभारत' हा ग्रंथ प्रकाशित आहे. या ग्रंथात संमेलनांच्या रोचक, रंजक, सुरस आणि चमत्कारिक कथा आहेत. 'साहित्य संमेलने आणि साहित्यिक प्रश्न' (दु.का. संत), 'मराठी साहित्य संमेलने - अध्यक्षीय भाषणे' (भीमराव कुलकर्णी), 'शतकाची विचारशैली : खंड १ ते ३' (रमेश धोंगडे), 'एका संमेलनाध्याक्षाची डायरी' (लक्ष्मीकांत देशमुख) व 'एका स्वागताध्यक्षाची डायरी' (उत्तम कांबळे) हे काही या विषयावरील ग्रंथ.

हैदराबाद येथील १९३१मधील साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात, श्रीधर व्यंकटेश केतकर यांनी म्हटले होते, 'साहित्य संमेलन हे मराठी भाषेत वाङ्मय उत्पन्न करणाऱ्या लोकांचे संमेलन आहे.' तर महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी, संमेलनाचा 'शारदादेवीची फिरती यात्रा' असा उल्लेख केला होता. एकेकाळी या संमेलनात सर्वस्तरीय लोकांचा सहभाग असे.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा 'मराठी समाजावरील प्रभाव' हा विविधस्वरूपी आहे. आजच्या साहित्य संमेलनाचे स्वरूप काळानुरूप बदलत आले आहे. १९०९ च्या बडोदा साहित्य संमेलनात स्त्रियांचा सहभाग होता. काशीबाई कानिटकर यांचे 'वाङ्मयात स्त्रियांचे हातून भर का पडत नाही?' व काशीबाई हेरलेकर यांचे 'स्त्रिया व वाङ्मय' या विषयावर भाषण झाले होते. स्त्रियांना बसण्यासाठी पडदपोशीची व्यवस्था करण्यात आली होती. मात्र पुढे बराच काळ स्त्रियांचा सहभाग कमी झालेला दिसतो.

रानडे यांनी साहित्य संमेलनास आरंभ केला, त्यावेळीदेखील विचारभिन्नतेच्या दृष्टीने मतभेदास सुरुवात झाली. या संमेलनास महात्मा फुले यांना आमंत्रण दिले होते; मात्र ते उपस्थित राहिले नाहीत व त्याचा निषेध म्हणून महात्मा फुले यांनी 'ग्रंथकार संमेलनास' पत्र लिहिले. हे संमेलन 'घालमोड्या दादाचे संमेलन' म्हणून निषेध केला. यावरूनदेखील संमेलनाचे महत्त्व व समाजावरील प्रभाव लक्षात येतो. अखिल भारतीय साहित्य संमेलनात सर्वांनाच संधी मिळते असे नव्हे. या दाबातून पर्यायी साहित्य संमेलने उदयास आली.

एक प्रकारे ही बाब अखिल भारतीय संमेलनाच्या प्रतिक्रियेतून निर्माण झाली.

साहित्य संमेलनांत पूर्वी मान्यवर व्यक्तींचा सहभाग असे. बडोदा व नागपूर येथील साहित्य संमेलनांत, शाखा परिसंवादाचे अध्यक्ष महर्षी विठ्ठल रामजी शिंदे होते. त्यांनी तत्त्वज्ञान, समाजशास्त्र व साहित्य यासंबंधी मूलभूत विचार मांडला होता. डॉ. रा.गो. भांडारकर, भास्करराव जाधव, माधवराव बागल, श्रीकृष्ण अर्जुन केळुसकर अशी व इतरही अनेक मंडळी संमेलनांत सहभागी होत असत.

ग्रंथसंस्कृती विषयाला उत्तेजन

या साहित्य संमेलनाचा महत्त्वाचा उद्देश हा ग्रंथसंस्कृतीच्या संवर्धनाचा व प्रसाराचा होता. त्यामुळे आरंभीच्या अनेक संमेलनांत अध्यक्षीय भाषणांत, वाङ्मयप्रकारनिहाय वाङ्मयस्वरूपाचे आढावे आहेत. साहित्य संमेलनात 'ग्रंथप्रदर्शन' हा मुख्य भाग होता. १९०९च्या संमेलनात काशीबाई हेरलेकर यांच्या भाषणात, 'ग्रंथकार बंधूंनो' असे संबोधन आहे. पहिल्याच संमेलनात, 'ग्रंथकारांस उत्तेजन देऊन, ग्रंथ प्रसिद्ध करून स्वल्पदराने विकण्यात परोपरकार होतो व लोकांचे ज्ञान वाढते,' असे हेतुकथन आहे. साहित्य संमेलनात ग्रंथविक्री मोठ्या प्रमाणावर होते. मुळात संमेलनाचे नाव 'ग्रंथकार संमेलन' होते. संमेलनात अनेक प्रकाशनांचे 'पुस्तक विक्री' स्टॉल असतात. एका अर्थाने ग्रंथप्रसाराचेच हे काम आहे. अनेक संमेलनांत मोठ्या प्रमाणावर ग्रंथविक्री झाली. संमेलनात दूरवरच्या कोपऱ्यातील प्रकाशकांचे ग्रंथ मिळतात, ही एक उपलब्धी मानली जाते. लेखक, प्रकाशक व वाचक यांच्या दृष्टीने हे संमेलन मोठे उपयुक्त ठरले आहे.

साहित्य संमेलनाचे अखिल भारतीयत्व

साहित्य संमेलनाच्या आयोजनात आरंभकाळापासून भारतीयत्वाची जाण होती. त्यावेळी भाषावार प्रांतरचनाही नव्हती. त्यामुळे ही संमेलने भारताच्या विविध भागांत भरली. महाराष्ट्राच्या सीमा ओलांडून अन्य प्रदेशांत साहित्य संमेलने भरवण्यात आली. दिल्ली येथे दोन, इंदोर येथे दोन; ग्वाल्हेर येथे एक (मध्यप्रदेश : ०३), मडगाव (गोवा), बेळगाव (कर्नाटक : ०३), हैदराबाद (आंध्रप्रदेश : ०२), बडोदा (गुजरात : ०३), कारवार (गोवा), अहमदाबाद (गुजरात), भोपाळ (मध्यप्रदेश), रायपूर (छत्तीसगड), पणजी (गोवा), घुमान (पंजाब) येथे ही संमेलने झाली. साहित्य संमेलनांत कलकत्ता (कोलकाता), म्हैसूर, काशी, कराची, लाहोर, मद्रास (चेन्नई), धार, राजपुताना प्रदेशातील सभासद सहभागी होत. संमेलनांस अखिल भारतीय प्रतिनिधी हजर असत. आजही बृहन्महाराष्ट्रातील साहित्य परिषदा व त्यांच्या प्रतिनिधींना जोडून घेण्याचे काम या संमेलनांतून होते. १९०९च्या बडोदा साहित्य संमेलनात अखिल भारतीय साहित्य परिषदेचा मसुदा सादर करण्यात आला होता. अखिल भारतीय साहित्य संमेलनांस उद्घाटक म्हणून श्रेष्ठ भारतीय लेखकांना आमंत्रित करण्याची चांगली प्रथा पडली. अहमदनगर येथे गिरीश कर्नाड, परभणी येथे अशोक बाजपेयी, सातारा येथे सुभाष मुखोपाध्याय, बार्शी येथे शिवराम कारंत, नागपूर येथे नामवरसिंह यांना आमंत्रित करण्यात आले होते. कराडच्या (२००३) उद्घाटनपर भाषणात ज्येष्ठ भारतीय लेखक, अनुवादक व माजी पंतप्रधान पी. व्ही. नरसिंह राव यांचे भाषण व्यासंगी आणि मर्मज्ञ होते. भारतीय साहित्याच्या देवाण-घेवाणीचा एक भाग अशा दृष्टीमध्ये आहे.

अध्यक्षीय भाषणे : मराठी विचार व संस्कृतिविश्वाचे दर्शन

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनांतील अध्यक्षीय भाषणे हा वाचक-रसिकांचा आकर्षणाचा व जिव्हाळ्याचा विषय राहिला आहे. कारण संमेलनांचे अध्यक्षस्थान नामवंत व्यक्तींनी भूषवले आहे. ज्ञान व संस्कृतीच्या व्यवहाराचे नेतृत्व म्हणून या स्थानाकडे पाहिले जाते. अध्यक्षीय भाषणे हा साहित्यरसिक, वाचक व वाङ्मयव्यवहाराचा उत्सुकतेचा विषय असतो. या अध्यक्षीय भाषणात त्या त्या लेखकांच्या जडणघडणीचा, विचारविश्वाचा, वाङ्मयीन प्रदेशाच्या व मराठी भाषा-साहित्यपरंपरेचा धांडोळा आहे. मराठी विचारविश्व व वाङ्मयविश्वाचे प्रतिबिंब यात आहे. अध्यक्षीय भाषणांमधून काही नव्या गोष्टींचा प्रभाव पडला. काही अध्यक्षीय भाषणे गाजली. न.चिं. केळकर यांनी 'सविकल्प समाधी'सारखा विचार अध्यक्षीय भाषणात मांडला. अध्यक्षीय भाषण परंपरेत दोन राजांनी केलेली भाषणे फार विचारशील आहेत. १९३२च्या कोल्हापूर संमेलनात महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी मौलिक विचार मांडला आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात महात्मा फुले यांच्या कार्याची पुसटशीही दखल घेतली जात नव्हती. मात्र सयाजीराव गायकवाड यांच्या भाषणात, महात्मा फुले यांच्या वाङ्मयाचा 'समतावादी निबंध' असा रास्त गौरव आहे. त्यांनी मराठी वाङ्मयाच्या वर्गीय मर्यादांची नोंद करून मराठी वाङ्मयात स्थानिक चित्रण व वैशिष्ट्य नसते याच्याबद्दल खंत व्यक्त केली होती. तर 'सबंध तीनशे मैलांचा समुद्रकिनारा महाराष्ट्राच्या कडेला असून मच्छीमाराविषयी किंवा दर्यावर्दीपणासंबंधी एकही मराठी पुस्तक नसावे,' याचे त्यांना आश्चर्य वाटले होते. त्याचप्रमाणे १९३५च्या इंदोर साहित्य संमेलनाचे अध्यक्ष भवानराव पंतप्रतिनिधी यांचे भाषण फार प्रागतिक दृष्टीचे आहे. त्यांच्या भाषणात ग्रंथनिर्मिती, महाराष्ट्राची वाटचाल व आंतरविद्याशाखा या दृष्टीने विचार नोंदवले आहेत. त्यांच्या आंतरविद्यादृष्टीत व्यायाम, आहार, चित्रकला, मूर्तिकला, रंगवल्लिकला, नृत्यशास्त्र, संगीत, वास्तुविद्या, वनस्पतीविद्या, नाट्यशास्त्र, शेतीशास्त्र याविषयक ग्रंथांचा

समावेश आहे. अशा प्रकारची ग्रंथनिर्मिती व्हावी असे त्यांना वाटत होते.

कराड संमेलनावर आणीबाणीच्या काळाची गडद सावली होती. या संमेलनातील दुर्गा भागवत यांचे अध्यक्षीय भाषण गाजले. त्यांनी आणीबाणीचा जाहीर निषेध केला. निर्भीड रणरागिणी म्हणून त्यांचे भाषण ऐतिहासिक ठरले. त्यांच्या धैर्याचे स्वागत झाले. या संमेलनानंतर विद्याधर पुंडलीक यांनी असे उद्गार काढले, की 'आमचे वाडवडील आम्हाला सुरतेची काँग्रेस पाहिली म्हणून सांगायचे. आम्ही आमच्या पोरांना कऱ्हाडचे संमेलन पाहिले म्हणून सांगू.' या त्यांच्या उद्गारातून या संमेलनाचे महत्त्व कळते. या अर्थाने संमेलनातील अध्यक्षीय भाषणांचा प्रभाव मोठ्या प्रमाणात आहे. बाळासाहेब ठाकरे यांच्या विरोधात पु.ल. देशपांडे व वसंत बापट हे बोलण्याचे धाडस करू शकले. सत्तेविरुद्ध व त्यांच्या कार्यपद्धतीवर टीका अनेक अध्यक्षांनी केली आहे.

लेखक-कवी-समीक्षकांनी गजबजलेली संमेलने

संमेलनाध्यक्ष व लेखक-कवींना भेटणे हा संमेलनातील वाचकांचा आनंदाचा ठेवा आहे. पूर्वी तो जास्त होता. लेखकांना पाहण्यासाठी लोकांची झुंबड उडे. १९३२ च्या कोल्हापूर साहित्य संमेलनास जवळपास दहा हजार लोक उपस्थित होते. यावरून संमेलनाच्या गर्दीचे स्वरूप लक्षात येते. लेखक-कवी समाजाच्या आदराचा व श्रद्धेचा विषय होते. अर्थात, त्या काळी दळणवळणाची साधने व माध्यमे फार नव्हती. टीव्हीचा पडदा नव्हता. संमेलनाध्यक्षांचे सत्कार वर्षभर चालत. कृ.पां. कुलकर्णी अमळनेर संमेलनाचे अध्यक्ष होते. ते संमेलनासाठी रेल्वेने मुंबईहून अमळनेरला जाताना, प्रत्येक स्टेशनवर त्यांचा हारतुऱ्यांनी सत्कार झाला. अलीकडचे एक उदाहरण- श्रीपाल सबनीस अध्यक्ष झाल्यानंतर 'पंधरा महिन्यांत त्यांचा ८० हजार किलोमीटर प्रवास झाला. त्यांनी साडेतीनशे समारंभांना उपस्थिती लावली. या कार्यक्रमांतून त्यांना बारा लाख मानधन मिळाले.' ('महाराष्ट्र टाइम्स', ३० जानेवारी २०१७). यावरूनदेखील अध्यक्ष झालेल्या लेखकाबद्दल समाजात प्रतिष्ठा जाणवते. याबरोबर कथाकथन, कविसंमेलन, परिसंवाद व मुलाखती हे साहित्य संमेलनाचे आकर्षण असते.

संमेलनातील परिसंवाद व विविध कार्यक्रम

साहित्य संमेलनांत मराठी साहित्याच्या वाढीसाठी व त्यास उपकारक ठरेल असे परिसंवाद, चर्चा घडते. जी काळ, समाज आणि साहित्यसन्मुख होते. बार्शी (१९८०) साहित्य संमेलनात ग्रामीण-दलित साहित्यप्रवाहावर परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. तसेच, त्या आधी साहित्य आणि अश्लीलता, भाषाविषयक महत्त्वाच्या प्रश्नांवर परिसंवाद आयोजित केले होते. काही विशेष ग्रंथांच्या शताब्दीनिमित्त चर्चा झाली. 'शेतकऱ्याचा आसूड', 'आज्ञापत्र' व 'स्मृतिचित्रे' अशा विषयांवर विशेष चर्चा झाली. विशेष लेखकांच्या मुलाखतींच्या आयोजनामुळे या संमेलनात रंगत आली. बाबा कदम (छत्रपती संभाजीनगर), श्याम मनोहर (बडोदा), रामदास भटकळ (नाशिक), राजन गवस (उदगीर), नागनाथ कोत्तापल्ले यांच्या मुलाखती चर्चाविषय ठरल्या.

भविष्यात ज्यांनी स्वतःची वेगळी नाममुद्रा साहित्यविश्वात उमटवली, अशा लेखक-कवींना संमेलनाचे विचारपीठ मिळाले. इचलरंजीच्या संमेलनात ना.धों. महानोर यांच्या कवितावाचनामुळे ते प्रकाशात आले. कवितागायन व कवितावाचनाचा प्रभाव आणि परिणाम दीर्घकाळ घडून येई. इचलकरंजीच्या साहित्य संमेलनात, 'महानोरांनी गावाकडच्या तर बोरकरांनी गोव्याकडच्या कविता तन्मयतेने म्हणून श्रोतृसमाजाचे देहभान हरपून टाकले.' ('ललित', फेब्रु. १९७५). असे वातावरण अनेक संमेलनांत घडले. काही संमेलनांतून काही नवोदित लेखक एकदम प्रकाशझोतात आले. त्यांच्या कथाकथनावर वृत्तपत्रांत अग्रलेख लिहिले गेले. काही वर्षांपूर्वी संमेलनांची वृत्तपत्रांत भरगच्च वार्तांकने येत.

संमेलनांचे उत्सवी रूप

साहित्य संमेलनांच्या वाटचालीत संमेलने उत्सवी स्वरूपात भरू लागली. यादृष्टीने कोल्हापूर, पिंपरी येथील संमेलने लक्षात राहतील. संमेलन ज्या ठिकाणी भरवण्यात येते, तेथील प्रादेशिक जीवनाचा ठसा असतो. ग्रंथदिंडी, मंडप, सांस्कृतिक कार्यक्रम व आहारसंस्कृतीवर प्रभाव दिसतो. सोलापूर येथील साहित्य संमेलनात कर्नाटकी पद्धतीची भाकरी वा खाद्यपदार्थांची रेलचेल होती. १९३२च्या कोल्हापूर साहित्य संमेलनात सभामंडपाबाहेर पिंजऱ्यात वाघ, चित्ते ठेवण्यात आले होते. संमेलनाध्यक्षांचा सन्मान वा गौरव केला जातो. इचलकरंजी येथील सुवर्णमहोत्सवी संमेलनात अध्यक्षपत्नी म्हणून सुनीताबाई देशपांडे यांची खणानारळाने ओटी भरण्यात आली, तर पु.ल. देशपांडे यांचा चांदीची समई व कोल्हापुरी फेटा बांधून सत्कार करण्यात आला.

काही संमेलने वादंगांनी गाजली. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथील ७७व्या साहित्य संमेलनावर जेम्स लेनच्या शिवाजी महाराजांच्या उल्लेखाबद्दल व त्यानंतरच्या भांडारकर संशोधन संस्थेवरील हल्ल्याचे सावट होते. महाबळेश्वर येथील साहित्य संमेलन अध्यक्षाविना पार पडले.

पूर्वीची संमेलने

काही संमेलनांतून नवीन पायंडे पडले. पूर्वीची संमेलने साधी व्हायची. या साधेपणाच्या काही आठवणी अशा- बार्शी साहित्य संमेलनातील प्रमुख वक्ते, कवी, महामंडळाचे पदाधिकारी यांच्या निवासाची व्यवस्था आयोजक संस्थेच्या

दवाखान्याच्या वसतिगृहात, महाविद्यालयाच्या वसतिगृहात तसेच प्राध्यापकांच्या घरी करण्यात आली होती. एवढेच नव्हे, तर संमेलनाचे उद्घाटक शिवराम कारंत यांचीही निवासव्यवस्था एका परिचितांकडे करण्यात आली होती. अलीकडे उस्मानाबाद साहित्य संमेलन हे लोकवर्गणीतून भरवण्यात आले होते. त्यास चांगला प्रतिसादही लाभला. याबरोबर ग्रामीण भागात जी संमेलने झाली, त्यांना भरभरून प्रतिसाद मिळाला. अंबाजोगाई, बार्शी, उदगीर, अमळनेर ही काही उदाहरणे सांगता येतील. बार्शीच्या साहित्य संमेलनास आजूबाजूच्या खेड्यांतून बैलगाड्यांतून बहुसंख्य लोक आले होते. १९३२च्या कोल्हापूर येथील साहित्य संमेलनास ९,१४४ रुपये खर्च आला होता. दिल्ली साहित्य संमेलनावेळी, राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद यांनी मराठी साहित्यिकांना उपाहारासाठी त्यांच्या निवासस्थानी अगत्याने आमंत्रित केले होते. रत्नागिरी येथील ६४व्या साहित्य संमेलनात, मुख्यमंत्री शरद पवार हे उद्घाटक श्री.ना. पेंडसे यांना सपत्नीक आपल्यासमवेत विमानाने घेऊन आले होते. ते दिंडीत सहभागी होऊन शुभेच्छा देऊन परत गेले. (संदर्भ - 'करुळचा मुलगा', मधु मंगेश कर्णिक)

संमेलनानंतरचे उपक्रम

या साहित्य संमेलनांतून काही सकारात्मक उपक्रम घडले. साहित्य संमेलनाच्या उर्वरित निधीतून संयोजकांनी काही नवे वाङ्मयीन उपक्रम सुरू केले. इचलकरंजीच्या सुवर्णमहोत्सवी संमेलनानंतर उर्वरित निधीतून प्रतिवर्षी उत्कृष्ट साहित्यकृतींना गौरवण्यात येते. ती परंपरा आजवर सुरू आहे. रत्नागिरीच्या (१९६४) साहित्य संमेलनानंतर मालगुंड येथे 'कविवर्य केशवसुत स्मारक' आकाराला आले; तसेच, 'कोकण मराठी साहित्य परिषदे'ची स्थापना झाली. उस्मानाबाद येथील संमेलनावेळी जमलेल्या लोकवर्गणीच्या निधीतून परिषदेची वास्तू व कार्यालय उभे करण्यात आले. तसेच, या संमेलनात जाणीवपूर्वक राजकीय हस्तक्षेप बंद केला. परभणी येथील साहित्य संमेलनावेळी लक्ष्मीकांत देशमुख यांनी, निधी संकलनासाठी लोकांना आवाहन करून एक रुपयाच्या मदतीचे आवाहन केले होते. त्यास चांगला प्रतिसाद मिळून एक लाख रुपयांचा निधी जमा झाला होता.

संमेलन स्मरणिका

या संमेलनानिमित्ताने काही संयोजकांनी उत्तम अशा 'स्मरणिका' प्रकाशित केल्या. त्या त्या प्रदेशातील वाङ्मयीन परंपरेचा धांडोळा घेणाऱ्या काही उत्तम स्मरणिका प्रकाशित झाल्या. उदगीर-'अश्मक', बडोदा-'सेतू', नागपूर-'गोंदण', छत्रपती संभाजीनगर-'भारुड' (संपा. चंद्रकांत पाटील). कराड साहित्य संमेलनात (१९७५) 'अभिरुची : ग्रामीण व नागर' (संपा. गो.म. कुलकर्णी) या विषयावर, तर २००३च्या ७६व्या अखिल भारतीय संमेलनात (कराड) म.द. हातकणंगलेकर यांनी स्मरणिकेत 'अभिरुची' विषयावर विशेष भाग संपादित केला होता. तसेच, इचलकरंजी-'ऐसी अक्षरे'(१९७४), दिल्ली-'जरीपटका' (संपा. श्रीराम पवार), पिंपरी येथील साहित्य संमेलनात 'मराठी भाषा : संचित आणि नव्या दिशा' (संपा. विजय कुवळेकर) हे महत्त्वाचे स्मरणग्रंथ प्रकाशित करण्यात आले.

नागपूर साहित्य संमेलनास नयनतारा सहगल यांना आमंत्रित करण्यात आले होते. त्या राजकीय भाष्य करतील म्हणून ऐनवेळी त्यांचे भाषण रद्द केले. या घटनेची प्रतिक्रिया म्हणून मुंबईत काही भाषा-साहित्यविषयक कार्यकर्त्यांनी नयनतारा सहगल यांना आमंत्रित करून विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले व त्यात अभिव्यक्तिस्वातंत्र्यावर चर्चा झाली.

साहित्य संमेलनांत काही चांगले पायंडे पाडण्यात आले. त्यापैकी 'समीक्षा शाखा संमेलन' हे होय. नांदेड येथील साहित्य संमेलनात समीक्षक वसंत दावतर यांच्या विशेष सत्काराचे आयोजन केले गेले. सांगली येथील साहित्य संमेलनात, ज्येष्ठ कथाकार चारुता सागर यांचा कथाकथनच्या सत्रावेळी विशेष सत्कार करण्यात आला होता.

संमेलनांतील ठराव

या साहित्य संमेलनांतून समारोपप्रसंगी जे ठराव मांडले, ते मराठी समाजाच्या आस्थेच्या प्रश्नासंबंधी व धोरणात्मक दृष्टीचे ठराव होते. मराठी भाषा-साहित्य ते या समाजाच्या जगण्यासंबंधी हे ठराव होते. या ठरावांत तत्कालीन काळाचे प्रतिबिंब आहे. सीमाप्रश्नाचा ठराव, नामांतरास पाठिंबा, अभिव्यक्तिस्वातंत्र्याचा ठराव, असे ठराव मांडले गेले आहेत. स्वतंत्र महाराष्ट्र विद्यापीठाचा ठराव १९३०पासून मांडण्यात आला. यातील १९३२ च्या ठराव समितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर, भास्करराव जाधव, अण्णासाहेब लठ्ठे, चिं.वि. जोशी, भा.रा. तांबे यांचा सदस्य म्हणून समावेश होता.

संमेलनातील बदल व प्रभावक्षीणता

कालौघात साहित्य संमेलनाचे स्वरूप मोठ्या प्रमाणात बदलले आहे. यामागे बदलता काळ, भांडवली जगातील गती, जीवनशैली व मूल्यदृष्टीत झालेली बदल कारणीभूत आहेत. लोकांची गर्दी, उत्साह कमी झाला आहे. या संमेलनास केवळ आणि केवळ उत्सवी रूप प्राप्त झाले आहे. गंभीर लेखक-समीक्षक वाचकांची संमेलनात वानवा आहे. संमेलनात तेच ते चेहरे आढळतात. त्यावर घटक परिषदांचा दबावही जाणवतो. या संमेलनातील एक मोठा बदल झाला, तो वाङ्मयीन दृष्टी व व्यवहार हळूहळू मनोरंजनाकडे झुकला आहे. याचाच एक भाग म्हणून साहित्य संमेलनात मनोरंजनप्रधान कार्यक्रमांची रेलचेल सुरू झाली आहे. अमिताभ बच्चन यांच्यापासून अनेक

सिनेतारकांचा सहभाग संमेलनात वाढू लागला आहे. तसेच, रोखठोक बोलणाऱ्या वक्त्यांची, अध्यक्षांची परंपरा क्षीण होते आहे. शासन कोट्यवधींचा निधी देते त्यामुळे संमेलनावर राजकीय नेत्यांचा हस्तक्षेप व वावर मोठ्या प्रमाणात वाढला आहे.

वृत्तपत्रे-नियतकालिके भांडवली व बाजारू अवस्थेने केंद्रित झाल्यामुळे एकेकाळी वृत्तपत्रांत विपुल प्रमाणात साहित्य संमेलनांचे वृत्तांत, मुलाखती, लेख प्रसिद्ध होत असत. तसे आता होत नाही. साहित्य संमेलन उद्घाटन व समारोपांच्या बातमीस मुख्य पानावर विस्तृत स्थान असायचे; आता ते तसे आढळत नाही. तसेच, स्मार्ट फोन, इंटरनेटद्वारे थेट प्रसारणामुळे वाचकांचा संमेलनाविषयी औत्सुक्याचा भागही कमी झाला आहे.

साहित्य संमेलनाच्या प्रक्रियेतून राज्यसंस्था व जनमानसावर भाषा आणि साहित्यसंस्कृतीविषयी धोरणात्मक निर्णय होऊन, त्याचे दबावगट व निर्णयप्रक्रियेत रूपांतर व्हायला हवे. तसे मात्र आजघडीला घडताना दिसत नाही. संमेलनाची अध्यक्षीय भाषणेही फिकी व केवळ आढाव्याच्या स्वरूपाची घडत आहेत. काळाची व जीवनाची गती वेगाने बदलत असताना त्याचे पडसाद साहित्य संमेलन अध्यक्षांच्या भाषणांतून उमटताना दिसत नाहीत. केंद्रशासनाने अभिजात भाषा म्हणून मराठीला दर्जा दिला आहे. परंतु त्यांसंबंधी पायाभूत स्वरूपाचे कार्य होताना दिसत नाही. केवळ उत्सवी रूपात त्याचा 'सप्ताह' साजरा होतो आहे. रमेश इंगळे-उत्रादरकर यांच्या अलीकडे प्रसिद्ध झालेल्या 'अभिजात भाषेची शपथ' या कवितेत

'ही हयात
तुझ्या कच्छपी लागली
त्या निरलंकृत क्षणाच्या
अनाघ्रात सौंदर्याची
नंतर कुठल्याच मुहूर्ताला
आली नाही सर' असे म्हटले आहे, त्याप्रमाणे आता केवळ या दिनाच्या उत्सवमुहूर्ताचा आटापिटा.

१९५० साली वि.स. खांडेकर यांनी, 'साहित्य संमेलने कशी असावीत' या लेखात जुन्या-नव्या लेखकांची मनमोकळी चर्चा आणि स्नेहसंवर्धन आवश्यक आहे, असे सांगितले होते. 'आपल्या दैनंदिन सुखदुःखांशी राजकारण आता इतके निगडित झाले आहे, की त्याचे पडसाद वाङ्मयात उठणे अपरिहार्य होऊन बसले आहे.' असे म्हटले होते. तर 'जीवनातल्या मांगल्याची आशा आणि अमंगलाची भीती यांचे त्याच्या हृदयातले पडसाद संमेलनात येणाऱ्या प्रत्येकाच्या अंतःकरणात उमटले पाहिजेत. ते उमटतील अशा कार्यक्रमात संमेलनाचा क्षण नि क्षण खर्च झाला पाहिजे.' असे म्हटले होते. ('मनोहर', एप्रिल, १९५०).

'पण अलीकडे हे लक्षात कोण घेतो?'

– रणधीर शिंदे
randhirshinde76@gmail.com

ग्रंथाली

डॉ. स्मिता दातार यांची बहुचर्चित पुस्तके

एक होती हिडिंबा



मूल्य ३०० रुपये
सवलतीत २०० रुपये

अयोध्येची ऊर्मिला



मूल्य ४०० रुपये
सवलतीत २५० रुपये

डॉ. नेहा सावंत

माणसं वाचायला शिकवणारा माणूस

कवी म्हणून नारायण सुर्वे यांचा परिचय शालेय, महाविद्यालयीन वयापासून होताच, 'कवी तो दिसे कसा आननी' हे कुतूहलही मराठी वाङ्मय मंडळात त्यांना कार्यक्रमाला बोलावल्यामुळे शमलं होतं. मात्र 'कवी तो वागे कसा जीवनी' याबद्दलचं कुतूहल शमायला २००८ हे साल उजडावं लागलं. उणापुरा दोन वर्षांचा सहवास घडला, आणि मी अंतर्बाह्य बदलून गेले. इतकंच नाही तर या सहवासात त्यांच्या कविता अधिक उकलत गेल्या, नव्हे काही काही कवितांतील अनुभव साक्षात उलगडत गेले, तेच मांडण्याचा प्रामाणिक प्रयत्न करणार आहे. कारण कवी सुर्वे नेहमीच म्हणायचे, 'माझी कविता हेच माझं जगणं आहे, मला वेगळं आत्मचरित्र लिहिण्याची गरज नाही.' 'चार शब्द' या कवितेतच त्यांनी लिहून ठेवलंय –

'केव्हा चुकलो, मुकलो नवे शिकलोही आहे
जसा जगत आहे तसाच शब्दांत आहे',

तर मला जाणवलेलं त्यांचं जगणं, मला आलेले अनुभव आणि त्या अनुभवातून आकळलेली कविता इथे मांडण्याचा प्रामाणिक प्रयत्न करणार आहे. अर्थात ही काही त्यांच्या कवितेची चरित्रनिष्ठ अभ्यासपद्धतीनं केलेली समीक्षा नव्हे, तो माझा हेतू नव्हे, हे मात्र नम्रपणे नोंदवावंसं वाटतं.

आजही तो दिवस लख्ख आठवतोय, गोरेगाव फिल्म सिटीमधला एक हॉल जिथे 'नारायण गंगाराम सुर्वे' या चित्रपटाचा शो ठेवण्यात आला होता. ख्यातनाम दिग्दर्शक अरुण खोपकर यांनी दिग्दर्शित केलेल्या या चित्रपटामध्ये कृष्णाबाई सुर्वे यांची छोटीशी भूमिका करण्याची संधी मला मिळाली होती. चित्रपट संपल्यानंतर कृष्णाबाई सुर्वे आणि नारायण सुर्वे यांना मी भेटायला गेले आणि नमस्कार केला तेव्हा त्या दोघांनीही आशीर्वाद देताना म्हटलं होतं, की आमचं तरुणपण तुम्ही साक्षात उभं केलंत. त्यांच्या या वाक्यानं मला मोठी पावती मिळालेली होती. परंतु मनामध्ये मात्र कृष्णाबाईंचं जीवन आणि नारायण सुर्वे यांचं जीवन पुस्तकरूपानं समाजापुढे

नारायण सुर्वे

यावं असं वारंवार वाटत होतं. मात्र या ना त्या कारणानं ते राहूनच जात होतं.'' असं म्हणतात ना की कोणतीही घटना घडण्यासाठी किंवा कोणती चांगली गोष्ट घडण्यासाठी एक योग यावा लागतो आणि तो योग आला तो १४ मार्च २००८ रोजी. आम्ही कुटुंबीय त्यांच्या नेरळच्या घरी त्यांना भेटायला गेलो होतो. आणि तिथे या उभयतांच्या आत्मकथनाचा विषय निघाला. कारण त्यांच्या आयुष्यात खूप काही घडलेलं होतं जे समाजापुढे यायला हवं होतं. शिवाय अनेक लेखक, कवींच्या पत्नींची आत्मकथनं येऊ लागली होती, बऱ्याच लेखकपत्नी लिहित्या झाल्या होत्या. गप्पांच्या ओघात कृष्णाबाईंच्या बोलण्यातून कळलं की त्या निरक्षर होत्या, पण मनामध्ये खूप काही खदखदत होतं जे त्यांना सांगायचं होतं. आणि इथेच माझ्या मनामध्ये बीज पेरलं गेलं 'मास्तरांची सावली'चं.

'मास्तरांची सावली' या आत्मकथनाचं शब्दांकन करणं म्हणजे माझ्यासाठी खूप काही शिकवणारा एक अनुभव होता. व्यक्तिमत्त्वविकासाचा अनुभव होताच, त्याचबरोबर लेखक म्हणून मला घडवणारा आणि मला नाव देणाराही अनुभव होता. या शब्दांकनाच्या निमित्तानं दर वेळेला माझं त्यांच्या घरी जाणं होत होतं. जो काही एक दीड वर्षाचा सहवास मला मिळाला त्यामध्ये पुस्तकाची घडण होतच होती, शिवाय माणूस म्हणून माझीही घडण होत होती. आम्हा तिघांमध्ये आई-वडील आणि मानसकन्येचं एक नातं दृढ होत चाललेलं होतं. अर्थात त्यांचे असे अनेक मानसपुत्र आणि मानसकन्या होत्या/ आहेत, परंतु त्यांच्या उतारवयात आणि अखेरच्या काळात त्यांचा सहवास लाभलेली आणि 'मास्तरांची सावली' या आत्मकथनाच्या प्रकाशनसोहळ्यातील भाषणात त्यांनी जाहीर केलेली मानसकन्या मीच, हे सांगताना मला अभिमान वाटतो. 'मास्तरांची सावली'चं शब्दांकन करत असताना कृष्णाबाई सुर्वे त्यांच्या आयुष्यातील एकेक घटना, एकेक प्रसंग त्या उलगडून सांगत असायच्या आणि ते सांगत असताना माझ्या मनामध्ये मात्र नारायण सुर्वे यांची कविताच कित्येकदा साक्षात साकार होत आहे की काय असं वाटायचं. तेव्हाच जाणवलं की नारायण सुर्वे यांची कविता ही त्यांच्या अस्सल जगण्यातून, अस्सल अनुभवासकट अस्सलपणे व्यक्त झालेली आहे. अशा कितीतरी कविता सांगता येतील की ज्या कवितांमध्ये नारायण सुर्वे आणि कृष्णाबाई यांचं जीवन, त्या जीवनातले अनेक प्रसंग चित्रित झालेले आहेत.

'मास्तरांची सावली' या आत्मकथनाच्या शब्दांकनासाठी कृष्णाबाईंच्या अनेक मुलाखती घेतल्या होत्या. माझा शब्दांकनाचा तो पहिलाच अनुभव असल्यामुळे चुकतमाकत मी शिकत होते. सुरुवातीला मला कवी नारायण सुर्वे या नावाचं दडपण आणि दबदबा वाटत होता; परंतु जसजशी मी रुळत गेले, त्यांच्या सहवासात येत गेले तसतसं हे कवीपण गळून पडलं आणि निव्वळ माणूसपण तिथे राहिलं. मलाच कधीतरी आत्मकथनाचा आता कोणता टप्पा सुरू आहे हे सांगावंसं वाटायचं, कधीतरी त्यांचा सल्ला घ्यावासा वाटे, पण लिखाणाच्या बाबतीत त्यांनी कधीच कसलीच लुडबुड केली नाही. आम्हा दोघांच्या व्यवहारात फक्त एक मात्र सांगितलं की तुम्ही शब्दांकन करत आहात पण माझ्या किशाच्या बोलीला धक्का लावू नका. माझ्या किशाची बोली काहीशी रांगडी आहे, खेडवळ वाटणारी आहे, मात्र त्या बोलीतच तिचं व्यक्तिमत्त्व दडलेलं आहे, तीच तिची खासियत आहे. ती मात्र या आत्मकथनामध्ये जशीच्या तशी येईल याचा प्रयत्न करा. कारण माणसाच्या बोलीतूनच त्याचं व्यक्तिमत्त्व दिसून येत असतं. या एका प्रसंगातूनच मला जाणवलं की ते माणूसपणाला, माणसाच्या आतल्या गाभ्याला किती महत्त्व देतात! म्हणूनच 'मर्ढेकरांशी एक बातचीत' या कवितेत ते मर्ढेकरांना प्रश्न विचारतात -

'मर्ढेकर माणूसच पुसला,
तर, नंतर काय हो उरते!'

माणसातल्या सर्जनशक्तीवर जसा त्यांचा विश्वास होता तसाच माणसातल्या चांगुलपणावरही त्यांचा विश्वास होता, म्हणूनच ते 'माझे विद्यापीठ' या कवितेत ते म्हणतात,

'तरी का कोण जाणे माणसाइतका समर्थ सृजनआत्मा
मला भेटलाच नाही
आयुष्यपोथीची सदतीस पाने उलटली, वाटते अजून काही
पाहिलेच नाही.'

त्यांनी कधीही कुणाला लहान अथवा मोठ मानलं नाही, तर प्रत्येक माणसामध्ये काहीतरी वेगळेपण असततं, काहीतरी विशेष बाब असते यावर त्यांचा विश्वास होता. त्यांनी स्त्री आणि पुरुष असा भेदही केला नव्हता. त्यांच्या दृष्टीनं सगळे समानच होते, त्यामुळे घरी एखादा पोस्टमन आला किंवा एखादा गॅस सिलेंडर घेऊन माणूस आला तरी त्यांची ते आस्थेनं चौकशी करत असत. माणसावर आणि माणुसकीवर त्यांचं प्रेम होतं. प्रत्येक माणसाचं स्वत:चं असं तत्त्वज्ञान असतं, ते त्याच्या अनुभवातून आलेलं असतं. त्याचा आपण मान ठेवला पाहिजे, हे केवळ कवितेत ते मांडत नाहीत, तर प्रत्यक्षातही तसेच वागत असत. म्हणून तर त्यांच्या 'तुमचंच नाव लिवा या कवितेतील स्त्री म्हणते-

'कंच्याबी देवाचं नाव नगा लिवू,
मानसाचंच लिवा ....
देवानं काय केलं हो,
वटी तेनंच भरली ना ही...
तुमचंच नाव लिवा'

'शीगवाला' या कवितेतील दाऊदचाचा म्हणतो -

'तो बेटे-
आता आदमी झाला सस्ता- बकरा महाग झाला
जिंदगीमध्ये पोरा, पुरा अंधेर आला,
आनि सब्दाला;
जगवेल असा कोन हाये दिलवाला
सबको पैसेने खा डाला.'

कवी नारायण सुर्वे आणि कृष्णाबाई सुर्वे यांचं उतारवयातील जीवन पाहणं, सहजीवन पाहणं आणि त्या सहजीवनातली जी काही केमिस्ट्री होती त्यांची, जे काही

त्यांचं नात्यातलं रसायन होतं ते अतिशय विलक्षण होतं. दोघंही तशी थकलेली होती, तरी त्या थकलेल्या अवस्थेत आणि त्या उतारवयातही कृष्णाबाई घरात सतत वावरत असायच्या. सकाळपासून घरातल्या कामांमध्ये व्यग्र असायच्या. घराची स्वच्छता असेल, केरवारा असेल, स्वयंपाकपाणी असेल आणि शिवाय त्यात नारायण सुर्वे यांची औषधं, त्यांची एकूण काळजी घेणं हा भाग असेल, त्यांना वेळच्या वेळी खाऊपिऊ घालणं असेल, त्यामुळे त्या स्वतःच्या तब्येतीकडे तसं दुर्लक्ष करत होत्या. त्यांना सतत काम करताना पाहिलं की नारायण सुर्वे अस्वस्थ होत आणि अगदी प्रेमानं त्यांना साद घालायचे, 'किशा, अग दमली असशील ना! तू बस जरा, विश्रांती घे थोडा वेळ.' आणि हे वाक्य इतक्या प्रेमानं म्हणायचे ते की त्यांची 'पुरे कर' हीच कविता मला आठवत राहायची. पुरे कर या कवितेतला नायक असंच म्हणतो –

'आता पुरे कर
तुझा भिंगरी सारखा वावर
स्वतःला थोडे आवर'

नारायण सुर्वे यांनाही कृष्णाबाईंच्या तब्येतीची अतिशय काळजी असायची. 'पुरे कर' या कवितेत ते म्हणतातच –

'थोडी शांत हो, बाहेरही वाढलाय गारवा
तूही घे विसावा;
ढवळलेले पाणी स्थिरावू दे,
आपल्यासाठी...'

त्यांचे हे कृष्णाबाईंशी प्रेमळ वागणं मला नेहमीच प्रत्ययाला येत असे. अगदी साधासा पदार्थ कृष्णाबाईंनी केला तरी त्याचं ते मन भरून कौतुक करत असत. म्हणजे त्यांनी घरात कधीही नवरेशाही गाजवली नाही. वास्तविक पाहता घरचा करता पुरुष म्हणून शेखी मिरवणारे पुरुष असतात. नारायण सुर्वे त्याला अपवाद होते. पत्नीचं श्रेय ते पत्नीला वेळोवेळी देत असत. तिथे त्यांना कोणताही कमीपणा वाटत नसे.

नारायण सुर्वे याचं कृष्णाबाईंशी वागणं प्रेमळपणाचं होतं. कृष्णाबाईंचाही त्यांच्या सुर्वे मास्तरांवर विलक्षण जीव होता. तरी मी कृष्णाबाईना अनेकदा मास्तरांवर रागावतानाही पाहिलेलं आहे. आपल्या सांगण्याप्रमाणे मास्तर वागले नाहीत तर त्या मास्तरांना दटावायलाही कमी करत नसत. खास करून

कृष्णाबाई आणि नारायण सुर्वे, डॉ. नेहा सावंत

त्यांचं सातत्यानं चहा पिणं त्यांना आवडत नसे. खाण्याच्या बाबतीत अतिशय कटाक्षानं पथ्य, त्यांचं औषधपाणी वगैरे त्या पाळत होत्या. त्या शिकलेल्या नव्हत्या, त्यांना लिहिता–वाचता येत नव्हतं, तरीही त्या स्वतःच्या जबाबदारीमध्ये, स्वतःच्या कर्तव्यामध्ये कधी मागे राहिल्या नाहीत. मास्तरांनी सतत लिहीत राहावं, त्यांच्यातली कविता आता विझू लागली आहे, त्यांच्यातली ऊर्मी आता विझू लागलीये, हे त्यांना जाणवत राहायचं, आणि त्या विलक्षण दुःखी व्हायच्या. हेच दुःख कवी नारायण सुर्वे यांनी 'पहारा' या कवितेमध्ये कित्येक वर्षांपूर्वी लिहून ठेवलेलं होतं. म्हणजे कृष्णाबाई यांना मी पाहिलंय की त्या सगळं टेबल आवरून ठेवायच्या, मास्तरांनी लिहायला बसावं यासाठी त्या तयारी करून ठेवायच्या. टेबलावर पेन ठेवायच्या; पण मास्तर लिहीत नाहीत हे पाहिलं की त्यात अतिशय खंतावून जायच्या. खूप वर्षांपूर्वी मास्तरांनी 'पहारा' ही कविता लिहिली होती आणि या कवितेमध्ये असंच काहीसं म्हटलंय,

'तुझ्या पापण्यांचा पहारा माझ्या शब्दावर असतो
म्हणून माझ्या पद्यपंक्तीत व्यभिचाराचा अंश नसतो.
सदैव माझ्या कवितेत सत्याचा सहवास असतो
मिळवलेले सारे साठवितेस, जपतेस फोडासारखे मला
जसे झाड जपते फुलास; आकाश जपते फुलाला.'

'पहारा' या कवितेवरून एक प्रसंग आठवला, की ८ ऑगस्ट २००८ रोजी 'मास्तरांची सावली' या पुस्तकाचं प्रकाशन झालं. खूप सुंदर सोहळा झाला. काही दिवसांनंतर नारायण सुर्वे हे एकदा गमतीनं कृष्णाबाईंना म्हणाले, की 'आता लोक मला आणि माझ्या कवितेला विसरणार. आता 'मास्तरांची सावली' सगळीकडे झळकणार. किशा, तुझं पुस्तक इतकं छान झालंय की माझी कविता लोक विसरून जातील.' तेव्हा कृष्णाबाई त्यांना म्हणाल्या, 'तुमची कविता अमर आहे. ती कशी विसरतील? आणि माझं पुस्तक वाचताना त्यांना तुमची कविता आठवणारच.' कृष्णाबाई असं बोलल्या खरं, पण कृष्णाबाईंच्या मनामध्ये ही गोष्ट सलत राहिली, की आता मास्तरांचं नवं पुस्तक आलेलं नाहीये. आपलं पुस्तक गाजेल ही मास्तरांना धास्ती वाटते की काय! म्हणून कृष्णाबाईंनी मला घरी बोलावलं आणि सांगितलं की आता मास्तरांचं पुस्तक यायलाच हवं. एक पेटारा आहे माझ्याकडे आणि या पेटाऱ्यात मी त्यांच्या सगळ्या चिठ्ठ्या, चपाट्या, जे काही वर्तमानपत्रांमध्ये छापून येत होतं त्यांच्याविषयीचं, जे काही मला समजत होतं, सापडत होतं ती सगळी कात्रणंबितरण मी सगळी त्या ट्रंकेत ठेवलेली आहेत, ती ट्रंक मी तुला देते. त्यातून बघ तुला काही सुचतंय का. एकदा सुर्व्यांनीपण सांगितलं होतं की त्यांच्या कवितांवरचे निर्मितीप्रक्रियेचे लेख 'मुंबई सकाळ'च्या अंकामध्ये येत होते. तर त्याचं पुस्तक करावं असं त्यांना फार वाटत होतं; पण ते झालं नाही. मग तेच एक सूत्र मी पकडलं,

मग त्या ट्रंकेतून ते लेखांचं बाड काढलं, त्यात आणखी काही अधिकची भर घालता येते का ते पाहिलं, काही नव्या लेखांची त्यात मांडणी केली, अशातऱ्हेनं 'कहाणी कवितेची' हे पुस्तक तयार झालं. कवी नारायण सुर्वे यांच्या नावानं प्रकाशित झालेलं हे त्यांचं शेवटचं पुस्तक. इथे मला कृष्णाबाईंचा एक वेगळा स्वभाव जाणवला. म्हटलं तर त्यांची त्यागाचीच भावना दिसते. आपल्या पुस्तकापेक्षा नारायण सुर्वे लोकांच्या कायम लक्षात राहावे आणि आता एक त्यांचं ताजं पुस्तक आल्यावर पुन्हा लोक त्यांना त्यांचा उदो उदो करतील, मास्तरही कदाचित मनानं उभारी घेतील. माझं पुस्तक मागे राहिलं तरी चालेल. म्हणजे हा जो एक विलक्षण विश्वास होता किंवा हे जे एक वेगळ्या धर्तीचं प्रेम होतं कृष्णाबाईंचं ते या प्रसंगातून दिसून येतं. स्वतःला अडाणी-अशिक्षित म्हणवणारी बाईपण मास्तरांचे फोटो, त्यांची कात्रणं, त्यांनी जे काही खरडून ठेवलेलं असायचं ते; असं सगळं जमा करून त्या ट्रंकेमध्ये किती निगुतीनं जपलेलं होतं! नारायण सुर्वे यांनाही त्यांनी लहान मुलासारखं जपलेलं आणि अगदी म्हणतात तसं फोडासारखं जपलेलं होतं आणि ही त्यांची साथ होती म्हणूनच नारायण सुर्वेंची कविता ही तितकीच सत्याची कास धरणारी ठरली.

सुर्वे यांचा उतारवयातील काळ तसा ओढगस्तीचाच होता, कठीण होता, कारण सतत सोसावी लागणारी आजारपणं, उतार वय, आर्थिक चणचण. कृष्णाबाईंचीही काही ना काहीतरी आजारपणं. अशा वेळी त्यांनी एक निर्णय घेतला होता, नाशिकला जाऊन राहण्याचा. अर्थात हा निर्णय त्यांनी स्वेच्छेनं कितपत घेतला हा प्रश्नच आहे. त्यांच्यावर दबाव आणला गेला होता का? त्यांना काही आमिषं दाखवली गेली होती का? कदाचित आपला भावी काळ वार्धक्याचा, सुखाचा जाईल आणि अतिशय चांगल्या माणसांच्या सहवासात जाईल असं काहीसं त्यांना वाटलं असावं म्हणून त्यांनी नाशिकला राहण्याचा निर्णय घेतला. सुरुवातीचे नवलाईचे नऊ दिवस चांगले गेले, पण ते मनापासून तिथे रमले नाहीत. कारण त्यांचं वास्तव्य साऱ्यांसाठीच त्रासदायक आणि अडचणीचं झालं होतं. ज्यांनी जबाबदारी घेतली, त्यांना ती जबाबदारी यशस्वीरीत्या पार पाडता आली नव्हती आणि ह्या दोघांचंही वय आणि अवस्था काहीशी परावलंबीच होती. आयुष्यभर आपल्या मनाप्रमाणे जगलेल्या उभयतांना तडजोडीत राहणं कठीण होत होतं. कारण - 'कठीण होत आहे' या कवितेत ते म्हणतातच,

'तडजोडीत जगावे. जगतो : दररोज कठीण होत आहे
आपले अस्तित्व असूनही नाकारणे; कठीण होत आहे'

आपण कुणाच्यातरी पारतंत्र्यात आहोत, आपलं स्वातंत्र्य हिरावलं जात असल्याची जाणीव त्यांना होत होती. आणि ते दुःख त्यांच्या चेहऱ्यावर दिसूनही येत होतं. ते पाहून वाईटही वाटत होतं आणि मला त्यांची 'सावध' ही कविता आठवत होती. या कवितेत ते म्हणतात-

'शब्दांनो! सावध असा; सक्त पहारे बसलेत
तुम्ही दिलेत चंद्र त्यांच्या डोळ्यात खुपलेत
सावध हे आशया! सावध माझ्या बाप्पा
तू दिल्या सत्याने उजेड त्यांचे कलथलेत.'

आपल्या जगण्यावर कुणाचातरी पहारा आहे, ही जाणीवच त्यांना क्लेशदायक होती. कायम बंडासारखे उगारलेले हात आणि कवितेतील शब्द निष्प्रभ होत असल्याचं पाहून ते आतल्या आत घुसमटत राहिले.

'ठेव' या कवितेत तेच म्हणतात की

'तडजोड केली नाही जीवनाशी हे असे दिवस आले
आयुष्यभर स्वागतास पेटते निखारेच सामोरे आले
कसे जगलो आपण, किती सांगू किती करून देऊ याद
पळे युगासम भासली; नाही बोलवत, नको ती मोजदाद'

म्हणजे एकीकडे तडजोड न करता हे स्वाभिमानानं आनंदात जगलेले उभयता, पण आज उतारवयामध्ये ही जी काही अवस्था आली, जे काही परावलंबित्व आलं त्यामुळे ते आतल्यात कुठेतरी ढासळत गेले होते. बाह्य सामाजिक परिस्थिती, कौटुंबिक परिस्थिती, आजूबाजूचं वातावरण या सगळ्यांनीच ते काहीसे ढासळून गेलेले होते. आणि जे ठरवून नाशिकला गेले होते तिथे काही मनासारखं झालं नाही. पुन्हा त्यांनी नेरळला परतण्याचा विचार केला. त्यांची कविता उलगडत असताना मला असं जाणवत गेलं की या कविता म्हणजे त्यांनी त्यांचं भाकीतच तर केलं नव्हतं ना! त्यांना पुढे येणारे अनुभवही त्यांनी आधीच कवितेच्या रूपानं मांडून ठेवले होते का? कारण नंतर खरोखरच त्यांच्या आयुष्यात असे काही प्रसंग घटना घडत गेले की त्याचं सूतोवाच कुठेतरी त्यांनी आधीच कवितेत करून ठेवलं होतं का? हे त्यांची कविता वाचताना सतत जाणवत राहातं.

'श्रीमंती आली तरी माजू नये गरिबी आली तरी लाजू नये' हे तत्त्व त्यांनी आयुष्यभर अगदी कसोशीनं पाळलं. म्हणूनच त्यांचा कधीही कविराय किंवा कविराव झाला नाही, तर ते कायमच कवी माणूस म्हणून जगले. कारण माणूसपणावर, नवरचनेवर त्यांचा अधिक विश्वास होता. म्हणूनच ते 'तेवढ्या दर्शनाने' या कवितेत म्हणतात -

'येणाऱ्या नवरचनेस माझाही सलाम सांगा
ह्याच भव्य क्षणासाठी उभी हयात जाळली.'

या माणूसपणासाठी उभी हयात जाळलेल्या असामान्य कवीची संपूर्ण महाराष्ट्र शंभरी साजरी करतोय. त्या कवीचं नाव - नारायण गंगाराम सुर्वे. खरंच सुर्वे, अभिमानानं म्हणावंसं वाटतंय - 'तुम्ही झालात ग्रंथयुगातील एक पान!'

- डॉ. नेहा किशोर सावंत
nehasawant603@gmail.com

अविनाश कोल्हे

२०२५ मध्ये भाऊ पाध्येची ‘वासूनाका’ वाचताना...

नोव्हेंबर महिन्यात भाऊ पाध्येचं (६ नोव्हेंबर १९२६ ते ३० ऑक्टोबर १९९६) जन्मशताब्दीवर्ष सुरू झालं आहे. त्या निमित्तानं भाऊच्या साहित्याची, त्याच्या एकमेव नाटकाची, त्याच्या सिनेमाविषयक लेखनाची चर्चा पुन्हा सुरू झाली आहे, हे योग्यच आहे. खरं तर असं पुनर्मूल्यांकन प्रत्येक पिढीनं पूर्वसुरींच्या योगदानाचं केलं पाहिजे. आपल्याकडे असे प्रयत्न क्वचितच होतात. मराठीतील परंपरा म्हणजे एकदा का एखाद्या साहित्यकृतीचं मोठेपण मान्य झालं की मग पुढच्या पिढ्यांनी त्या मोठेपणाची री ओढायची. नवा विचार, नवी मांडणी, नवं मूल्यमापन करण्याची परंपरा आपल्याकडे फार क्षीण आहे.

एकोणीसशे साठोत्तरी पिढीतली काही नावं आजही चर्चेत असतात. भालचंद्र नेमाडे, अरुण कोलटकर, दिलीप चित्रे आणि भाऊ पाध्ये यांच्या योगदानाबद्दल आजही चर्चा झडत असते. त्यातही भाऊची ‘वासूनाका’ आणि नेमाडेंची ‘कोसला’ याबद्दल सतत लिहिलं जात असतं. या दोन्ही पुस्तकांत एक बारकासा पण महत्त्वाचा फरक आहे. तो म्हणजे ‘वासूनाका’भोवती काही का होईना घोंघावलेले वाद. आनंद साधले यांनी ‘हा जय नावाचा इतिहास आहे’ या पुस्तकाच्या प्रास्ताविकात म्हटलं आहे, की ‘वासूनाका’ या पुस्तकाचं अहोभाग्य असं की या पुस्तकाला प्रशंसक जितके मातब्बर लाभले, तितकचे मातब्बर टीकाकारही. मात्र ‘कोसला’ काय किंवा ‘वासूनाका’ काय, दोन्ही पुस्तकं फार महत्त्वाची आहेत, मैलाचा दगड आहेत, यात तीळमात्र शंका नाही.

मराठीतील कादंबरीकारांच्या तुलनेत भाऊनं भरपूर लिहिलं. त्याच्या नावावर अकरा कादंबऱ्या, चार कथासंग्रह, एक नाटक आणि सिनेमाविषयक तीन पुस्तकं आहेत. दोन आकड्यांत मोजाव्या लागतील एवढ्या कादंबऱ्या लिहिणारे कादंबरीकार आपल्या मराठीत फार कमी आहेत. यात भाऊ पाध्ये हे एक दुर्मिळ नाव आहे. या लेखात ‘कादंबरीकार भाऊ पाध्ये’ एवढाच विचार केला आहे आणि त्यातही लेखाचा सर्व फोकस ‘वासूनाका’ या बहुचर्चित कादंबरीवर आहे. या लेखासाठी डिंपल प्रकाशननं १९८३ मध्ये प्रकाशित केलेलं आणि केशव शिरवाडकरांनी संपादन केलेलं ‘वासूनाका सांगोपांग’ हे पुस्तक समोर ठेवलं आहे.

भाऊची ग्रंथसंपदा

भाऊची पहिली कादंबरी म्हणजे ‘डोंबाऱ्याचा खेळ’. ही १९६० मध्ये प्रसिद्ध झाली. त्यानंतर ‘करंटा’ १९६१ मध्ये तर ‘वैतागवाडी’ १९६४ मध्ये प्रसिद्ध झाल्या. त्यांतर १९६५ मध्ये ‘वासूनाका’ आली आणि मराठी साहित्यात एकच भडका



भाऊ पाध्ये

उडाला. असा भडका उडाला नसता जर आचार्य अत्रे यांनी 'मराठा'तून 'वासूनाका'वर कडक शब्दांत टीका केली नसती. अत्रेंच्या मते भाऊ पाध्ये म्हणजे साहित्यिक परंपरा गढूळ करणारा करंटा लेखक. अत्रेंनी असंही लिहिलं होतं, की 'भाऊ पाध्येसारखा घाणरेडा कागदखराब्या या महाराष्ट्रभूमीत आजपर्यंत कधी जन्माला आला नसेल. संडासात आपली लेखणी बुडवून भाऊ पाध्याने जेव्हा हे भयानक 'वासूनाका' लिहिले तेव्हा त्याची बोटे महारोगाने का झडली नाहीत किंवा त्याच्या मेंदूला कॅन्सर का झाला नाही, असे ते चोपडे वाचताना वाटू लागते.'

या जहाल अग्रलेखामुळे आणि मराठी साहित्यविश्वात तेव्हा आचार्य अत्रेंचा दबदबा बघता मराठी वाचकांचं लक्ष 'वासूनाका'कडे वेधलं गेलं तरी ते चुकीच्या कारणांसाठी होतं, हे लक्षात घेतलं पाहिजे. असं असलं तरी, आनंद साधलेंनी नोंदवल्याप्रमाणे 'वासूनाका'ला जसे टीकाकार लाभले तसेच प्रशंसकसुद्धा. 'वासूनाका'ला प्रा. दि.के. बेडेकरांचं ब्लर्ब आहे. त्यात बेडेकर लिहितात, 'मुंबापुरीच्या अजस्र, अस्ताव्यस्त, गहिऱ्या जीवनावर सभ्य पांढरपेशाचा फेस इथे तिथे संथ रेंगाळत असतो. त्याचा चिकट गढूळ गाळ मात्र अशा पाखाड्यातून व नाक्यांवरून ढवळत हिंदकळत असतो. पाप व पुण्य, सभ्य व असभ्य असे भेद या गाळात बुडून नाहीसे झालेले आहेत. सारेच विलक्षण व भेसूर वास्तव आहे व ते या नाक्यावरच्या टोळक्याला साधे रोजचे वाटत आहे. भाऊ पाध्ये यांनी या वास्तवाचा उग्र कुबट वास या कथांतून पकडला आहे.' फार क्वचित एवढं मर्मग्राही आणि समर्पक ब्लर्ब वाचायला मिळतं. (इथे मला प्रा. स.शि. भावे यांनी श्री.ज. जोशींच्या 'रघुनाथाची बखर'ला लिहिलेलं ब्लर्ब आठवलं). मराठीतील त्या काळातील नामवंत समीक्षकांत फक्त बेडेकर असं ब्लर्ब लिहू शकले असते. हे काम वा.ल. कुलकर्णी, द.भि. कुलकर्णी, व.दि. कुलकर्णी वगैरे मध्यमवर्गीय समीक्षकांना जमलं नसतं. इथे कोणाच्या आकलनाबद्दल कॉमेंट करायची नाही, तर बेडेकरांसाठी आणि भाऊ पाध्येसाठी 'वासूनाका', 'वालपाखाडी' हे lived experiences होते. म्हणूनच तर बेडेकरांनी 'वासूनाका'चं वेगळेपण बरोबर पकडलं आहे. बेडेकर तरूणपणी भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे पूर्ण वेळ कार्यकर्ते होते. या निमित्तानं त्यांना मुंबईतील कामगारविश्वात आणि कामगारवस्तीत भरपूर फिरावं लागले. भाऊनं या कथांत पकडलेला काळ म्हणजे १९५५ ते १९५७ च्या दरम्यानची मुंबई आहे. याचा पुरावा म्हणजे कथांत एकदोन ठिकाणी संयुक्त महाराष्ट्र समितीच्या सभा, १९५७ सालच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या प्रचाराचं वातावरण, असे उल्लेख आहेत. (६ फेब्रुवारी १९५६ रोजी 'संयुक्त महाराष्ट्र समिती' स्थापन झाली.). त्यामुळे बेडेकरांना भाऊला दिसलेला वर्ग, त्या वर्गाचं जीवन, त्यात असलेले तसेच नसलेले अग्रक्रम वगैरे बघायला



मिळाले. 'वासूनाका'तील पोक्या, फोमण्या, मामू वगैरे तरूण मुलं म्हणजे अगदी मर्यादित अर्थानं Lumpen Proletariat. भाऊनं यातील एकाही पात्राला अडनाव दिलेलं नाही. हे फार अर्थपूर्ण आहे. पोक्या-फोमण्या-बश्या कोण आहेत? पोक्या रानडे? फोमण्या पेंडसे? मामू देशमुख? की पोक्या बनसोडे? बश्या कांबळे भारतीय साहित्यात आणि समाजात 'जात' आणि जातीभोवती असलेलं सामाजिक वास्तव, टाळता येत नाही. भाऊला मात्र 'वासूनाका'त हे जमलं.

मराठी लेखकांच्या अनुभवविश्वाच्या तुलनेत भाऊचं अनुभवविश्व खूप समृद्ध होतं. त्यानं रूईया कॉलेजात शिकत असताना प्राध्यापक यू.यू. भट यांच्या सूचनेनुसार कामगार चळवळीचा अभ्यास चळवळीत सहभागी होऊन केला. शिवाय वडाळा इथे असलेल्या स्प्रिंग मिलमध्ये चार वर्षं नोकरी केली. त्या दरम्यान त्याला दिसलेलं जग त्यानं 'डोंबाऱ्याचा खेळ' या त्याच्या पहिल्या कादंबरीत आणलं. त्याआधी मराठी कादंबरीत कामगार, युनियन, कामगार नेत्यांतील हेवेदावे वगैरे विषय आलेच नव्हते. अपवाद मामा वरेरकरांच्या 'धाकटा धोटा'चा. स.शि. भावेसरांच्या मते 'डोंबाऱ्याचा खेळ' ही एक महत्त्वाची राजकीय कादंबरी आहे.

भाऊच्या लेखनाचं महत्त्वाचं वैशिष्ट्य म्हणजे त्याच्या लेखनात 'मुंबई महानगर' हे महत्त्वाचं पात्र असतं. 'वैतागवाडी' या त्याच्या १९६४मध्ये प्रसिद्ध झालेल्या दुसऱ्या कादंबरीत 'मुंबईतील घराची समस्या' केंद्रस्थानी आहे. ही समस्या आजही आहे.

भाऊचा 'वासूनाका'

काकतकरांच्या 'रहस्यरंजन'मध्ये भाऊची पहिली कथा 'इश्क' १९६० मध्ये प्रसिद्ध झाली. या कथेतील 'भानू' भाऊला अक्षरशः दिसली होती. भाऊनं तिची कथा लिहून काढली. ती वाचकांना आवडली. त्यानंतरची 'फिरकी' ही दुसरी कथासुद्धा 'रहस्यरंजन'मध्ये प्रकाशित झाली. नंतर ते मासिक बंद पडलं. या दोन कथांनंतर भाऊनं 'धमाल', 'इशारा', 'खुजली', 'दिलफेक', 'सामना', 'मेहमान', 'आवाज' मिळून एकूण नऊ कथा लिहिल्या. सुरुवातीला या लेखनाला भाऊ 'कथा' म्हणत असे. भाऊची एक दीर्घ मुलाखत प्रा. रेखा बेहेरेंनी घेतलेली आहे. ही मुलाखत 'वासूनाका सांगोपांग'मध्ये आहे. यात भाऊनं या कथा म्हणूनच लिहिल्याचं मान्य केलं आहे. याच मुलाखतीत भाऊ सांगतो, 'या कथा वेगवेगळ्या वेळी लिहिल्या



होत्या. कादंबरीप्रमाणे एक सूत्र धरून लिहिल्या नव्हत्या.' पुढे 'नवशक्ती'मध्ये पुरुषोत्तम बावकरांनी 'वासूनाका'ला 'न्यू वेव्ह कादंबरी' म्हटलं. त्यानंतर भाऊसुद्धा ती कादंबरी आहे, असं मानू लागला. सिनेमा दिग्दर्शक जसा वेगवेगळी दृश्यं चित्रित करतो आणि नंतर त्यातून सिनेमा बनवतो, तशी वासूनाका असल्याचं मांडलं जाऊ लागलं. अर्थात काही अभ्यासक आजही 'वासूनाका'ला कादंबरी मानायला तयार नाहीत. हा वादाचा विषय आहे एवढं नक्की.

'वासूनाका' येण्याअगोदर मराठीत मोठ्या प्रमाणात संस्कारी कादंबऱ्यांची चलती होती. सर्वगुणसंपन्न, त्यागी नायक-नायिका, त्यांच्या मिलनात अडथळे आणणारे खलनायक (हा खलनायक अनेकदा भारतातील जातिव्यवस्था असे, तर कधी दोघांच्या आर्थिक स्थितीतील दरी), असं ढोबळ कथानक. ते मांडलं जायचं बेगडी, अलंकारिक भाषेत. या पार्श्वभूमीवर भाऊची पोक्या, फोमण्या, मामू वगैरेसारखी तरुण मुलं आणि केशरवडी, सू यांसारख्या लफडेबाज मुली अवतरल्या. त्यांची भाषा, जीवनव्यवहार वाचून उच्चवर्णीय-मध्यमवर्गीय वाचकांचं भावविश्व अक्षरश: गरगरलं. केवळ तेव्हाच नव्हे तर आज २०२५ मध्येसुद्धा 'वासूनाका'ची भाषा हबकवते. ही काही उदाहरणं बघा : 'म्हणजे त्या टायमाला खरी ब्युटी कोण आणि आरडिनरी माल कोठचा हे आम्हाला कळत नव्हतं' (पृ. ४६). 'मग एक दिवस बाबलनं तिला गोकूळच्या घरातून उचललीच. पण मग गोकूळ काय गप्प राहातोय? त्यानं बाबलच्या बायकोला म्हणजे रमणच्या आईला पळवली. झाली का फिटंफाट' (पृ. १३८). बश्या डेंगळेला ऐकवतो, 'हे बघ, सूवर, सील तुझं लागलं असलं तरी माल माझा आहे. समजलास? तो मी लागेल तेव्हा घेऊन जाऊ शकतो.' (पृ. ८०). 'बुलंद थानांची माना' अशा उपमा आजही वाचताना वाचक गडबडतो.

भाऊची केवळ भाषाच वेगळी नाही तर 'वासूनाका'तील जीवनव्यवहारात वेगळ्या प्रकारचा प्रामाणिकपणा आहे. तोपर्यंत मराठी वाचकाला विजयी होणारे नायक वाचण्याची सवय होती. 'वासूनाका'नं पारंपरिक सर्वगुणसंपन्न नायकांना फाटा दिला आणि स्वत:चं अपयश मान्य करणारे नायक समोर आणले. 'वासूनाका'तील कल्पकता वेगळ्या प्रकारची आहे, हेही लक्षात घेतलं पाहिजे. भाऊनं रंगवलेलं जग म्हणजे काही मार्केझचं 'मॅजिक रिॲलिझम'चं जग नाही. अर्थात भाऊनं तसा कधी दावासुद्धा केला नाही. भाऊच्या जगात रखरखीत वास्तव आहे. असं रखरखीत वास्तव गाडगीळ, गोखले, भावेंच्या कथांतही आहे. मात्र गाडगीळ वगैरे लेखकांचं जग म्हणजे हिंदू समाजव्यवस्थेतील पहिल्या वर्णातील समाजाचं जग. भाऊनं रंगवलेलं जग हे दुसऱ्या आणि तिसऱ्या वर्णातील समाजाचं जग आहे. हे निरीक्षण नोंदवताना भाऊनं चौथ्या वर्णातील समाजाचं म्हणजे दलित समाजाचं जग चितारलं नाही, हेही लक्षात येतं. हे ऐतिहासिक कार्य बाबूराव बागुल, नामदेव ढसाळ वगैरेंनी केलं.

भाऊच्या लेखनप्रेरणा

इतर सुशिक्षित व्यक्तीप्रमाणे भाऊ अधूनमधून साहित्याचं वाचन करत होता. त्याच्यावर प्रभाव पाडणारं लेखन म्हणून भाऊनं अनेकदा रिचर्ड राईट (१९०८-१९६०) या अमेरिकेतल्या कृष्णवर्णीय लेखकाच्या १९४५ मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'ब्लॅक बॉय' या आत्मचरित्राचा उल्लेख केला आहे. या आत्मचरित्रात राईटनं अमेरिकेत कृष्णवर्णियांना कसं अजूनही वंशवादी धोरणांचा, दारिद्र्याचा सामना करत जगावं लागतं, याचं हृदयस्पर्शी चित्रण केलं आहे. भाऊला हे लेखन आवडलं. तरी या पुस्तकाला समोर ठेवून त्यानं 'वासूनाका' लिहिलं नाही. 'वासूनाका'त जातिव्यवस्था हा विषय येतच नाही. राईटच्या लेखनातून भाऊला कदाचित फोमण्या-पोक्या यांसारख्या तरुणांचं परिघाबाहेरचं जग पकडता येईल, याचा विश्वास वाटला असावा.

याचप्रमाणे प्रा. रेखा बेहेरे यांना दिलेल्या मुलाखतीत भाऊ अमेरिकन लेखक जॉन स्टाईनबेकचा (१९०२ ते १९६८) उल्लेख करतो. स्टाईनबेकनं 'द पास्चर्स ऑफ हेव्हन'मध्ये लघुकथांचं एक चक्र फिरवून दाखवलं. स्टाईनबेकच्या दहा कथांत एकच लोकेशन आहे आणि पात्रं तीच आहेत. भाऊनं स्टाईनबेकच्या या पुस्तकाचं ऋण मान्य केलं आहे. 'वासूनाका'तील कथांत अनेकदा तीच पात्रं असतात आणि लोकेशन तर तेच असते. दुर्गा भागवत यांनी लिहिलेल्या लेखात (अभिरूची, मार्च १९६६) हाच मुद्दा अधोरेखित केला आहे.

इथे आणखी एक मुद्दा नमूद केला पाहिजे. भाऊच्या 'वासूनाका'त मुंबई महानगर हे महत्त्वाचं पात्र आहे. हे महानगर एक पात्र म्हणून वेगळ्या अर्थानं पुल देशपांडेंच्या 'बटाट्याच्या चाळी'त आलं आहे तसंच श्री.ना. पेंडसेंच्या 'लव्हाळी'तही आलं आहे. मात्र पेंडसे आणि पुलंच्या लेखनात पहिल्या वर्णातील समाजाचं चित्रण आहे तर भाऊनं दुसऱ्या आणि तिसऱ्या वर्णातील समाज डोळ्यांसमोर ठेवला आहे. त्यानं आणलेला समाज म्हणजे चांगल्या भविष्याची स्वप्नं नसलेल्या तरुणांचं टोळकं आहे, पण टोळी नाही. ही मुलं छोट्यामोठ्या नोकऱ्या करणारी आहेत. या कथांत अनेक ठिकाणी 'म्हणून त्याने कायमची रात्र पाळी मागून घेतली', 'मी मिलमधून आलो', असे उल्लेख येतात. ज्या नोकऱ्या 'वासूनाका'वरचे

मेंबर करत आहेत, त्यातून त्यांच्या जगणात फार मोठा सकारात्मक बदल होणार नाही. दुसरं म्हणजे, त्यांच्या जीवनाकडून अगदी जुजबी अपेक्षा आहेत. 'दिलफेक'मधला अच्च्या म्हणतो 'दिवसाला पाच रुपये सुटतात. आणखीन काय पायजे आपल्याला? मयन्यातून एक वुलन पँट सुटते : इजी!' (पृ.१७१). ही प्रातिनिधिक मानसिकता आहे.

हे मेंबर म्हणजे संघटित गुन्हेगारांची टोळी नाही. त्यांना भल्याबुऱ्याची चांगली समज आहे. पोक्या-फोमण्यानंतरची 'वासूनाक्या'वरची पिढी म्हणजे अच्चा वगैरे तरुण पिढी. 'दिलफेक' कथेत निवेदक लिहितो, मत्यांचे आईबाप त्यांना चांगलं शिक्षण द्यायला मागत होते तर यांना शिकायला नको. चांगलं लाईनशीर राहायचं सोडून जर ही मुलं वाईट लायनीला गेली तर त्याची जिम्मेदारी कोणावर येईल? आमची वासुनाक्यावरची कंपनी अशा मुलांना मुळीच थारा देणार नाही. (पृ. ७१). दुर्गाबाई नमूद करतात तसं 'वासूनाक्या'वरचे मेंबर उन्मार्गी आहेत, वाममार्गी नाहीत.

पोक्या, मामू वगैरे 'वासूनाक्या'च्या आजच्या मेंबरना मध्यमवर्गीय नैतिकता माहिती नाही. त्यांना पारंपरिक नैतिकता बांधून ठेवत नाही. म्हणूनच या कथांतील पात्रं अनेकदा उघडपणे वेश्यागमनाचे उल्लेख करतात. 'दिलफेक' या कथेत पगार झाल्यावर मेंबर दिलफेक करायला मंजुळा नावाच्या वेश्येकडे जातात, असा थेट उल्लेख आहे. मंजुळाच का, तर ती मेंबरची 'रजिस्टर वेश्या' आहे (पृ. ६९) या कथांतील फक्त पुरुषांचीच अशी मानसिकता आहे, असं नाही. यातील मुली आणि महिलासुद्धा संभोगासाठी फार आढेवेढे घेत नाहीत, चटकन तयार होतात. अनेकदा तर स्वत: पुढाकार घेतात. फक्त एकाच पुरुषाशी एकनिष्ठ असलं पाहिजे, हेही मान्य नाही. डाफ्या आधी येप्पीचा मुका घेतो आणि नंतर तिला म्हणतो, 'आता पोक्याला दे'. ती लगेच देते. आज २०२५मध्येसुद्धा हे उल्लेख वाचताना दचकायला होतं, तर १९६५ मध्ये 'वासूनाका' प्रसिद्ध झाली तेव्हा मराठी वाचकांना केवढे धक्के बसले असतील, याची कल्पनाच केलेली बरी. हे मेंबर वेश्यागमन करणारे असले, 'वासूनाक्या'वर आलेल्या मुलींवर उंगली चालवणारे असले, तरी स्वत:च्या किंवा इतरांच्या आई-पत्नीबद्दल कधीही अपशब्द वापरत नाहीत. निवेदकाची पत्नी मंगळागौर जागवायला असा उल्लेख पृष्ठ क्रमांक ३१ वर आहे. त्यांना संसारी, सभ्य स्त्रियांबद्दल आदर आहे. म्हणूनच बायजी विधवा झाल्यावर जेव्हा गुण उधळते, तेव्हा सर्व मेंबर क्रूरपणे तिच्यावर तुटून पडतात.

'वासूनाका'चं वेगळेपण

'वासूनाका' प्रसिद्ध होईपर्यंत मराठी कथा सहसा घर, ऑफिस वगैरेसारख्या सुरक्षित ठिकाणी घडत असत. श्री.ज. जोशींच्या अनेक कथा घरात घडतात. भाऊनं कथांचं लोकेशन आमूलाग्र बदललं. भाऊच्या कथांत 'रस्ता', 'रात्री दुकानं बंद झाल्यावर त्या दुकानाच्या फळ्या' वगैरेसारखी जगावेगळी लोकेशन आढळतात. याचप्रमाणे 'वासूनाका'च्या आधीच्या बहुतेक कथांत 'कुटुंब' केंद्रस्थानी होतं. भाऊनं कोपऱ्यावरचा 'नाका' आणि तिथं सतत पडीक असलेले मेंबर यांना समोर आणलं. म्हणून 'वासूनाका'त आईवडील, मामा, काका, मावशी, वहिनी वगैरे उल्लेख अगदी तुरळक आहेत. एका मर्यादित अर्थानं भाऊची पात्रं कुटुंबव्यवस्थेतून बाहेर पडलीत.

साहित्याच्या अभ्यासाच्या संदर्भात 'कथांचा काळ' हा महत्त्वाचा घटक असतो. वर पेंडसेंच्या 'लव्हाळी'चा तसंच पुलंच्या 'बटाट्याच्या चाळी'चा उल्लेख आला आहे. या कलाकृतीतील काळ स्वातंत्र्य मिळण्याच्या काही वर्षं अगोदरचा आहे. म्हणजे १९४०च्या दशकातील उत्तरार्ध. 'लव्हाळी'चा शेवट तर १५ ऑगस्ट १९४७ रोजी होताना दाखवला आहे. या दृष्टीनं 'वासूनाका'चा काळ १९५५ ते १९५७ च्या सार्वत्रिक निवडणुकांच्या दरम्यानचा आहे. म्हणजे स्वतंत्र होऊन सात-आठ वर्षं झाली होती. वातावरणात पंडित नेहरूंच्या काळातला आशावाद होता. 'वासूनाका'तील काळ समजून घेण्यासाठी 'एखाद्या मोहल्ल्यात काँग्रेसची प्रचाराची गाडी फिरल्यावर मग त्यांचा प्रचार खोडून काढण्यासाठी समितीची गाडी फिरते, तशा मामूच्या आईच्या आणि भानूच्या फेऱ्या होत होत्या,' हा पृष्ठ १४ वरचा उल्लेख पुरेसा आहे. या उल्लेखाच्या जोडीनं 'वासूनाका'त आलेल्या इंग्रजी सिनेमांचे उल्लेखसुद्धा अर्थपूर्ण ठरतात. अनेक ठिकाणी 'मिलियन पाउंड नोट', 'हायवे ३०१', 'गन्स ऑफ नव्हेरोन' वगैरे सिनेमांचे उल्लेख आढळतात.

एकोणीसशे ऐंशीच्या दशकात मुंबईतील मध्यमवर्गीय मराठी कुटुंबात 'शहरांतर्गत स्थलांतर' (internal migration) मोठ्या प्रमाणावर सुरू झालं. म्हणजे गिरगाव-दादरच्या छोट्या जागा विकून बोरीवली-ठाणे इथे मोठ्या जागा घेणं, हे प्रकार १९८०च्या दशकात सुरू झाले. 'वासूनाका'त या प्रक्रियेची सुरूवात आढळते. 'वासूनाका'च्या तिसऱ्या पिढीचा दादा अच्चा वासूनाका सोडून दूर विक्रोळीला बिटींगचा सेपरेट धंदा काढतो (पृ. ८५). वासूनाका सोडून डोंबिवलीला जावं लागलेला गोम्या वासूनाक्याच्या आठवणी काढतो (पृ. ६५).

भाऊच्या 'वासूनाका'नं मराठी साहित्यातील भाषेच्या वापराचे सर्व संकेत धुडकावून लावले आणि वेगळ्या प्रकारची भाषा वाचकांसमोर आणली. तसंच, या भाषेतून एक प्रकारचा तिरकसपणा व्यक्त केला. शिवाय भाऊनं मराठी-हिंदी-इंग्रजी अशा तिन्ही भाषांचा मूबलक वापर केला. जानेवारी १९७४मध्ये प्रकाशित झालेल्या किरण नगरकरच्या 'सात सकं त्रेचाळीस'चं अनेक कारणांनी उदंड कौतुक झालं. त्यापैकी एक कारण म्हणजे किरणनं केलेला तीन भाषांचा कल्पक उपयोग (थ्री लंग्वेज फॉर्मुला), पण असा वापर भाऊनं आधीच केलेला होता. आज

जिला 'बम्बय्या मराठी' म्हणतात त्याचा मुक्त आविष्कारसुद्धा भाऊच्या लेखनात दिसतो. 'मी खतमच झालो' (पृ. १२), 'तिच्याशी पहेछान करून दे' (पृ. १५), 'एक दिवस मसू'ने आमच्याशी पंछीगिरी केली (पृ. ३२). अशी अफलातून वाक्यं या कथासंग्रहातील पानांपानांवर विखुरलेली आहेत. अशाच भाषेतून भाऊनं तिरकस जीवनदृष्टी प्रभावीपणे व्यक्त केली आहे. 'आमचे इथे श्रीचे कृपेकरून आमची आणि बश्याचा प्रायवेट माल सू हिचा विवाह गोरज मुहूर्तावर करण्याचे योजले आहे. तरी आपण लेकीसुना तश्याच रांडा आणि भडवे यांच्यासह येऊन कार्य सिद्धीस नेण्याचे करावे' (पृ. ४०).

इचलकरंजीला १९७४मध्ये भरलेल्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून केलेल्या भाषणात पु.ल. देशपांडे म्हणाले होते, की साठोत्तर पिढीनं आमच्या पिढीला डुलक्या घेताना पकडले (they caught us napping). आता वासूनाका वाचताना या विधानातील सत्य जाणवतं.

याचा अर्थ 'वासूनाका'मध्ये काही दोष नाहीत का? तर आहेत. या कथानकाला एकच एक सूत्र नाही. अनेकदा पात्रं तीच असतात, लोकेशन तेच असतं, फक्त प्रसंग बदलतात. तीन-चार कथा वाचल्यानंतर एकंदर वातावरणाचा तसंच कथावस्तूचा अंदाज येतो आणि कथानकातील नावीन्य संपतं. दुसरं म्हणजे फार मोठ्या प्रमाणात 'घटनाप्रधानता' असलेल्या या कथा आहेत. कदाचित नवकथेनं मनाचे जे पापुद्रे काढले होते, नंतर त्याचा अतिरेक झाला, म्हणून मग 'वासूनाका'तील टोकाच्या घटनाप्रधानता असलेल्या कथा समोर आल्या असतील. मात्र आज २०२५मध्ये वाचताना या कथांत सतत घडत असलेल्या घटना अंगावर येतात. तिसरं म्हणजे 'वासूनाका' वाचताना वेगळ्या प्रकारे व्यंकटेश माडगूळकरांच्या 'माणदेशी माणसं'ची आठवण येत होती. 'माणदेशी माणसं'मध्ये कसं ग्रामीण भागातील निरनिराळ्या व्यक्ती वाचकांसमोर येतात, तसं 'वासूनाका'त मुंबई महानगरातील वेगवेगळ्या प्रकारच्या व्यक्ती वाचकांसमोर येतात. शहरी वाचकांना शिवाजी पार्क, हिंदू कॉलनी, गिरगाव, विलेपार्ले येथील मध्यमवर्गीय माणसांबद्दल वाचायची सवय होती. अशा वाचकांना पोक्या, फोमण्या, डाफ्या, केशरवडी, सू वगैरे पात्रांचं अप्रूप वाटणं किंवा आचार्य अत्रेंना आली तशी घृणा येणं स्वाभाविक म्हणायला हवं.

या मर्यादा मान्य केल्या तरी मराठी साहित्यातील अजरामर कलाकृती म्हणून 'वासूनाका'चं स्थान अढळ आहे, यात शंका नाही.

– प्रा. डॉ. अविनाश कोल्हे
nashkolh@gmail.com

॥ग्रंथाली॥

वसई-विरार येथील वाचकदिनी प्रसिद्ध पुस्तके

स्टॅन्ली गोन्सालविस लिखित
अबोलीचे बोल



मूल्य २५० रुपये
सवलतीत १५० रुपये

लेस्ली डायस लिखित
साँग ऑफ इंडिया



मूल्य ३५० रुपये
सवलतीत २१० रुपये

अपर्णा पाटील

उत्तुंग पर्व

डॉ. एस. एल. भैरप्पा यांच्या साहित्याची भारतीयांना भुरळ का पडली, याची कारणं त्यांच्या जडणघडणीतून झालेल्या अभिव्यक्तीमध्ये सापडतात. त्यांच्या कादंबरीतील अनेक व्यक्तिरेखा या त्यांच्या आयुष्याचा भाग होत्या. काही कुटुंबातीलच होत्या. काही प्रसंग, घटना त्यांच्या आयुष्याचे भाग होते. त्यामुळे त्यांच्या लेखणीतून उतरलेली कथानकं, पात्रं जिवंत झाली. त्यामुळेच ती वाचकाच्या मन:पटलावर कायमची कोरली गेली.

लेखक आपल्याला आलेले अनुभव साहित्यातून मांडत असतो. कोणी त्याला कल्पनेचे पंख लावतो, तर कोणी त्याला वास्तवातून अतिवास्तवाकडे नेत असतो. आपल्या वाट्याला आलेले अनुभव, माणसं आणि प्रसंग लिहीत नाही, असा एकही साहित्यिक जगात सापडणार नाही. डॉ. एस.एल. भैरप्पा हे कन्नड साहित्यिकही त्यापैकी एक. भैरप्पा हे कन्नड साहित्यक्षेत्रात अर्ध्या शतकाहून अधिक काळ गाजलेलं नाव ठरलं. १९५८ ते २०१७ दरम्यान त्यांनी सुमारे २४ (काही संदर्भांनुसार २६) कादंबऱ्या लिहिल्या. त्यांनी लिहिलेल्या बहुसंख्य कादंबऱ्यांचे वेगवेगळ्या भारतीय भाषांत अनुवाद झाले, तसे मराठीतही झाले. १९८७मध्ये 'वंशवृक्ष'चा मराठी अनुवाद प्रसिद्ध झाला. त्यानंतर भैरप्पा यांना मराठी वाचकांमध्ये लोकप्रिय कादंबरीकार म्हणून स्थान मिळालं. अन्य भाषिक वाचकांच्या तुलनेत मराठी वाचकांना भैरप्पा अधिक आपलेसे वाटले. त्यांनीही मराठी वाचकांचं हे ऋण आयुष्यभर मान्य केलं. त्यांच्या बहुतांश कादंबऱ्या आणि अगदी आत्मचरित्रही मराठीत प्रकाशित झालं. 'भित्ती' हे मूळ कन्नड आत्मचरित्र मराठीत 'माझं नाव भैरप्पा' नावानं प्रकाशित झालं. उमा कुलकर्णी यांनी त्यांच्या आत्मचरित्रासह अनेक कादंबऱ्या मराठीत अनुवादित केल्यानं भैरप्पा महाराष्ट्रातील घराघरात पोहोचले आणि मराठी वाचकांच्या मनात कायमचं घर करून विसावले.



डॉ. एस. एल. भैरप्पा

कन्नड साहित्यात भैरप्पा यांचे समकालीन आणि दर्जेदार तसंच प्रदीर्घ कादंबऱ्या लिहिणाऱ्या लेखकांची भलीमोठी यादी आहे. या यादीत स्थान मिळवत बेस्टसेलर कादंबरीकार होण्यापर्यंतचा भैरप्पा यांचा प्रवास सोपा नव्हता. त्यांच्या 'वंशवृक्ष', 'पर्व', 'दाटू' (मराठीत जा ओलांडुनी), 'धर्मश्री', 'तंतू', 'तडा', 'आवरण', 'उत्तरकांड, 'काठ, 'साक्षी', 'यान', 'सार्थ' या कादंबऱ्या वाचकांनी उचलून धरल्या. तोपर्यंत

त्यांच्या आयुष्यात काय घडलं, याची वाचकांना फारशी माहिती नसावी. आत्मचरित्र प्रकाशित झाल्यावर मात्र अस्वस्थ करून टाकणारं त्यांचं आयुष्य वाचकांसमोर आलं. त्यावेळी त्यांच्या कादंबरीतील व्यक्तिरेखांच्या मनोव्यापाराची, प्रसंगांची अगदी कथानकांची नाळ थेट त्यांच्या आयुष्याशी जोडली गेल्याचा उलगडा झाला.

भैरप्पा यांनी १३ वर्षांचे असताना स्वातंत्र्याच्या चळवळीत भाग घेतला. त्यामुळे त्यांच्या शिक्षणात खंड पडला. प्राथमिक शिक्षण पूर्ण केल्यावर त्यांनी पुढच्या शिक्षणासाठी म्हैसूरला जायचं ठरवलं. दरम्यान भावाच्या सांगण्यावरून शिक्षण सोडून त्यांनी भ्रमंती केली. मुंबईला रेल्वे पोर्टर म्हणून काही काळ काम केलं. काही काळ ते आध्यात्मिक शांतीच्या वाटा धुंडाळत राहिले. थोडे महिने साधुसंतांबरोबर फिरल्यानंतर ते म्हैसूरला परतले. त्यांनी शिक्षण पूर्ण करायचं ठरवलं. मग बडोद्याच्या सयाजीराव विद्यापीठातून त्यांनी तत्त्वज्ञान विषयात डॉक्टरेट मिळवली. हुबळी महाविद्यालय, गुजरातचं सरदार पटेल विद्यापीठ, दिल्लीतील राष्ट्रीय शिक्षण संशोधन आणि प्रशिक्षण परिषद (एन.सी.ई.आर.टी.) अशा संस्थांमध्ये भैरप्पा यांनी अध्यापनाचं काम केलं आणि पुन्हा एकदा म्हैसूरला परतले. १९९१मध्ये रिजनल कॉलेज ऑफ एज्युकेशनमधून निवृत्त होईपर्यंतचं त्यांचं आयुष्य मात्र विलक्षण घटनांनी भरलेलं होतं.

या सगळ्या घडामोडींनी भरलेल्या काळात भैरप्पा यांनी १९५८पासून कादंबरीलेखनास आरंभ केला. त्यांनी पहिली कादंबरी 'भीमकाया' लिहिली. तेव्हापासून ५०हून अधिक वर्षं ते लिहीत राहिले. सर्वाधिक विक्री झालेल्या २२ कादंबऱ्या लिहिणारे भारतीय लेखक म्हणून त्यांचं नाव आवर्जून घेतलं जातं. 'आवरण' या कादंबरीच्या चार वर्षांत ३४ आवृत्त्या निघाल्या, हा भारतीय कादंबरीविश्वातला विक्रमच म्हणता येईल. भैरप्पा यांनी आयुष्यातील बहुसंख्य काळ लिखाणात व्यतीत केला. त्यामुळेच प्रत्येक कादंबरीमध्ये त्यांच्या जीवनातील वैशिष्ट्यपूर्ण, थोडा-थोडा कालखंड झिरपलेला दिसतो.

भैरप्पा यांनी गुंतागुंतीच्या आयुष्याचा पट मांडणाऱ्या, मानवी जीवनावर भाष्य करणाऱ्या कथानकांवर भर दिला. त्याचं मूळ त्यांच्या आयुष्यातील घटनांमध्ये सापडतं. त्यांच्या कादंबऱ्यात त्यांचं व्यक्तिगत अनुभव, संघर्ष, शैक्षणिक जीवन, तत्त्वज्ञानाचा अभ्यास, समाजाविषयीची निरीक्षणं आणि इतिहास संशोधन यांची सरमिसळ झालेली दिसते. त्यांच्या वाट्याला आलेला संघर्ष आणि त्यांनी दाखवलेली जिद्द त्यांच्या कादंबऱ्यांमधील घटना आणि व्यक्तिरेखांमध्ये उतरलेली दिसते. त्यांच्या व्यक्तिरेखा नेहमीच आत्मसंघर्ष आणि जगण्याच्या लढाईत गुंतलेल्या दिसतात. त्याचं कारण भैरप्पा यांच्या जडणघडणीत दडल्याचं, आपण म्हणू शकतो. त्यांच्या आत्मचरित्रातून त्यांच्या आयुष्यातील संघर्ष, चढउतार आणि त्यांनी घेतलेली झेप यांचा परिचय खूप पुढे वाचकांना झाला आणि मात्र त्यानंतर ते त्यांच्या कादंबऱ्यांमधून नव्यानं सापडले. त्यांच्या लिखाणाचा धांडोळा घेताना, त्यांच्या भूमिका, सामाजिक भान, विचारसरणी आणि त्याबरोबर ओढवलेले वाद याची चर्चा आजवर अनेकदा झाली आहे. पण त्यांच्या कादंबरीतून विखुरलेल्या त्यांच्या आयुष्याच्या पाऊलखुणा फारच कमी वाचकांच्या दृष्टीला पडल्या. भैरप्पा यांचं साहित्य पुन्हा वाचल्यानंतर मात्र त्यांनी आपलं आयुष्य नकळत वाचकांसमोर मांडून ठेवल्याचा साक्षात्कार होतो.

भैरप्पा यांचं पूर्ण नाव सांतेशिवारा लिंगणय्या भैरप्पा. त्यांचा जन्म १९३१ मध्ये कर्नाटकातील हसन जिल्ह्याच्या एका खेड्यातील अत्यंत गरीब कुटुंबात झाला. घरची परिस्थिती बेताची असल्यानं त्यांना बालपणी अनेक अडचणींना सामोरं जावं लागलं. आईच्या अचानक मृत्यूमुळे त्यांचं भावविश्व उद्ध्वस्त झालं. घरातील ताण-तणाव, अस्थिरता याचे ओरखडे त्यांच्या बालमनावर उमटले. त्यातच एकदा ते आजारानं मृत्यूच्या दारात पोहोचले. त्या आजारपणाच्या काळात एकटेपणा, असुरक्षितता आणि असहाय्यतेच्या भावनेनं ते एकाकी झाले. त्यांचं बालपण खेड्यात गेल्यानं प्रथा-परंपरा, श्रद्धा-अंधश्रद्धा यांचा परिचय त्यांना झाला. सामाजिक नियम, जात-धर्म भेदाभेद पाहिले. त्यामुळे बदलत जाणारं माणसांचं आयुष्य पाहिलं. या सगळ्यामुळे जो परिणाम त्यांच्या जडणघडणीवर झाला आणि त्याचं प्रतिबिंब त्यांच्या साहित्यात उमटलं.

भैरप्पा यांचा जन्म ज्या गावात झाला होता, त्या सांतेशिवारा गावाचा उल्लेख त्यांच्या वेगवेगळ्या कादंबरीत येतो. त्यांची भावंडं आणि आई यांचा अकाली मृत्यू झाला. पंधरा वर्षांचे असताना त्यांना आपल्या भावाचं पार्थिव अंत्यसंस्कारासाठी खांद्यावरून न्यावं लागलं होतं. वाळलेली पानं, झाडाझुडपांत अग्नी द्यावा लागला होता. किशोरवयीन भैरप्पा यांच्या वाट्याला आलेले हे प्रसंग अतिशय दुःखद होतं. घरातल्या परिस्थितीमुळे त्यांना कष्ट करायला भाग पाडलं. अगदी हॉटेलमध्ये, स्टेशनवर काम करण्याची वेळही त्यांनी निभावून नेली. अगरबत्ती विकण्याचं कामही त्यांनी केलं. अनुभव माणसाला अधिक शहाणं करतो, त्यानुसार त्यांनी घेतलेल्या या अनुभवांमुळे पुढचा काळ त्यांनी अधिक धैर्यानं वाटचाल करत थेट प्राध्यापक होण्यापर्यंतचा टप्पा गाठला. या सगळ्यात त्यांची आई गौरम्मा हिच्या स्वभावामुळे त्यांच्यात अनेक गोष्टींची बीजं आपसूक रुजली, जिचं पुढे शब्दरूप झाल्याचं लक्षात येतं. त्यांच्या लिखाणात मानवी दुःख, संघर्ष, गरिबी, मानसिक वेदना यांचं वास्तववादी चित्रण येतं. भैरप्पा फक्त चार वर्षांचे असताना त्यांची आई गंभीर आजारी पडली.











तिच्या निधनानंतर ते उदास झाले. पोरके झाले. घरातलं वातावरण एका क्षणात बदललं. आई गेल्यानंतर वडील चिडचिडे झाले होते. त्यांचा राग भैरप्पा सहन करत राहिले. त्यातूनच त्यांच्या मनात एक प्रश्न नेहमी उभा राहत असे, मनुष्य असाच का वागतो? दुःखामुळे तो बदलतो का? बालपणी पडलेल्या या प्रश्नांचा शोध त्यांनी आपल्या प्रत्येक कादंबरीत घेतल्याचं जाणवतं. बालपणात वाट्याला आलेलं एकाकीपण, अस्थिरता, गरिबी आणि शिक्षणाच्या ध्यास या सगळ्यामुळे त्यांचं मन अत्यंत संवेदनशील बनलं. त्यामुळे हृदयाला हात घालू शकतील, अशा प्रकारचं लिखाण ते करू शकले, असं निश्चितपणे म्हणता येईल.

भैरप्पा यांचा बालपणीचा काळ अत्यंत दुःखद परिस्थितीत गेला. त्याच संघर्षाचं चित्र त्यांच्या 'गृहभंग' या कादंबरीत ठळकपणे येतं. आई, भावंडांचा अकाली मृत्यू, शिक्षणासाठी केलेला प्रचंड संघर्ष गृहभंगमध्ये दिसतो. गरिबीनं पिचलेल्या कुटुंबातील व्यक्तींची मानसिकता, त्यांचं आचरण, त्यांचे मनोविकार या कादंबरीत येतात. अशा व्यक्ती त्यांच्या आयुष्यात होत्या. त्याच एका खेड्यात राहणाऱ्या कुटुंबाच्या, समाजाच्या वाट्याला कोणत्या अडचणी आणि सामाजिक भेदाभेदाला सामोर जावं लागतं, हेही मांडलं आहे. भैरप्पा वयाच्या विसाव्या वर्षीपासून 'गृहभंग' ही कादंबरी लिहिण्याचा प्रयत्न करत होते. परंतु ती येईतोवर त्यांनी लिहिलेल्या 'धर्मश्री', 'वंशवृक्ष' आदी कादंबऱ्या प्रचंड गाजल्या होत्या. वयाच्या अठराव्या वर्षी त्यांनी पहिली कादंबरी लिहिली आणि गृहभंग लिहिली तेव्हा ते चौतीस वर्षांचे झाले होते. कारण 'गृहभंगा'तून त्यांनी स्वतःचं अस्वस्थ आयुष्य मांडलं होतं. परंतु ही आत्मचरित्रात्मक कादंबरी असल्याचं त्यांनी प्रस्तावनेत म्हटलेलं नाही. उलट वास्तव कालखंड मागं-पुढं केला, आवश्यकता भासेल तिथं नवी पात्रं उभी केली... अशा प्रकारे एक नवं जगच उभं केलं. वास्तवातली सामग्री यथेच्छ वापरली असली तरी वास्तवापासून अलग अशी ललित साहित्यकृती झाल्याचं ते कादंबरीच्या प्रस्तावनेत म्हणतात.

'गृहभंग' कादंबरीत नंजम्मा ही प्रमुख व्यक्तिरेखा आहे. नंजम्मा म्हणजे त्यांच्या आईचंच रूप होतं. तिचा धाकटा मुलगा म्हणजे खुद्द भैरप्पा. एका अर्थानं 'गृहभंग' ही त्यांचीच गोष्ट होती. या कादंबरीतल्या निर्जीव पानांमध्ये त्यांच्या कुटुंबातली कितीतरी माणसं त्यांनी सजीव केली. नंजम्मा वैवाहिक जीवनात कमालीची दुःखी आहे, तिची सासू कजाग आहे. तिचा नवरा तर कशातच भूमिका घेणारा नाही. या सगळ्या शोषणाच्या कोंडवाड्यात तिच्यातला चांगुलपणा कायम आहे. तीन मुलांच्या शिक्षणासाठी ती काही ना काही उद्योग करत त्यांना मार्गी लावू पाहतेय. एका बाजूला कणखर वाटणारी पण परिस्थितीनं हतबल झालेल्या नंजम्माचं आयुष्य मांडताना भैरप्पांनी आपल्याच आयुष्याचा हिशेब मांडल्याचं दिसतं. आत्मचरित्रात कादंबरीतील चन्निंगराय म्हणजे आपले वडील लिंगण्णय्या असल्याचं त्यांनी नंतर प्रांजळपणे सांगितलं. या कादंबरीतील ती व्यक्तिरेखा जशी बेजबाबदार आहे, तसे त्यांचे वडीलही होते. या कादंबरीत प्लेगनं दोन भावंडाचे मृत्यू झाल्याचे प्रसंग आहेत. हे सगळं त्यांच्या आयुष्याशी साम्य सांगणारं आहे. मूळ पुस्तकाच्या प्रस्तावनेत ते याचा उल्लेख करत नाही. उलट ते म्हणतात, १९२०च्या सुरुवातीच्या दशकात हे कथानक सुरू होतं. साधारण ४४-४५च्या सुमारास संपत. तिपटूर, चन्नराय पट्टण या तालुक्यांमध्ये ते कथानक घडतं. त्यामुळे ही त्याची पार्श्वभूमी आहे. कथानकासाठी एखादी भौगोलिक जागा गरजेची असते. ती अधिक परिचयाची आहे, म्हणून मी ही जागा निवडली आहे. अर्थात 'भित्ती' हे त्यांचं आत्मचरित्र प्रकाशित होताच 'गृहभंग' कादंबरी आत्मचरित्रात्मक आहे, हे कळून चुकलं. भैरप्पा यांनी आत्मचरित्रात, बालपणीच्या आठवणी सांगायच्या म्हटल्या की पावलोपावली 'गृहभंग' आडवी येते. आमचं गाव, आई-वडील, महादेवय्या, अक्कय्या, रामण्णा, मी, आजी, धाकटा काका, बागूरचा मामा रामपूरचे कल्लेगौडा ही सारी माणसं तिथे कादंबरीतली पात्रं होऊन आली आहेत, अशी कबुली मात्र दिली आहे.

कुटुंबातील नातेसंबंध, ताण यांचं चित्रण 'गृहभंग'प्रमाणे 'तंतू' कादंबरीतही आलं आहे. या 'तंतू'मध्ये गरिबी, संसारातील कलह आणि सामाजिक संघर्षाचं चित्रण आहे.

भैरप्पांना परिस्थितीमुळे लहानपणी उपाशी झोपावं लागलं होतं. नातेवाईकांकडे जाऊन राहावं लागलं. घरातले ताण आणि अजाण वयातलं जबाबदाऱ्यांचं ओझं यामुळे त्यांना घर कशामुळे विस्कटतं, असा प्रश्न पडत असे. त्यातूनच 'तंतू'मध्ये त्यालाच कथारूप दिलं आहे. खेड्यात राहणाऱ्या कुटुंबाच्या वाट्याला येणारं दारिद्र्य, कुटुंबातील विसंवाद, नात्यांचे विच्छेद, माणसांचं दुरावणं हे या कादंबरीतून मांडलं आहे. मात्र 'गृहभंग'च्या प्रस्तावनेत ते 'धर्मश्री' कादंबरीमध्येही मुलगा आणि आई यांच्यातील नातं आणि आई-वडील यांच्यातील संबंधांचा विषय आहे, याकडे निर्देश करत दोन्ही कादंबऱ्या सारख्या वाटू शकतील, असं म्हणतात. 'धर्मश्री'चं कथानक स्वातंत्र्योत्तर काळातलं आहे. ही १९६१मध्ये प्रकाशित झालेली कादंबरी धर्मांतरणाचा मुद्दा मांडते. कादंबरीतून धर्म हा विषय तत्त्वज्ञानाच्या अंगानं मांडला आहे. धर्म, जात याविषयी निर्माण झालेला मानसिक गोंधळ, धर्मांतरण याविषयीचा विस्तृत विचार यात मांडला आहे. यातील नायक आणि त्याच्या आई यांच्यातील प्रसंग हे त्यांच्या आयुष्याशी साम्य सांगणारे आहेत. केवळ विषयापुरता त्यांची रचना केल्याचं म्हटलं तरी तरीही 'गृहभंग' आणि 'धर्मश्री' या त्यांच्या आयुष्याशी अधिक जवळ जाणाऱ्या कादंबऱ्या म्हणता येतील. तर वैयक्तिक आणि कौटुंबिक आयुष्यातील नातेसंबंध, भावनिक गुंतागुंत, आणि मानवी मानसशास्त्राचा अभ्यास त्यांच्या बहुतांश कादंबऱ्यांना आकार देतात. त्याचं उत्तम उदाहरण म्हणून 'साक्षी' या कादंबरीचं नाव घेता येतं.

ग्रामीण परिसरात राहिल्यानं भेदभेदाची जाणीव नकळत्या वयातही ठळकपणे झाली. त्या जाणिवेचं रूपांतर 'दाटू', 'गृहभंग', 'मातादान'मध्ये दिसतं. जातिव्यवस्थेच्या जोखडाखाली वावरणारी माणसं, शिवाशिव, अन्यायकारी वागणूक त्यांनी पाहिली होती. 'दाटू' या कादंबरीतून जातिभेदाच्या भिंती ओलांडण्याची विचारधारा दिसते. प्रेमसंबंधात जात कसा अडथळा बनते, या मध्यवर्ती विषयावर ही कादंबरी लिहिली. याच कादंबरीला साहित्य अकादमीचा पुरस्कारही मिळाला.

घरातल्या असंख्य अडचणी आणि त्रासानं पिचलेल्या त्यांच्या आईला महाभारतातल्या कथा गाण्यांच्या रूपात सांगण्याची आवड होती. त्याचा प्रचंड प्रभाव त्यांच्या कोवळ्या मनावर झाला होता. पुढे 'पर्व' ही कादंबरी त्याच प्रेरणेतून लिहिली गेली. या पुस्तकाच्या प्रस्तावनेत त्यांनी, आपण ही कादंबरी का लिहिली याचा किस्सा दिला आहे. ते म्हणतात, एकोणीसशे सहासष्टची गोष्ट असावी. चिकमंगळूर येथील एका सभेत पाहुण्यांची ओळख करून देताना, डॉ. ए. नारायणप्पा हे उत्साहानं सांगते झाले, 'भैरप्पांनी केवळ एवढंच लिहिलं नाही, यानंतर आपण सगळ्यांनी उत्कंठेनं वाट पाहावी, अशी महाभारतावर आधारित कादंबरी ते लिहाताहेत.' त्यावर भैरप्पांनी आक्षेप घेताच, कुंती, द्रौपदी, कर्ण वगैरेंच खरं स्वरूप अमुक प्रकारे आहे, अशी चर्चा केली आहेस ना? तेच लिहून काढ म्हणजे झालं, असं म्हटलं होतं. त्यानंतर ते खरंच कादंबरी लिहिण्यासाठी संशोधनाला लागले. 'पर्व' वाचल्यानंतर त्यांच्यावरील आईंनी सांगितलेल्या कथांचा किती खोल प्रभाव आहे, वेगळं सांगण्याची गरज भासत नाही. लहानपणी मरणाच्या दारात पोहोचलेल्या भैरप्पांच्या मनाला मृत्यूविषयी अनेक प्रश्न पडले होते. 'पर्व' ही कादंबरी महाभारतावर आधारित असली तरी मानवी जीवनातील मृत्यूविषयीचं गूढ, जीवनातील वेदना, द्वंद त्या कथानकातून मांडण्याचा प्रयत्न केल्याचं स्पष्ट जाणवतं. या लिखाणामागील प्रेरणा बालपणीच्या त्या अनुभवाशी नक्कीच जोडता येते. 'पर्व'मधून महाभारतातील व्यक्तिरेखांना मानवी रूपात मांडण्याचा प्रयत्न त्यांनी केला.

प्रवासाची विलक्षण आवड आणि संशोधनाचं वेड भैरप्पा यांना होतं. त्यामुळेच त्यांनी शिकण्याच्या वयात भ्रमंती केली. 'पुढे' पर्वच्या निमित्तानं केलेल्या भटकंतीमुळे त्यांची संशोधकवृत्तीचा परिचय लोकांना झाला होता. केवळ भारतातच नाही तर परदेशातही फिरले. तिथल्या कला, धर्म आणि इतिहास यांची संशोधकीवृत्तीनं चिकित्सा केल्यानंच त्यांच्या कादंबरीला वैशिष्ट्यपूर्ण अधिष्ठान प्राप्त झालं. 'पर्व'मधील महाभारतातील प्रचंड आवाका असलेलं कथानक मांडणं, याच संशोधकवृत्तीमुळे शक्य झाल्याचं आपण म्हणू शकतो. 'पर्व'च्या लेखनापूर्वी ते अनेक वर्षं अभ्यास केला, मुलाखती घेतल्या आणि प्रत्यक्ष त्या स्थळाला भेटी दिल्या होत्या. त्यामुळे 'पर्व'ची रचना ही उत्तुंग झाली. त्यामुळेच ती प्रचंड गाजली. महाभारतावर अनेकांनी कादंबऱ्या रचल्या पण 'पर्व' त्या सगळ्यात अधिक वाचनीय ठरण्याची कारणं त्यांच्या आयुष्याशी जोडता येतील.

'मंद्र' या कादंबरीबाबतही त्यांच्या संगीताविषयीच्या गोडीचा परिणाम म्हणता येईल. संगीतावरील भैरप्पांचं प्रेम हे त्यांच्यावरील बालवयात झालेल्या संस्कारातूनच आलेलं आहे, आपल्या आत्मचरित्रात संगीताचं आपल्या आयुष्यातील स्थान त्यांनी नोंदवून ठेवलं आहे. ते म्हणतात, केवळ संगीतच मला आत खेचून नेतं. संगीतात अशी जादू, रहस्यमयी, चुंबकीय शक्ती आहे जी अन्य कोणत्याही गोष्टीत नाही. हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत आणि माझी रचनात्मक ऊर्जा आणि प्रेरणा यांमध्ये निश्चितच संबंध आहे. 'मंद्र' ही संगीताला वाहिलेली कादंबरी आहे. या कादंबरीत विविध रागांचं तपशीलवार विश्लेषण आहे. हिंदुस्थानी संगीतातील प्रत्येक रागाला एक मानवी रूप दिल्याचा उल्लेख त्यांच्यावरील लेखांमध्ये करण्यात आला आहे. संगीत हाच या कादंबरीचा नायक आहे, असं म्हणावं अशी ही कादंबरी आहे. यात भैरप्पांच्या संगीताच्या अभ्यासाचा कस लागल्याचं दिसतं. या कादंबरीला सरस्वती

पुरस्कारासह अनेक प्रतिष्ठित पुरस्कार लाभले. 'पर्व' हा त्यांनी महाभारताचा मानववंशशास्त्रीय दृष्टिकोनातून केलेल्या विचारांचा परिपाक होता. तर ऐतिहासिक व सांस्कृतिक तपशिलांची अचूकता कशी असावी, याचं उदाहरण 'सार्थ', 'मंद्र' आणि 'आवरण'मधून घालून दिलं.

भैरप्पांनी तत्त्वज्ञानाचा अभ्यास आणि अध्यापन केलं. त्यामुळे त्यांच्या कादंबऱ्यांमध्ये हा विषय आपसूकच येतो. त्यांच्या व्यक्तिरेखा या नैतिक प्रश्नांची उत्तरं शोधताना दिसतात. आत्मशोध आणि अस्तित्व याचं चिंतन करताना दिसतात. बौद्धिक चर्चांमधून विविध विषयांवरील दृष्टिकोन मांडताना दिसतात. 'वंशवृक्ष', 'तंतू' आणि 'आवरण' या विषयाच्या अनुषंगानं वेगवेगळ्या कादंबऱ्या आहेत, मात्र त्यातील व्यक्तिरेखा या तत्त्वज्ञानाची चर्चा करतात, हे साम्य म्हणता येईल. 'आवरण'मधील लक्ष्मी आपले वाद-प्रतिवाद करत विषयावर अधिक खोलवर चर्चा करताना दिसते. भैरप्पांनी वेदांत, बुद्धविचार, उपनिषदांचा अभ्यास केला होता. याच अभ्यासामुळे त्यांच्या 'ग्रहण', 'अंचू' या कादंबऱ्या अधिक संपन्न झाल्या आहेत. 'ग्रहण'मधून त्यांनी आध्यात्मिक संकट काय असतं, याचा ऊहापोह केला आहे. तर भावनिकतेला साद घालण्याचं काम 'अंचू'मध्ये केलं आहे. पण या सगळ्याच्या पाठीमागे आध्यात्मिक शोध घेण्याची त्यांची वृत्ती अधिक जोरकसपणे कादंबरीतून बिंबित होते. जीवनाचा खरा अर्थ काय, या प्रश्नाचा उलगडा व्हावा, यासाठी माणूस अध्यात्माच्या मार्गाला लागतो. त्यांच्या बहुतांश कादंबरीचा गाभा याच प्रश्नाचा गुंता सोडवण्याचा प्रयत्न करताना दिसतो. 'वंशवृक्ष'मधून वंशावळीच्या संशयास्पद मुळापर्यंत जाण्याचा प्रयत्न केला गेला. 'तब्बलियु निनाडे मगाणे' या कादंबरीत त्यांनी गाईविषयी भारतीय आणि पाश्चात्त्य दृष्टिकोन मांडला आहे. या कथेवरून 'गोधुली' हा चित्रपट काढण्यात आला होता. 'ग्रहण'मधून सर्वसामान्य गृहस्थाश्रम आणि संन्यस्त आयुष्याचं चित्रण येतं. 'उत्तरकांड'मध्ये रामायणाचा संदर्भ येतो. याशिवाय त्यांच्या अन्य कादंबऱ्यांमधूनही सामजिक पट विस्तृतपणे मांडला गेला आहे. त्यांचं अनेक शोकात्म घटनांनी भरलेलं आयुष्य, बालपणातील कटू आणि दुःखद आठवणी यांचा तळ काही व्यक्तिरेखांपुरता किंवा कथा, प्रसंगांपुरता का होईना, ढवळून निघाल्याचं त्यांच्या साहित्यातून सहज दिसून येतं.

भैरप्पा यांच्या 'आवरण', 'पर्व', 'गृहभंग' या कादंबऱ्यांच्या आवृत्त्यांमागून आवृत्या प्रकाशित झाल्या. याचं मूळ त्यांच्या लिखाणातील ठाशीवपणात आहे. त्यांच्या कादंबरीतली पात्रं सर्वसामान्य आयुष्य जगत असली तरी त्यांच्या माध्यमातून जीवनाचं, जगण्याचं, नीत्तीमत्तेचं, मानवी मूल्याचं तत्त्वज्ञान मांडतात. सामाजिक भाष्य करताना कथेचा डोलारा जड होणार नाही, याची काळजी ते घेतात. त्यामुळेच भैरप्पा अधिक लोकप्रिय ठरले. त्यांच्या कथा अधिकाधिक मानवी मनाचे सूक्ष्म कंगोरे मांडणाऱ्या ठरल्या. नैतिकता, कर्तव्य, इच्छा यामध्ये हेलकावत राहणारी माणसं त्यांच्या कादंबरीत सापडतात, ती त्यांच्या अनुभवाचं प्रतिबिंब असल्यामुळेच. एकूणच भैरप्पा यांनी भोगललेल्या असंख्य यातना आणि दुःखामुळे त्यांचं लिखाण हे वाचकांच्या काळजाला हात घालणारं ठरलं.

– अपर्णा पाटील
aparna.patil1@gmail.com

॥ग्रंथाली॥

पंकज कुरुलकर लिखित
आभासी जग



मूल्य ३०० रुपये
सवलतीत १८० रुपये

॥ग्रंथाली॥

पन्ना नायक लिखित 'फ्लेमिंगा' या पुस्तकाचा
सुषमा शाळिग्राम यांनी केलेला अनुवाद
गोष्ट नलिनभाईंची ...आणि इतरांची



मूल्य ३०० रुपये • सवलतीत १८० रुपये



शांताराम पंदेरे

सदाबहार उत्साहाचा खळखळता प्रवाह...!

माझ्या सहकारी रेखा ठाकूरचा मुंबईहून फोन आला... आनंद गेला!... काय बोलणार?... पाच दशकांहून अधिकच्या सोबतीनं, एका कामगार चाळीतील कष्टकऱ्यांच्या दारिद्र्याकडे पाहायचा व्यापक दृष्टिकोन देणारे युक्रांदमधील एक एक ज्येष्ठ सहकारी खूप दूर निघून जात आहेत. आनंदची फुप्फुसं फार काम करत नव्हती. तरी अखेरपर्यंत तो सदाबहार उत्साहाचा खळखळता प्रवाह होता! आनंद, मित्रा आता फक्त आठवणीच सोबत आहेत!

जून १९७५ची आणीबाणी २१ मार्च १९७७ला उठवली गेली. जनता पक्षाची निवडणूकही झाली. माझ्या नियोजनाप्रमाणे मुंबईला कायमचा वंचितांचा 'रामराम' करायचा दिवसही जवळ आला. हा निर्णय माझी मोठी बहीण बायो आणि ज्या मोजक्या युक्रांदीय सहकाऱ्यांना सांगितला त्यापैकी एक प्रमुख मुंबईचा अरुण ठाकूर आणि दुसरा आनंद करंदीकर होता. अरुणला बोललो होतो, त्याप्रमाणे त्याच्या ऑफिसला गेलो. अरुणनंच आधी आनंदला कळवलं होतं. इतक्यात आनंदही आला होता.

त्याच्या हातात चामड्याची मोठी बॅग होती. अरुणची कामं उरकल्यावर त्याच्या ऑफिसमागील भव्य सागराकडे गेलो! एका बाकड्यावर बसलो. भय्याकडील घेतलेले चणे खात खात गप्पा मारत, चहाही घेतला, आणि मी थेटच बोललो.

''आनंद, अरुण, परवा मी मुंबई सोडून मराठवाड्यात युक्रांदच्या चळवळीत सामील व्हायला चाललोय.''

आनंदनं नेहमीच्या उत्साहात म्हटलं, ''व्वा! माझ्याकडून तुला ही बॅग घे.''

आणि अरुणनं दीडशे रुपये हातात दिले. ''काहीही अडचण आल्यास कळवत राहा. आम्ही सारे तुझ्या पाठी उभे आहोत. कुठे थांबणार ते कळव.'' असे मायेचे शब्द दोघांनीही भेट दिले. मग चालत, गप्पा मारत चर्चगेटपर्यंत आलो. रेल्वेनं दादरला उतरलो. आनंद पुढे गेला.

आनंदला न झेपलेला प्रयोग!

मध्येच अरुणकडून समजलं, 'आनंद, उदगीरला युक्रांदचा फुलटायमर म्हणून चाललाय.'

उदगीरला गेल्यावर सहकारी रंगा राचुरेच्या सहकार्यानं खादी ग्रामोद्योग केंद्रांतील कामगारांची युनियन उभी केली आणि त्यांच्या मजुरी व अन्य स्थितीचा अभ्यास केला. यातील आकडे बाहेर आले; तेव्हा महात्मा गांधींच्या पुढाकारातील अशा केंद्रांतील कामगारांचं किती भयावह शोषण होतंय हे समजलं. उदात्त ध्येय आणि राष्ट्रप्रेमाच्या नावानं कुणा कष्टकऱ्यांचं कधीच पोट भरत नाही, हे आनंद बोलताना सांगत असे.

हे सारं खरं असलं तरी; अरुणनं आनंदचा हा निर्णय सांगितला तेव्हा माझ्या मनात आलं, हा आनंदचा स्वभाव नाही. डिकास्ट, डिजेंडरच्या प्रदीर्घ प्रक्रियेत त्यानं स्वतःला कधीच झोकून दिलं होतं. परंतु व्यवस्था परिवर्तनवादी चळवळीचा पूर्णवेळ कार्यकर्ता होणं; तेही मुंबई वा एखादं शहरी जीवन पूर्णपणे सोडून ग्रामीण भागात जाणं; सारंच अनाकलनीय! वैचारिक बैठक तर पक्की हवीच. अशा स्थितीत कितीतरी प्रश्न समोर येत जातात. त्यातच सोबतची सहकारी टीमही कशी आहे यावर अवलंबून असतं. किंवा तुम्हाला नवी टीम बनवावी लागते. कधी व्यक्तिशः तर कधी टीमसोबत हे प्रश्न सोडवत जावं लागतं.

गुंता झालेलं जाळं आणि आनंद

गायरान, वनजमीन हक्काचा लढा-संघर्ष जोरात सुरू होता. याचा एक अपरिहार्य परिणाम होता सततच्या सामूहिक

अटका व तुरुंगवास! तुरुंग म्हणजे निवांतपणा. नियमित जेवण-खाण. भरपूर विश्रांती. त्यामुळे चिंतनाला भरपूर वाव!

अशाच एका तुरुंगात निवांत असताना अनेक दिवस मनात असलेल्या मुद्याला मूर्त रूप आलं. यातील एक सूत्र नक्की केलं होतं; हा प्रयोग जमला तर सोबतच्या लोकांचा असेल. मात्र फसला तर त्याचे परिणाम एकट्यानंच भोगायचे. त्याची झळ लोकांना लागू द्यायची नाही.

नको तितकं साहित्य वाचलं. शेवटी पुण्याच्या नाबार्डकडून बंदिस्त शेळी-पालनाच्या मॉडेलची पुस्तिका आणली. मित्रांच्याच आर्थिक सहकार्यानं २२.५ एकर जमीनही खरेदी केली. देविदास तुळजापूरकरच्या सहकार्यामुळे महाराष्ट्र बँकेनं दहा लाखांचं कर्जही मंजूर केलं. माझे स्थानिक अनुभवी शेतकरी सहकाऱ्यानं उस्मानाबादला जाऊन तेथील १०१ बकऱ्या व एक बकराही खरेदी केला. ट्रक भरून बकऱ्या पाराळा-जुनोने या दुष्काळी गावात आल्या. शेड बांधून तयार होती. यात साऱ्या बकऱ्या बंद केल्या. तापलेल्या खडकात-मुरमात जितके गवत मिळेल तितकं बकऱ्यांना खायला घालत होतो. एक सहकारी हे सारं काम पाहत होता.

एक स्वप्न मरून पडलं!

या तापलेल्या उन्हात खडक-मुरमावर बकऱ्या मोकळ्या फिरवत असे. यामुळे त्यांच्या खुराला रोग झाला. त्यातून रक्त येऊ लागलं. एक बकरी पाहायला शासकीय पशुवैद्यकीय डॉक्टर यायचे; तोपर्यंत दुसरी बकरी मरून पडलेली असायची. असं करता करता १०१ अधिक जनलेली नवी करडं धरून १५४पर्यंत केवळ सहा महिन्यांत आकडा गेला. महाराष्ट्र बँक खूश होती. दरम्यान हा आजार काही आटोक्यात येईना. पाहता पाहता यातील मृत बकऱ्यांचा आकडा ८५ वर गेला. बकरीच्या पोटात करडू टिकेना. आचळं एकमेकाला चिकटली. बँकेनंच सांगितलेल्या एका खाजगी इन्शुरन्स कंपनीकडून सर्व बकऱ्यांचे इन्शुरन्स काढले होते. बकऱ्यांची अशी गत सांगताच खूप प्रयत्न केल्यानंतर फक्त दोनच बकऱ्यांचे अठरा हजार रुपये इन्शुरन्स मिळाले. आंदोलनकर्त्या मी अखेर हात टेकले आणि त्या ऑफिसचा नाद सोडला!

शेवटी उरलेल्या सर्व बकऱ्या आणि काही करडं आमचे बकरी पालक सहकाऱ्याकडे दिली. आणि म्हणालो, 'जगल्या तर तुमच्या. मेल्या तर माझ्या.'

दरम्यान प्रत्येकवेळी बँकेला प्रत्येक स्थितीचे लेखी कळवत होतो. अशा स्थितीतही बँक उरलेले सहा लाख कर्ज उचला असं सांगत होती. मी याला साभार नकार दिला.

ही सारी बिकट परिस्थिती आनंदच्या कानावर घालावी म्हणून त्याला पुण्याला मेट्रिक कन्सल्टन्सी (Marketing and Econometrics Consultancy Services) या त्यानं उभारलेल्या भारतातील प्रसिद्ध कंपनीत भेटायला गेलो. त्याला बकऱ्यांच्या या प्रकल्पाविषयी आधी बरंच सांगितलं होतं. सारी विदारक परिस्थिती, सारी हकिगतही सांगितली. आनंद एका व्यावसायिकाप्रमाणे मला एक एक प्रश्न विचारून सारी माहिती घेत होता. आणि तास-दोन तासांच्या या चहा बैठकीनंतर त्यानं मला सांगितलं, 'मी पाराळ गावात दोन दिवस राहून परिस्थिती आणखी पाहणार आहे.'

महिनाभरात आनंद पाराळ-जुनोनं भागात आला. सर्व जमीन आणि कागदपत्रं पाहिली. मग आनंद सांगू लागला,

''अरे शांताराम, वाटेत येताना पाहिलं, सारे बकऱ्यांना रानोमाळ मोकळेच फिरवत होते. आणि तुम्ही हे बंदिस्त शेळीपालन सुरू केलं! वास्तविक हे ऑस्ट्रेलियन मॉडेल आहे. हजारो एकरावर हिरवं गवत वाढवतात आणि त्यांच्या एका एका कप्प्यात बकऱ्या चरायला सोडतात.''

आनंद पुढे सांगत होता.

''आणि आपल्याकडे अशा मोकळ्या सोडतात बकऱ्या. मिळेल ते खातात. आणि तुम्ही तर इथे २२.५ एकरांत १५०वर बकऱ्या सांभाळत आहात. त्यातही बंदिस्त शेडमध्ये बकऱ्या ठेवता. त्यात हे असे कडक ऊन. बाहेर सर्व खडक तापलेला. अशा वातावरणात हे ऑस्ट्रेलियाचे मॉडेल टिकूच शकत नाही.''

आनंदनं एका गोष्टीचं मात्र कौतुक केलं, ''शांताराम, तू एक चांगलं केलंस! कर्ज मंजूर म्हणून सारे पैसे उचलले नाहीस. दहा लाखांतील फक्त चारच लाख घेतलेस. खरंच हा तुझा शहाणपणा आहे.''

आनंदच्या या बोलण्यानं बुडत्याला काडी नाहीच; पण ओंडक्याचा विश्वासाचा आधार सापडला होता! दोन दिवसांनी आनंद परतला.

मी आणि आनंद करंदीकर

त्यानंतर निर्णय झाला. हा बंदिस्त शेळीपालन प्रकल्प इथेच थांबवायचा. आयुष्यातील आणखी एक स्वप्न बाजूला मरून पडलो!

बँकेचे विभागीय व्यवस्थापक कुलकर्णींना भेटलो आणि सांगितले. 'काहीही करून ३१ मार्च रात्री बारा पर्यंत व्याजासह सारे पैसे बँकेत भरेन.'

धावपळ करत ३१ मार्च रात्री १२पर्यंत सारे पैसे बँकेत भरले आणि सुटकेचा श्वास तात्पुरता का होईना सोडला! मग प्रयत्न सुरू झाले; यातील साडेसतरा लाख खाजगी कर्ज कसे फेडायचं?

आनंद आणि अथश्री

पुण्याच्या IISER-Indian Institute of Science Education & Research च्या वतीने महाराष्ट्र आणि गोवा राज्यात ''महाराष्ट्र जनुक कोष- Maharashtra Gene Bank'' संशोधन प्रकल्प सुरू होता. यात एका विभागाचा मी समन्वयक होतो. त्याचवेळी आमची लेक धरती मुंबईची TIFR-Tata Institute of Fundamental Research आणि IISER यांच्या एका संयुक्त संशोधन प्रकल्पावर काम करत होती. या सर्व कारणांमुळे IISER गेस्ट हाऊस आणि आनंद राहात असलेल्या 'अथश्री' रूमच्या शेजारचं गेस्ट हाऊस सुमारे १० वर्षं धरती, मंगल आणि माझं मुक्कामाचं हुकमी ठिकाण बनलं होतं. एक तर भाडं सोयीचं. तळाला खाण्याची सर्व सोय. आणि लेकीचा सहवासही मिळत होता.

आनंदला फोन केला की पाच-दहा मिनिटांत फोन वा मेसेस यायचा, 'शांताराम, गेस्ट रूम बुक झालीय. या भेटू, गप्पा मारू.'

आनंद सारखा मागे लागायचा.

'शांताराम, मंगल, आमच्याच खोलीत राहा. कशाला भाडं भरता?' एक-दोनदा तसा प्रयत्नही केला. परंतु लक्षात आलं आमच्या जाण्या-येण्याच्या वेळा खूपच अनिश्चित असायच्या. आम्हाला भेटणारेही असायचे. आणि धरतीलाही आमचा वेळ हवा असायचा. त्यातच आनंद आणि सरितावर नाही म्हटलं तरी कामाचा भार पडायचा.

म्हणूनच आम्ही ठरवलं, शेजारची गेस्ट रूमच सोयीची. एक तर 'अथश्री' वृद्ध वा माझ्यासारख्या पॅरालिटीक व्यक्तीसाठी खूपच सोयीचं आहे. एवढी व्यवस्था मी तरी कुठेच पाहिलेली नाही. बाकी किमान सकाळचा चहा-नास्ता, रात्रीचं जेवण आनंदसोबत घेत असू. गप्पाही खूप व्हायच्या. धरतीलाही हे छान वाटायचं.

आनंदचा एक प्रभावी उपक्रम म्हणजे 'विचारवेध'. दरवर्षी पुण्यात विचारवेध संमेलन होत असे. तसेच व्याख्यांनांचा उपक्रमही नियमितपणे चालवला होता. आनंद खरं म्हणजे माणसांचा भुकेलेला. 'विचारवेध'च्या निमित्तानं नवीन तरुणतरुणींची उत्कृष्ट टीम त्यानं उभी केली आहे. साहजिकच हे सारे आमचेही सहकारी बनले. आता माहीत नाही 'विचारवेध'ची ही गौरवशाली परंपरा कोण पुढे नेईल?

आनंदची फुप्फुसं जसजशी साथ देईनाशी झाली; तसतसा दुसऱ्या बाजूला आनंदनं संकल्प केला 'जातीअंतासाठी करू काही' ही मोहीम महाराष्ट्रभर न्यायचा. प्रचंड धाप लागायची. आमचं सांगणं असायचं,

'आनंद, पुणे केंद्रितच ही मोहीम ठेव. तुझ्या व्याख्यानांचा आग्रह सोड. बाहेरून ज्यांना यायचंय ते येतीलच. पण कमीत कमी श्रम, बोलणं यातून ही मोहीम कशी राबवायची याची योजना बनवू.'

परंतु आनंदला हे काही पटत नसायचं. मला खूपच वाईट वाटायचं. फोनवर कितीतरी वेळ धापा टाकत, श्वास कोंडत तो बोलत असायचा. तसतशा इकडे आम्हाला वेदनाही खूप व्हायच्या. केवळ गप्प बसून काही मिनिटं नुसतं ऐकायचं. मग 'हॅलो, हॅलो' करत, 'ऐकू येत नाही', असं अनिच्छेनंच खोटं बोलत फोन बंद करत असे. मात्र मेसेज पाठवत होते.

उद्योगक्षेत्रामध्ये युवकांनी आपलं भविष्य कसं उभारावं यावर त्याचे सतत दौरे असायचे. युवक-युवतींबरोबर संवाद करत असायचा.

यासंदर्भात आनंदनं 'रोजगार निर्मितीची दिशा. बेरोजगारीचा भस्मासूर गाडण्यासाठी ठोस उपाययोजना' हे पुस्तकही लिहिलं.

आनंदनं युक्रांदवर लिहायचं ठरवलं होतं. फोनवर कोणते ना कोणते संदर्भ विचारत राहायचा. त्यानिमित्तानं माझाही मेंदू हलत राहायचा. जुनी कागदपत्रं, फायली पाहायची संधीही मिळायची. लवकरच हे सारे संदर्भ पाहायला औरंगाबादला येईन म्हणाला होता. आता सारंच मागे राहिलं. आणि मलाही कोणत्या ना कोणत्या कारणांनी 'अथश्री'वर उतरायचं राहूनच गेलं!

अत्यंत बुद्धिमान, नवनवीन कल्पनांचा निर्माता, पण आपल्या ज्ञानाचा कुठेही गर्व नसलेला तरुण. समवयीन वा अन्य कुणाशीही सहज संवाद करणारा माणूस.

व्यक्तिगत जीवनातील अडीअडचणींची कुठेही फारशी चर्चा नाही. प्रसिद्ध कवी विंदा करंदीकर यांचा मुलगा म्हणून कधीही, कुठेही न मिरवणारा. धरतीला आनंदकाका गेल्याचं कळवलं. तेव्हा तिची सहज प्रतिक्रिया, 'आनंदकाका इतक्या लवकर का गेला?'

अशा कितीतरी आठवणी आनंदसोबतच्या आहेत. आता फक्त त्या सोबतच ठेवायच्या.

– शांताराम पंदेरे

shantarambala2025@gmail.com



नंदन जोशी

एडिंबर्ग बुक फेस्टिव्हल

अनेक दिवसांपासून माझा धोशा चालू होता, Edinburgh Book Festival ला जायचेय कधीतरी. कंटाळा येऊन मिलनने (पत्नी) इंग्लंडची तिकिटे काढून हाती सुपूर्द केली. लंडन गॅटकिक विमानतळावरून निघालेले विमान काही तासांत एडिंबर्गला पोचले.

स्कॉटलंड हे इंग्लंडपासून विभागलेले नाही. सीमेवरून येता-जाता फार चौकशी होत नाही. इंग्लंड, ग्रेट ब्रिटन आणि यूके ह्या नावांचा गोंधळ प्रवाशाच्या मनात उद्‌भवू शकतो. इंग्लंड आणि स्कॉटलंड, वेल्स मिळून ग्रेट ब्रिटन होते. उत्तर आयर्लंड घेतलं की यूके होते. तसे स्कॉटलंड हा इंग्लंडच्या भूभागाच्या उत्तरेकडचा प्रदेश. अनेक गोष्टींकरता प्रसिद्ध. डोंगरदऱ्या, व्हिस्की, जिन याखेरीज साहित्याचा वारसा. वॉल्टर स्कॉटपासून सुरू झालेली परंपरा बुकर विजेत्या James Kelmanपर्यंत चालत आली आहे. युनेस्कोने जगातील काही शहरांना City of Literature चे पद दिले आहे. त्यातले एडिंबर्ग हे पहिले शहर.

शिवाय medieval शैलीतल्या जुन्या, सुंदर इमारती, राजांचे किल्ले, वरखाली जाणारे रस्ते, ट्रॅम, पब आणि ऑगस्ट महिना असल्या कारणाने प्रवाशांची भरपूर गर्दी. युरोपात उन्हाळ्यात बरेच सांस्कृतिक उत्सव चालू असतात. संगीताचे, चित्रकलेचे, नाटक-सिनेमांचे आणि पुस्तकांचे. एकाच वेळी एडिंबर्गमध्ये बुक फेस्टिवल, फ्रिंज फेस्टिवल आणि Edinburgh International फेस्टिव्हल चालू होते. करमणुकीची कमतरता भासत नाही अशा वेळी.

एडिंबर्ग येथील इंटरनॅशनल बुक फेस्टिवल १९८३ पासून चालत आलेले आहे. सुरुवातीला द्वैवार्षिक आणि १९९७ पासून वार्षिक. वेगवेगळ्या ठिकाणी ठेवलेला हा उत्सव (पहिली काही वर्षे एका तंबूत) आता एडिंबर्ग फ्युचर्स इस्टिट्यूटमध्ये (EFI) घडतो. मुंबई विद्यापीठाच्या शैलीतली ही इमारत आहे, पण आकाराने इतकी विस्तृत नाही. बाहेर भलेमोठे पटांगण. पुस्तकोत्सवाच्या पंधरवड्यात तिथे वेगवेगळे तंबू लावलेले असतात. सर्वात मोठ्या तंबूत पुस्तकप्रदर्शन. बराचसा भाग या तंबूचा पुस्तकगृहासारखा. वेगवेगळ्या शेल्फमध्ये Fiction, Non-Fiction, Fantasy, Mystery ची पुस्तकं लावलेली. काही पुस्तके टेबलांवर मांडलेली. त्यात एक टेबल Tik-tok वर गाजणाऱ्या पुस्तकांवरचे देखील. तरुण मंडळी Tik-tok वरील छोटे व्हिडिओ पुष्कळ पाहतात. तर या माध्यमातून पुस्तकांमध्ये त्यांना गुंतवणे आणि रस जागृत करणे हा प्रकार. तंबूच्या शेवटच्या भागात एक भलेमोठे टेबल, ज्यामागे खुर्च्या लावलेल्या. तिथे लेखक येऊन पुस्तकांवर स्वाक्षऱ्या करतात. त्यासाठी विकत घेतलेली पुस्तके घेऊन लोक रांगेत उभे असतात. हा स्वाक्षऱ्यांचा कार्यक्रम पुस्तक गप्पांनंतर चालतो.

या तंबूखेरीज दुसरा तंबू कार्यक्रमांसाठी राखून ठेवलेला असतो. तिथे कथा, कविताावाचन, पुस्तक गप्पा, सांगीतिक आणि इतर कार्यक्रम होतात. उत्सव या तंबूमध्ये व EFI च्या इमारतीत. अर्थात सर्वात महत्त्वाचा तंबू, जो यूरोपीय लोकांना अत्यंत प्यार, तो म्हणजे मद्यपानाचा. तिथे बीअर, वाईन घेऊन बसायला खुर्च्या आणि छोटे सोफे असतात. तंबूबाहेर बाकडी ज्यावर अनोळखी लोकांसोबत खाणे-पिणे आणि चर्चा. शिवाय खाणे-पिणे घेऊन गवती लॉनवर बसणेदेखील निषिद्ध नाही. अशा ठिकाणी एरवी औपचारिक अशा संस्कृतीतील माणसे पुस्तक प्रेमाने एकत्र येतात. या उत्सवातला सर्वात मजेदार भाग मला हा जाणवला. केवळ त्या उत्सवाच्या आवारात वेळ काढल्याने मला खूप आनंद झाला. कार्यक्रमांपेक्षा हा संवाद किंवा नुसती पुस्तके वाचत बसलेल्या लोकांसोबत बसून वाचणे या आनंदाचे वर्णन करणे अवघड आहे.

एका कार्यक्रमाची मी तिकिटे काढली आणि EFIच्या इमारतीत शिरलो. Susan Choi आणि यूसूफ राखा या कादंबरीकारांशी संवाद होता. कार्यक्रम स्थळाजवळ एक वाचणाऱ्यांची खोली होती. ही खास कार्यक्रमाची तिकिटे घेतलेल्या लोकांसाठी. एखाद्या ग्रंथालयासारखी. फरक इतकाच,

की नवीन आलेल्या आणि कार्यक्रमाशी संलग्न असलेल्या पुस्तकांनी भरलेली. आलेले प्रेक्षक इथे कार्यक्रमाआधी व नंतर बसून ही नवी पुस्तके वाचू शकत होते. कार्यक्रम सुरू होण्याआधी काही मिनिटे आधी आम्हाला प्रेक्षागृहात सोडले. दोन्ही लेखक आपापल्या पुस्तकांविषयी बोलले आणि काही उतारे वाचून दाखवले. Susan Choi ही कोरियातली आणि राखा इजिप्तमधील. राजकीय घडामोडींमुळे होणारे विस्थापन आणि त्याचा कुटुंबावर झालेला परिणाम हे त्यांच्या विषयातले साधर्म्य. अतिशय अनौपचारिक असा त्यांच्यातला संवाद. Susan Choiची Flashlight ही चर्चेत आलेली कादंबरी बुकरच्या यादीत होती. कार्यक्रमानंतर पुस्तकांवर स्वाक्षऱ्या करण्याचा प्रघात आहे. तर असे हे अनेकविध कार्यक्रम. William Dalrymple आणि Anita Anand चा कार्यक्रम त्याच दिवशी होता, पण तिकिटे उपलब्ध नव्हती. ते दोघे इतिहासावरचा एक पॉडकास्ट चालवतात आणि त्याचे नुकतेच सिल्क रूट आणि त्याचा भारताशी संबंध अशा विषयावरचे 'Golden Road' प्रकाशित झाले होते.

एडिंबर्ग बुक फेस्टिव्हलमधले कार्यक्रम अनेक प्रकारच्या लेखक-लेखिकांबरोबरच्या संभाषणांनी भरले होते. काही उदाहरणे पाहा- Anshel Pfeiffer या इस्राएलमधील पत्रकाराचे नवीन पुस्तक Bejnamin Netanyahmuवरचे आहे. सद्यःस्थितीत इस्राएलच्या आक्रमणाच्या अनुषंगाने केलेला अभ्यास विशेष महत्त्व ठेवून आहे. त्याची बीबीसी, गार्डियनच्या पत्रकारांने मुलाखत घेतली. पौगंडावस्थेतून प्रौढत्वाकडच्या प्रवासावर भाष्य करणारी दोन पुस्तके. दोन वेगळ्या लेखकांची. Andres N Ordorica चा नवीन कवितासंग्रह Holy Boys आणि विजय खुरानाची पहिली कादंबरी The Passenger Seat या दोन पुस्तकांची Boys to Men या शीर्षकाखाली चर्चा झाली. Josephine Quinn या इतिहासकाराचे पुस्तक How the world made the West हे ग्रीक आणि लॅटिन संस्कृतीबरोबरच फिनीशियन, असिरियन, अरबी संस्कृतीनेदेखील

घडवलेले जग आहे, हा युक्तिवाद पुराव्यासकट मांडते. याखेरीज मुक्त सहवाचनाचा (Open Book Shared Reading) कार्यक्रम म्हणजे एका नवीन निवडलेल्या पुस्तकाचा एक भाग वाचणे, हाही उत्सवात होता.

ऑगस्ट महिना हा एडिंबर्गमध्ये वेगवेगळ्या सांस्कृतिक कार्यक्रमांनी भरलेला असतो. Fringe Festival हा नाटकोत्सवपण तेव्हाच शहरभर चालू असतो. तऱ्हतऱ्हेचे प्रयोग- कॉमेडी, सर्कस, एकपात्री, एकांकिका असे शेकडो प्रयोग वेगवेगळ्या स्थळी होत असतात. मी एका सर्कससदृश प्रयोगाला गेलो. 'Genesis'मधील (बायबल) पहिल्या करारातील कथांचे केवळ शारीरिक हालचालींतून सादरीकरण असे त्याचे स्वरूप होते. फिनलँडमधील कलाकारांचा संच होता. वेगळेच काहीतरी पाहिल्याचा अनुभव होता; Cirque du Soleil ह्या सर्कस-नृत्य-नाटकाच्या सीमेवर असलेल्या प्रयोगाची आठवण झाली. अत्यंत अवघड अशा gymnastics च्या शैलीतील हालचाली असल्यामुळे कथेच्या धाग्यांचा विसर पडणे साहजिक होते. ऑगस्ट महिन्यामध्ये एडिंबर्गमध्ये चालता-फिरता सर्वत्र या प्रयोगांच्या जाहिराती दिसत असतात. प्रयोगाला आलेल्या इतर प्रेक्षकांकडून दुसऱ्या प्रयोगांची शिफारस होत असते.

सांस्कृतिक कार्यक्रमांचा शीण जाणवायला लागला की National Gallery of Scotland बाहेरच्या हिरवळीवर विश्रांती घेण्याची सोय आहे. तिथे एक Walter Scott चा मोठा पुतळा आहे. Walter Scott हा त्याच्या Waterley कादंबरी गटासाठी विशेषकरून प्रसिद्ध आहे. Rob Roy, Ivanhoe या कादंबऱ्या भारतात गाजल्या होत्या आणि तो मोठा कवीही होता. हा पुतळा १८४४ साली बनवलेला आहे Scottच्या मृत्यूनंतर १२ वर्षांनंतर. एडिंबर्ग हे सुंदर शहर आहे. उंचसखल भाग असलेले आणि वेगवेगळ्या काळातल्या शैलीतल्या इमारतींनी सजलेले. दुसऱ्या महायुद्धात जर्मन विमानांनी त्यावर बॉम्ब हल्ले केले होते, पण एडिंबर्गच्या ऐतिहासिक इमारती शाबूत राहिल्या.

City of Literature ला शोभतील अशी पुस्तकांची दुकाने एडिंबर्गमध्ये आहेत. त्यातले Topping Bookstore हे मी राहात होतो त्याजवळचे दुमजली पुस्तकांचे दुकान. तिथले पुस्तकविक्रते उत्साही आणि पुस्तकसंस्कृतीत मुरलेले. मी पुस्तकउत्सवासाठी आल्याचे सांगितल्याने अधिक गप्पा झाल्या. पहिल्याच दिवशी तिथल्या विक्रेत्याने मला सांगितले की कॉफी शॉपमध्ये जाण्याऐवजी तू इथेच ये आणि वरच्या मजल्यावर आम्ही तुला चहा आणून देऊ. त्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी सकाळी पोचताच, मला एका टेबलावर बसण्याची विनंती केली. हे टेबल पुस्तकांच्या शेल्फच्या आसपास आणि तिथून रस्त्यावरची गंमत पाहता येते असे होते. थोड्या वेळाने किटलीतून चहा आला आणि शेल्फवरून काढलेली पुस्तके वाचता-वाचता चहापान!

Topping मध्ये नेहमीच्या विषयांची पुस्तके तर आहेतच. राजकीय, ऐतिहासिक, कथा-कादंबरी, कविता, ललित गद्य. त्याखेरीज Collectible Editionsच्या कुलूपबंद कपाटात मौलिक पुस्तके आहेत. पहिल्या आवृत्त्या, लेखकाच्या सहीसकट आहेत. काही पुस्तकांचे संचदेखील. उदाहरणार्थ, Van Gogh च्या चित्रांच्या पुस्तकांचा संच. ह्यात काही लक्षणीय पुस्तके आढळली. William Dalrympleची १८५७च्या बंडावरची Anarchy, Peter Frankopan या इतिहासकाराची An Untold History, Yuval Naah Harrariची Nexus, Agatha Christie चरित्र, Werner Herzog ह्या जर्मन दिग्दशर्काचे आत्मचरित्र, इत्यादी इत्यादी.

पुस्तके आणि नाटके याखेरीज एडिंबर्ग इंटरनॅशनल फेस्टिव्हल ही यावेळी चालू होते. नृत्य, संगीत, संगीत

नाटक (Opera), संगीत नाटक (Musical) या कार्यक्रमांनी भरलेले. हा उत्सवही ऑगस्ट महिन्यात चालू होता. ग्लुक या संगीतकाराचा Orpheus and Eurydice हा फ्रेंच मधील ऑपेराचा एक प्रयोग पाहायला मिळाला. Orpheus आणि Eurydice ची गोष्ट ग्रीक पौराणिक कथांमधली आहे. Orpheus हा Lyre वादक आपल्या प्रेयसी Eurydiceशी लग्न करतो, पण लग्नाच्या दिवशी तिला साप चावून ती मरण पावते. ऑर्फियस हा दुःखाने व्याकूळ होऊन मृतांच्या जगाच्या द्वारी जाऊन तिला पुन्हा जिवंत करावे यासाठी आर्जव करतो. त्याच्या संगीतावर लुब्ध होऊन तिथला द्वारपाल त्याला युरीडिसीला परत नेण्याची परवानगी देतो. अट फक्त इतकीच की परतीच्या प्रवासात त्याने एकदाही तिच्याकडे वळून पाहू नये. बराचसा प्रवास झाल्यावर पृथ्वीतलावावर पोचण्याआधी

ग्रंथालीनं प्रकाशित केलेल्या 'भक्तीपंथेचि जावे' या अरुण घाडीगावकर संपादित भक्ती बर्वे-इनामदार यांच्या आत्मचरित्रपर लेखांच्या पुस्तकास कोंकण मराठी साहित्य परिषदेचा चरित्र विभागातील प्रथम क्रमांकाचा 'धनंजय कीर स्मृती पुरस्कार' आमदार संजय केळकर (विश्वस्त, कोमसाप) यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी आमदार प्रा. डॉ. प्रदीप ढवळ (केंद्रीय कार्यवाह, कोमसाप), नमिता कीर (केंद्रीय अध्यक्षा, कोमसाप), श्री. पाटील (विश्वस्त, कोमसाप) हे उपस्थित होते.

तिला ठेच लागते आणि ऑर्फियस मागे वळून पाहतो. तत्क्षणी ती पुन्हा मृत्यू पावते आणि ऑर्फियसला वेड लागते. याचे क्रिस्टॉफ ग्लुकने संगीत नाटकात (ऑपेराशैलीत गायलेल्या) रूपांतर केले १७७४ मध्ये. २०२५ च्या एडिंबर्ग फेस्टिव्हलमध्ये याची निर्मिती आधुनिक minimalist शैलीत केली होती. त्याचा परिणाम अत्यंत प्रत्ययकारक होता.

थोड्या दिवसांत सांस्कृतिक उत्सव आणि तेदेखील ऐतिहासिक जुन्या शहराच्या पटावर घडले. त्यांचे वेगवेगळे अनुभव घेऊन मी इथून परतलो. तरीदेखील पुस्तकोत्सवाला भेट दिल्याचा अनुभव विशेष होता. काही वेळाकरता एडिंबर्ग फेस्टिव्हल इस्टिट्यूटच्या परिसरात असताना पुस्तकांच्या जगात भटकल्याने खोलवर समाधान वाटले. त्या वेळ-अवकाशात बाकीचे जग मनःपटलाच्या मागे सारले गेले. पुस्तकांवर प्रेम करणारे अनेक वयोगटांचे आणि अनेकदेशीय लोक यांच्याबरोबर वावरताना जग फक्त पुस्तकांनीच आणि त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या लोकांनीच भरलेय अशा आभासात राहणे शक्य होते. जगातील व समाजातील घडामोडी ज्या प्रकारे पुस्तकांमधील वर्णनांतून मानवतावादी हाताळणीने आपल्याला सामोऱ्या येतात त्यामुळे एरवीच्या भांडवलशाही दृष्टिकोनाला छेद जातो. जगातील शोषित आणि उपेक्षित लोकांचे रुदन आणि हुंकार हाकेवरच ऐकू येतात. लेखक, टीकाकार, वाचक यांमधील अंतर दूर होऊन जाते आणि आपल्यामधले समानधर्मत्व प्रकर्षाने जाणवते.

– नंदन जोशी

nandanpjoshi@gmail.com

॥ग्रंथाली॥

वाचकदिनी प्रसिद्ध पुस्तके

आनंद बुरगुले लिखित
पशार



मूल्य २०० रुपये • सवलतीत १२० रुपये

डॉ. निर्मोही फडके लिखित
अथाव

मूल्य २०० रुपये • सवलतीत १२० रुपये

हेलन डिसिल्वा लिखित
शायेली झेला

मूल्य ३०० रुपये • सवलतीत १८० रुपये

रिचर्ड न्युनीस लिखित
तेतेलेस्टाय



मूल्य २५० रुपये • सवलतीत १५० रुपये

संजीवनी खेर

विदुषी इरावती कर्वे

मागच्या शतकात महाराष्ट्रात अनेक सामाजिक सुधारणा झाल्या. खास करून स्त्रिया मोठ्या प्रमाणात विविध क्षेत्रांत आघाडीवर होत्या. हे सारे चमत्कार म्हणावा असेच होते. स्त्रिया शिकू लागल्या, समाजात धाडसाने वावरू लागल्या विशेषतः पुणे शहर यात आघाडीवर होते. परंपरांच्या जोखडातून बाहेर येऊन वावरणाऱ्या स्त्रिया पुण्याच्या रस्त्यावर दिसू लागल्या. स्वत:चेच विश्व नव्हे तर इतर स्त्रियांचे विश्व कसे बदलेल याकडे सजगपणे पाहू लागल्या. घराच्या ओटीवर येण्याचेही धैर्य न एकवटू शकणाऱ्या स्त्रिया सभासंमेलनांतून बोलू लागल्या. मागच्या शतकात अनेक बदल आपल्या समाजात घडले. त्यातील एकेकीची कहाणी एखादा चित्रपट असावा अशी थरारक आहे. असेच एक कुटुंब पुण्यात होते रॅंगलर परांजपे यांचे आणि दुसरे पुण्याच्या सीमेवरचे म्हणजे महर्षी धोंडो केशव कर्वे यांचे. प्रत्येकाच्या घरात एकाहून एक क्रांतिकारक विचारांचे स्त्री-पुरुष होते. समाजातील प्रचलित जाचक रूढींविरुद्ध त्यांनी दंड थोपटले होते. समाजाला बदलायला भाग पाडले होते. र.धों. कर्वे, शकुंतला परांजपे आदी. कर्वेंच्या घरात विवाह होऊन आलेली इरावती मात्र वेगळ्या रस्त्याने वाटचाल करत जगप्रसिद्ध झाली.

इरावती कर्वे

हिचा सारा प्रवासच रोमांचक आहे. हिचे माहेरचे आडनाव करमरकर. तीन भावांमधली एक बहीण म्हणून घरातल्या साऱ्यांची लाडकी. जन्म म्यानमार येथे ५ डिसें. १९०५ रोजी झाला. तेथील नदीचे नाव तिला दिले गेले, इरावती. शालेय शिक्षणासाठी वयाच्या सातव्या वर्षी पुण्याला पाठवले. तिथे तिची परांजप्यांच्या मुलीशी मैत्री झाली. लहानशी इरावती एकटी घरच्यांपासून दूर राहते ही बाब परांजपे कुटुंबीयांना खटकत होती. त्यांनी तिला जणू दत्तक घेतल्यासारखेच आपल्याकडे राहायला ठेवून घेतले. परंतु तिच्या घरच्यांना विचारले पाहिजे, संमती घेतली पाहिजे म्हणून त्यांनी करमरकरांना, 'आपल्याकडे इरू सुरक्षित राहील. अभ्यास आणि घराचे वळण मिळेल यास्तव आमच्याकडे राहू द्यावे' अशी विनंती केली.

आप्पा परांजपे आणि अण्णा कर्वे दोघेही पुण्याचे महत्त्वाचे नागरिक, पण एकाचे मोठेपण लगेच जगजाहीर झाले तर दुसऱ्याने समाजाचा राग सोसून स्त्रियांसाठी काम केले, स्त्री शिक्षण, विधवाविवाह यांसारखे त्या काळी समाजाला ना पटणारे, परवडणारे विषय हाताळले. अशा दोन कुटुंबाशी इरावतीचे नाते जुळले होते. परांजपेअण्णांनी तिला आधार दिला तर दुसऱ्या अण्णाच्या मुलाशी तिने विवाह केला. करमरकरांची इच्छा होती आपल्या मुलीचे लग्न कुणा संस्थानिकाशी करून

द्यावे. पण इरावतीने अण्णा कर्व्यांच्या सुशिक्षित, सुस्वभावी उदारमतवादी दिनकर कर्वेशी लग्न करायचे मनोमन ठरवले होते. आई, भाऊ सगळेच इरावतीच्या विचारांशी सहमत होते. त्यांना दिनकर हा सुयोग्य पती वाटत होता. तिने लग्न करून घरात बसण्याऐवजी समाजशास्त्रात एमए करायचा विचार पक्का केला होता.

लग्न तर झाले, पण आपल्या पुढील शिक्षणाला माहेर आणि सासरचा विरोध होईल असे इरावतीला मुळीच वाटले नव्हते. वडिलांना (गणेश करमरकर) तिचे लग्न पसंत नव्हते तर सासऱ्यांना तिने पुण्यात राहून आपल्या कामात मदत करावी, संस्थेत काम करावे असे वाटे. सासूबाईंना विदेशी शिक्षणाला जाणे ही चैन वाटत होती. तिच्या बाजूने होता तिचा पती दिनकर, जो फर्ग्यूसन कॉलेजमध्ये प्राध्यापक होता आणि इरावतीच्या बुद्धिमत्तेला बर्लिनसारख्या ठिकाणी शिष्यवृत्ती मिळतेय ती तिने सोडू नये असे त्याला वाटले. तिला एकटीला पाठवायला तो तयार होता. वयाच्या २२व्या वर्षी इरावतीने बर्लिनला जाण्यासाठी बोटीत पाय ठेवला.

एका तरुण अननुभवी तरुणीने एकटीने जर्मनीत प्रवेश केला होता. बर्लिन शहर आधुनिक वाटत होते पण पहिल्या महायुद्धाने उद्ध्वस्त झालेला परिसर, गाव खेडीही नजरेला पडत होती. एकीकडे महान विद्वत्ता, वैज्ञानिक प्रगती, आधुनिक जीवनशैली तर दुसरीकडे तरुणांमधील नको इतके लैंगिक स्वातंत्र्य दिसत होते. दोन महायुद्धांच्या मधला काळ होता. जर्मन अहम दुखावला गेलेला होता. रस्त्यांवर जखमी लोक भीक मागताना दिसत होते. नाझीचा उदय दिसू लागला होता. तिच्या नवऱ्याने तिला जर्मन भाषा शिकवली होती त्यावर तिचा निभाव लागत होता. तेथील उन्हाळ्यात तिला फिरायला जाताना आपल्या पुण्यातील झाडापेडांची, पक्ष्यांची आठवण येऊन ती तिथल्या निसर्गाशी नाते जोडायचा प्रयत्न करत होती. तेथील एका जर्मन वयस्क स्त्रीने तिला वसतिगृहाऐवजी चांगल्या जर्मन घरात जेवणाची सोय करून दिली. तिला स्वतंत्र राहण्यासाठी व्यवस्था केली. तिच्या घरीही तिने इरावतीला अनेकदा बोलावले. तिला भारताची उत्तम माहिती होती. ती उच्चशिक्षित होती. तिने कॉलेजातील अनेकांशी इरावतीची ओळख करून दिली. तिच्याच घरी तिने मांसाहारी पदार्थ खाल्ल्याखेरीज त्या हवेत निभाव लागणार नाही हे पटवून दिले.

ह्याच दरम्यान तेथील ज्यू लोकांच्या विरोधात असलेल्या भावनांशी तिचा परिचय होत गेला. तिला हे सारे मुळीच आवडत नव्हते. परंतु हा आपला देश आणि आपली समस्या नाही, अशी मनाची समजूत घालून स्वस्थ बसणे योग्य ठरवले. मूळ अभ्यासाकडे लक्ष द्यायला आरंभ केला. तिला मानववंशशास्त्रातील एका सिद्धांतावर काम करायचे होते. त्यासाठी तिने १४९ प्रेतांचे निरीक्षण केले. त्यात गोरे आणि काळे दोन्ही वंशांच्या लोकांच्या कवट्या तिने अभ्यासल्या. पूर्व सिद्धांत होता की गोऱ्या लोकांच्या कवट्यांच्या विशिष्ट रचनेमुळे हे सिद्ध होते की ते लोक वांशिक दृष्ट्या अधिक बुद्धिमान आहेत. पण इरावतीने आपल्या संशोधनातून हा दावा खोटा आहे हे सिद्ध केले. आपल्या गुरूच्या दाव्याचा फोलपणा दाखवायचे धाडस तिने दाखवले. अर्थात पुढील काळात ते मान्य होऊन सिद्धही झाले.

हे तिचे निर्भय वागणे देशात परत आल्यावरही तिने दाखवले आहे. देशांतील अनेक आदिवासी भागांत ती एकटीने फिरली. तिथून आवश्यक ती माहिती तिने जमा केली आणि आपले संशोधन पुरे केले. त्यातून तिचे 'किंगशिप ऑर्गनायझेशन इन इंडिया' आणि 'हिंदू सोसायटी' हे दोन महत्त्वाचे ग्रंथ लिहिले गेले. जे आजही प्रमाण मानले जातात. पती दिनकर यांनीही जर्मनीत केमिस्ट्रीत पीएचडी केली होती. मात्र तिथली राजकीय आणि सामाजिक स्थिती बिघडत गेली म्हणून त्यांनीही आपल्या देशातच राहणे पसंत केले. इरावतीला इंग्लंड आणि अमेरिकन विद्यापीठांतून भाषणांसाठी जावे लागत असे; तेव्हा दिनकर घर आणि मुलांचा सांभाळ व्यवस्थित व आनंदाने करत असत. आपली बायको ही विद्वान आहे, तिला अनेक बाबतींत रस आहे, गती आहे, तिला देशपरदेशांत मान आहे याचा त्यांना किंचितही हेवा वाटत नसे. त्यांना तिचा अभिमानच होता.

ते स्वत: नास्तिक होते. त्यांना घरी गणपती बसवणे, आरत्या करणे, विसर्जनांसाठी गावभर ढोल बडवत जाणे शांततेचा भंग वाटे. त्यावर ते व्यक्तही होत असत. पण त्यांनी घरच्यांना त्यावर बंदी सुचवली नव्हती. सुट्यांमध्ये घरी मुलांचा पत्ते आणि इतर खेळांचा धुमाकूळ चाले. कर्वे यांच्या घरातली आणि परांजपे यांच्या घरातील पुढच्या पिढ्या हिरिरीने भाग घेत. कर्वे यांच्या घरातील तीन मुलांसह परांजपे घरातील सई त्यात सामील असे. भागीरथी आजी (करमरकर) मुलींना शिवण-टिपण, स्वयंपाक यायला हवा म्हणून सुट्टीत त्यांना एकत्र करत असे पण सर्वात धाकटी गौरी मात्र बागेत झाडावर चढून बसे. त्यांच्या हाती मुळीच लागत नसे.

आनंद आणि जाई इरावतीला तिच्या कामात मदत करायला नेहमी तयार असत. ती महाराष्ट्राच्या, कर्नाटकच्या किंवा कुर्गच्या आदिवासी भागात लोकांचा त्यांच्या अंगकाठीचा वा इतर सवयींचा अभ्यास करायला जात असे तेव्हा ते सारे टिपून घेण्यासाठी वह्या घेऊन आनंद जात असे. इरावती कर्वेंना मानववंशशास्त्र, समाजशास्त्र. दर्शनशास्त्र, तत्त्वज्ञान ह्या विद्यांत गती होती. त्यांनी समाजशास्त्र डॉ. घुर्येकडून ग्रहण केले. त्यांनी हे विषय कॉलेजमध्ये शिकवले. अनेक विद्यार्थ्यांना संशोधन करण्यास प्रवृत्त केले. त्यांच्या हाताखाली समाजशास्त्रात गती असलेले अनेक विद्यार्थी तयार झाले. त्यांच्या हिंदू परिवार संकल्पना, चितपावनांच्या, जातीपातीच्या वैशिष्ट्याच्या

अभ्यासासाठी अनेकांच्या भेटीगाठी घेऊन त्याचा डेटा तयार केला गेला. तिचे पती धार्मिक कर्मकांडात विश्वास ठेवत नसले तरी इरावतींना मात्र आपल्याकडील हजारोंना आकर्षित करणाऱ्या पंढरीच्या वारीचे आणि तेथील दैवत विठोबाचे खूप आकर्षण होते. त्यावर त्यांनी 'माय फ्रेंड विठोबा' हा सुरेख अभ्यासपूर्ण ललित लेख लिहिला होता. प्रत्येक बाबतीत संशोधनाने गोष्टी, प्रथा, परंपरा यांचे महत्त्व त्यांनी पडताळून पाहिले आणि सिद्ध केले. 'किनशीप ऑर्गनिझेशन इन इंडिया' या ग्रंथात त्यांनी देशाचे अभ्यासाच्या दृष्टीने चार भाग करून माहिती एकत्र केली. हिंदू समाजातील जातिव्यवस्थेचा आणि परिवारांतर्गत नातेसंबंध यावर लक्ष केंद्रित केले होते. 'हिंदू सोसायटी अँड इंटरप्रेटेशन' लिहिण्यासाठी आपल्या धर्मविषयक माहिती गोळा केली. त्याकरता तिने हिंदी, संस्कृत, मराठी, पाली भाषांचा अभ्यास करून, त्यातील पौराणिक कथांचे अध्ययन करून विविधतेतील एकसूत्रता दाखवून दिली आहे.

काही वर्षे तिने मुंबई महिला विद्यापीठात प्रशासक म्हणून व पुढे रीडर म्हणून काम केले. पुण्यात डेक्कन कॉलेजात दर्शनशास्त्र आणि अँथ्रोपोलॉजी हे विषय शिकवले. डॉ. घुर्ये यांची ही विद्वान विद्यार्थिनी तिच्या संशोधक वृत्तीने त्या अ‍ॅकेडेमिक जगात ओळखली जात होती. त्याचप्रमाणे अत्यंत रसाळ आणि लालित्य पूर्ण लेखनाने रसिक वाचकांनाही प्रिय झाली होती. आजही तिचे साहित्य, अकादमी पुरस्कारप्राप्त 'युगांत' हे पुस्तक रसिक वाचकांना भुरळ घालते. त्यात महाभारतातील पात्रांच्या वागण्याचे, त्यावेळचे सामाजिक, धार्मिक समज, श्रद्धांचे, कुटुंबातील स्त्रियांचे स्थान यावर लेखिका सडेतोड मते मांडते. त्यांच्या 'परिपूर्ती' या पुस्तकात त्या काळाच्या वर्तमानातील लोकांच्या वागण्याचे, घटनांचे परिवर्तन न केल्यास होणाऱ्या परिणामांचे चित्र त्या रेखाटतात. ज्या गोष्टी जगताना मनाला भिडतात, त्रास देतात त्यावर त्या मोकळेपणाने मत मांडतात. त्यातील अनेक बाबी इतका काळ लोटला तरी अजून तशाच आहेत. किंबहुना धार्मिक बाबत लोक अधिक कट्टरतेकडे चालले आहेत ही गोष्ट, त्यांच्या मनाला लागून राहते.

आपली संस्कृती, महाकाव्ये याबद्दल आदर आणि प्रेम असूनही त्यातील अन्यायकारक गोष्टींवर टीका करायला त्या मागेपुढे पाहत नसत. अनाथ बालिका आश्रमात मुली जेवायच्या वेळी सीताकांत स्मरण जयजय राम म्हणत ते तिला खटकत असे. निरपराध सीतेवर अन्याय करणाऱ्या रामाचे स्मरण अत्यावश्यक आहे असे त्या उपहासाने म्हणत. बिहारमध्ये फिरताना तिने एका मुलीला म्हणताना ऐकले, की सारी कामे करून नवऱ्याची वाट पाहण्यातच या बायकांचा जन्म जातो काय? त्या तरुणीला इरावती बाई म्हणाल्या, 'छे छे. असे व्हायच्या अगोदरच दुर्लक्ष केल्याने कुठला तरी आजार त्यांचा जीव घेईलच.' वास्तविक त्यांनी सारे जीवन प्रतिष्ठित वातावरणात घालवले. साऱ्या जगभर निर्भयपणे हिंडल्या. तरी एकदा वाटेने जाताना खेळणाऱ्या एका मुलाने दुसऱ्याला म्हटले 'अरे बघ बघ आपल्या वर्गातल्या कर्व्याची आई चालली आहे.' या वाक्याने सारे मिळूनही आता त्यांना जीवनाची परिपूर्ती झाल्यासारखे वाटले.

त्यांचे सारे जगणेच विद्याभ्यास, संशोधन, शिकवणे यात गेले. त्यांच्या लेखनाचे विषय पाहिले तरी थक्क व्हायला होते. घरातील महर्षींचा रोष पत्करूनही त्यांनी आपला विदेशी शिक्षणाला जायचा हट्ट सोडला नाही. अण्णा कर्वेंची सेवा मात्र वृद्धपणी केली. सासूबाई मात्र सुनेशी पटणार नाही हे जाणून आपल्या आश्रमात जाऊन राहिल्या. आपल्या हुशारीचा तिला रास्त अभिमान होता. मुळेबाळे, पती, घरसंसार सांभाळत ह्या विदुषीने सार्थ जीवन व्यतीत केले.

– संजीवनी खेर
sanjeevanikher@gmail.com

॥ग्रंथाली॥

राजीव श्रीखंडे यांची निवडक जागतिक अभिजात साहित्याची ओळख करून देणारी महत्त्वपूर्ण पुस्तके

ग्लोबल साहित्यसफर भाग १

मूल्य ५०० रुपये ● सवलतीत ३०० रुपये

ग्लोबल साहित्यसफर भाग २



मूल्य ५०० रुपये ● सवलतीत ३०० रुपये



अफजर

अफजर आहे
मुलायम
त्याच्या दाढीसारखा
आहे
अंतर्बाह्य लाघवी नि
मिठ्ठास आदबशीर
त्याच्या भाषेसारखाच

अफजर
सांगायचा
पहाडांवर बागडणाऱ्या
सूर्याच्या पहिल्या
किरणांविषयी बाळांसारख्या
बोलायचा तो
अब्बाअम्मीच्या
लालबुंद गालांसारख्या
सफरचंदांच्या बागांविषयी
भरघोस

अफजर
वाहायचा
खळाळत
राहायचा
नदीसारखा
पूर्वपश्चिमउत्तरदक्षिण
नि
मिठीच मारायचा
वेढून राहिलेल्या
समुद्रांना अवघ्या
आपसूकच

अफजर
बोलायचा
बोलतच राहायचा
डोंगरउतारांवरच्या
दर्गेमशिदीतालाब नि
अवकाशालाच
छिद्र पाडणाऱ्या
पहाडांवरच्या
शिवमंदिरांविषयी
काळालाच
भेदणाऱ्या
अलोट श्रद्धेनं

अफजर
आला असावा
बर्फाच्या प्रांतातून
थंडगार नि
निळ्या निळ्या
मनासारख्याच
त्याच्या

अफजर
भेटायचा मला
दंग्याच्या दिवसांत
अमानुष
अस्ताव्यस्त असायचे
माथ्यावरचे नि
दाढीचे केस
विदीर्ण मनासारखेच
त्याच्या
हलक्याच आवाजात सांगायचा
''जाना नहीं खतरे के एरियामे.
जल्दी घर आना. भटको मत.
आई वाट देखतीय तुम्हारी.''
(कुठला वाटायचा अफजरला
खतरे का एरिया?)

अफजर होता
मुलायम
लाघवी
नि
आदबशीर

कुठे
आहेस तू
अफजर ?

– नीलकंठ कदम
(९८३३२ १२४३७)



मुक्ती

हा मजकूर आहे
की तपशील
की संदर्भ
की तळटीपा

काहीतरी लिहिलंय
कुठल्यातरी भाषेत
कोणत्यातरी लिपीत
कसल्याशा कागदावर

ठाऊक नाहीय
हा
मजकूर
तपशील
संदर्भ
की
तळटीपा

आपण फक्त जोडत गेलो
आतल्या मौनाला शब्दांशी

ठाऊक नाहीय
हा
मजकूर
तपशील
संदर्भ
की तळटीपा

आपण तर फक्त सुटं सुटं करत गेलो
आतल्या मौनाला शब्दांपासून

ठाऊक नाहीय
हा मजकूर
तपशील
संदर्भ
की
तळटीपा

आपण तर फक्त मुक्त होत गेलो
शब्दांपासून
आणि
मौनापासूनही

– सुचिता खल्लाळ, नांदेड
(९४२३० ४४५००)

मुकेश थळी

जागतिक साहित्याची ओळख घडवणारं पुस्तक

गोव्यातील कुळागरातील झाडाच्या खाली मुळाकडे राहून फळं खुडल्यावर त्या पातळीवर दिसते ती जमीन. माती. भूमी. झाडाच्या फांदी फांदीवरून वर चढून शिखरावर गेल्यावर ऐसपैस क्षितिज दिसतं. आकाश, अंतरीक्ष दिसतं.

सांगण्याचं तात्पर्य म्हणजे ग्लोबल साहित्याची चव चाखल्याविना साहित्याचे सखोल मापदंड आपण जाणू शकत नाही. तो उच्च रस चाखू शकत नाही. जागतिक कादंबऱ्यांची जी वीण असते, जी बांधणी असते, जो आकृतिबंध असतो तो मोठ्या पटाचा असूनही बंदिस्त असतो व वाचकाला अवाक् करून सोडतो. अशा पुस्तकांचा विद्यार्थीपणाने अभ्यास म्हणजे व्यासंग.

हल्ली व्यासंग हा शब्द कुणाही अभ्यासकाचं वा विद्यावंताचं वर्णन वा ओळख करून देताना वापरला जातो. पुस्तकांची काही कपाटं वाचली म्हणून त्याला व्यासंग म्हणणं इष्ट होणार नाही. वाचलेल्या मजकुराविषयी अचाट स्मरणशक्ती हे कॉम्बिनेशन असेल तर काय होऊ शकतं? राजीव श्रीखंडे यांच्यासारखा अभिजात जागतिक पुस्तकांची व लेखकांची ओळख करून देणारा लेखक बनू शकतो. 'अभिजात साहित्याचं अक्षरविश्व', हे त्यांचं पुस्तक उत्तम आहे. मराठी साहित्यविश्वात मोलाची भर घालणारं आहे.

मुंबईचे इंजिनीयर राजीव श्रीखंडे हे व्यवस्थापन व्यावसायिक. ते व्यग्र असतात. देश-विदेशात कामानिमित्त, प्रकल्पांनिमित्त भ्रमंती. त्यांना पुस्तकं वाचायला मुळात इतका वेळ कधी मिळाला, मिळतो आणि वेळेचं व्यवस्थापन कसं जमतं ते एक कोडं आणि गूढ. श्रीखंडेंकडे विविध संस्कृतींमधील जगभरातील ९००० हून अधिक पुस्तकांचा संग्रह आहे. पुस्तकं ही त्यांची मित्रमंडळी. ग्रंथाली आयोजित यू ट्यूब चॅनेलवरील मासिक पॉडकास्ट 'ग्लोबल साहित्यसफर'चे ते होस्ट आहेत. 'शब्द रुची' या मासिकात श्रीखंडेंनी आंतरराष्ट्रीय पुस्तकांवर एक सदर लिहिलं. त्यांचं प्रस्तुत पुस्तक वाचून विचारधनाची श्रीमंती गवसावी इतकं ते सुरेख आहे.

यात अभिजात जागतिक साहित्याचे २२ लेखक आहेत. काही नोबेल पुरस्कारप्राप्त लेखकही आहेत. त्यांचा जीवनपट सांगताना श्रीखंडे रंगून जातात. १५३२ ते २००१ ह्या कालखंडातील हे लेखक आहेत. लेखकाचा जीवनपट ज्ञानकोशीय नोंदीप्रमाणे क्रमवार मांडून, ते त्याच्या एका कादंबरीचा आढावा तीन ते चार पानांत घेतात.

मी बुद्धिबळ खेळाडू. ड्रॉट म्हणजे कोंकणीत दामांनी हा खेळसुद्धा आम्ही बुद्धिबळाच्याच काळ्या-पांढऱ्या ६४ चौकोनांच्या पटावर खेळलो. श्रीखंडेंनी गो नावाच्या चीन-जपानमध्ये खेळल्या जाणाऱ्या बैठ्या खेळाची एका परिच्छेदात लघुत्वानं माहिती दिली आहे. गो खेळाचं अनेक वर्षं अजिंक्यपद भूषवलेला होनीबा सुशाई, त्याचा आव्हानवीर युवा खेळाडू ओटाके यांच्यामध्ये १९३८ साली झालेल्या दीर्घ लढतीची ही कहाणी आहे. कादंबरीचं नाव - 'द मास्टर ऑफ गो'. जपानी लेखक यासुनरी कावाबाटा यांना नोबेल पुरस्कार मिळाला होता, त्यांचा जीवनपट व कादंबरीच्या कथानकाचा सारांश श्रीखंडे कथारूपानं चार पानांत देतात.

लंडनस्थित इंग्लिश लेखक एन्थनी होप (जन्म १८६३) हे सिद्धहस्त लेखक. चर्चचे धर्मगुरू. वकिली करूनही ते आवडीमुळे लेखनात रमले. त्यांच्या 'प्रिझनर ऑफ झेंडा' या कादंबरीवर लेख आहे. होपची ही साहसकथा एका काल्पनिक देशात घडते. चित्तथराक प्रसंगांची मालिका गुंफून लेखकानं ती सुसूत्रपणे विणली आहे. लेखक श्रीखंडे आपल्याला आवडलेली वैशिष्ट्यं सांगतात. या छोटेखानी कथानकाची खुमासदार मांडणी राजीवजींना आकर्षित करते.

जगद्विख्यात हंगेरियन लेखक इमरे कर्टिझ यांचा जीवनपट व डिटेक्टिव स्टोरी या कादंबरीची ओळख श्रीखंडे करून देतात. कर्टिझचं लहानपण व नंतर युवावस्था किती खडतर व कठीण गेली त्या त्रासांचं वर्णन वाचताना डोळे पाणावतात. असं कुणालाही न होवो. पण त्या आगीतून फुलं फुलावीत

तशी त्याची प्रतिभा फुलत गेली. २००२ सालचं नोबेल पारितोषिक कर्टिझला मिळालं. फेटलेस, पाथसीकर व त्याच्या अन्य कादंबऱ्या जगप्रसिद्ध आहेत. हे छोटे नव्हे पण अनेक धागे व संदर्भ राजीवजी सोडून जातात. ते जजमेंटल होत नाहीत. मी जागतिक साहित्याचा नम्र उपासक व विद्यार्थी, असं ते प्रांजळपणे म्हणतात.

अती वाचनाचा एक विशिष्ट अहंकार काहींना जडतो. श्रीखंडेशी बोलताना मी भारतीय साहित्यातील हे हे वाचले नाहीत हे ते मान्य करतात. नाटकांविषयी सखोल माहिती नाही हे कबूल करतात. हा गोडवायुक्त विनयशील स्वभाव मोहक वाटतो.

या पुस्तकातील ओरहान पामुकवरील लेख अप्रतिम. नोबेल मिळवलेला तुर्की लेखक. 'द ब्लॅक बूक' या पामुकच्या पहिल्या कादंबरीने जागतिक साहित्यविश्वात खळबळ उडवून दिली. पामुकच्या 'माय नेम इज रेड' या कादंबरीची ओळख पुस्तकात दिली आहे. ४६ भाषांत पामुकची पुस्तकं भाषांतरीत झाली आहेत यावरून त्याची वाचकप्रियता दिसून येते. पामुकच्या रसपूर्ण, शैलीदार कथनशैलीमुळे कथानक उठावदार करण्यात त्याला यश येतं, असं श्रीखंडे लिहितात.

टॉलस्टॉयच्या 'काँदीद' पुस्तकावर चर्चा आहे. छानच. जगप्रसिद्ध आयरिश कादंबरीकार अब्राहम (ब्रॅम) स्टोकरच्या 'ड्रॅक्युला' कादंबरीवर राजीवजींनी लिहिलं आहे. भयकथेचं साहित्य किती प्रभावी असू शकतं त्याचा हा वस्तुपाठ, असं ते म्हणतात. हे वाक्य महत्त्वाचं आहे. मराठीत एके काळी भयकथांचा सुवर्णकाळ गाजला. त्यात मतकरी, धारप व इतरांनी बहुमुल्य योगदान दिलं. स्टोकरची भाषा थोडी जड वाटली तरी ती अत्यंत प्रभावी आहे. कथनशैली अतिशय ओघवती आहे, असं निरीक्षण श्रीखंडे करतात. 'ड्रॅक्युला'नं जागतिक कलासंस्कृतीत अढळपद मिळवलेलं आहे त्याचं विश्लेषण राजीव श्रीखंडे अतिशय मार्मिक शब्दांत केलं आहे.

लुईस कॅरॉलच्या 'एलीस इन वंडरलॅण्ड' या पुस्तकावर सुंदरच लिहिलं आहे. या पुस्तकानं त्या काळात जागतिक बालसाहित्याला एक प्रचंड झेप व नवी दिशा दिली. स्कूलमध्ये हे पुस्तक मी अनुवादित कोंकणीत व नंतर इंग्रजीत वाचल्याची आठवण झाली. जोनाथन स्विफ्ट व त्याच्या 'गलिवर्स ट्रॅव्हल्स'वर लेख आहे. ही दोन्ही पुस्तकं तशी जगभर गाजलेली व अनुवादित झालेली. पण लेखक आपल्या दृष्टिकोनातून त्यांच्याकडे निरखतात व आपलं कथन मांडतात.

जगप्रसिद्ध ब्राझिलियन लेखक होर्खे अमादू यांच्या 'कॅप्टन्स ऑफ द सँड्स' या पुस्तकाची ओळख लेखकानं केली आहे. होर्खेचा चुलतभाऊ गलिबर्टो हा लेखक, पत्रकार, राजकारणी होता. मावसबहीण पटकथालेखिका व अभिनेत्री होती अशी माहिती आहे. होर्खेवर संस्कारांची ही बरसात होती, हे श्रीखंडे दाखवून देतात. १८ वर्षांचा असताना हॉर्खेनं आपली पहिली कादंबरी प्रसिद्ध केली. दोन वर्षांनी त्यांची दुसरी कादंबरी प्रसिद्ध झाली. त्यांची कीर्ती वाढत गेली. तत्कालीन समाजजीवन आणि असुरक्षितता यांचं वर्णन काही उदाहरणांवरून ठळकपणे लक्षात येतं.

श्रीखंडेंचे लेख नीरस, बेचव, कंटाळवाणे, क्लिष्ट कुठंही वाटत नाहीत. बोजड, अवजड, असं काहीच नाही. राजीवजींची भाषा प्रवाही, धावती, सहज, सोपी, सुटसुटीत, व्यक्तिगत स्तरावर बोलल्यासारखी. ही शैली आपल्याला पकडून ठेवते. गुंतवून टाकते. हेच तर पुस्तकाचं यश असतं.

श्रीखंडेंचं पुस्तक जागतिक साहित्याची एक झलक देतं. स्पष्टता देतं. या पुस्तकातील पाश्चात्त्य लेखक, त्यांचं संक्षिप्त चरित्र, तत्कालीन राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक वातावरण यांची ओळख घडवतं. भारतीय साहित्य जागतिक साहित्याच्या तुलनेत कुठे आहे त्याचाही ठाव पुस्तकामुळे वाचकाला लागतो. कादंबरीचा पट किती व्यामिश्र व खोल असू शकतो त्याची उकल होते. कादंबरीची ताकद कुठल्या घटकात असते हे संपूर्ण पुस्तक वाचल्यावर दिसून येतं. एकेका कादंबरीचा सारांश वा सिनॉप्सिस वाचताना वाचकाला दृश्य प्रतिमांचा चित्रपट पाहिल्यासारखा वाटतो.

श्रीखंडेंनी शेकडो कादंबऱ्या वाचल्या आहेत. जागतिक साहित्यिक व त्यांची पुस्तकं या विषयावर येत्या काळात त्यांचे खंड प्रकाशित होणार आहेत. सुमारे १३६ लेखक त्यात समाविष्ट करण्याची महत्त्वाकांक्षा राजीवजींनी बाळगली आहे. हा प्रकल्प लेखकांना, अभ्यासकांना, विद्यार्थ्यांना, वाचकांना उपयुक्त ठरेल. 'ग्रंथाली'चं हे योगदान अमोल आहे.

अभिजात साहित्याचा परिचय करून देणारे श्रीखंडे यांचं हे कार्य स्तुत्य आहे. हा एक आरसा आहे. वाचकाला जागतिक साहित्याची तोंडओळख करून घ्यायला आणि कुठल्या साहित्यकृती वाचाव्यात ते ठरवायला व वाचनाची दिशा द्यायला एक दिशादर्शक कंपास आहे. लेखकांच्या इतर पुस्तकांचे उल्लेखही त्यात आहेत त्यावरून आपणाला ती पुस्तकं वाचण्याची प्रेरणा मिळते.

ग्रंथालीच्या या सुबक छपाईच्या पुस्तकाला कुमार केतकर यांची प्रस्तावना लाभली आहे. पुस्तक वाचून आपल्या जाणिवांच्या कक्षा रुंदावतील, असं केतकरांनी प्रस्तावनेत

म्हटलं आहे. मित्रहो, आपण हे पुस्तक वाचलं तर आपल्याही कक्षा विस्तारतील असं माझ्या अनुभवावरून सांगतो. मराठीत पुस्तकांविषयीची सुमारे ५० पुस्तकं आहेत. श्रीखंडे यांनी ते दालन श्रीमंत केलं आहे. सुबक फाँट, ओळीमधलं योग्य अंतर, कागद व सुंदर मुखपृष्ठ यामुळे ग्रंथालीचं हे पुस्तक संपत असलेल्या वर्षात वाचलेलं एक उत्कृष्ट पुस्तक असं मी म्हणेन.

राजीव श्रीखंडे हे मनमिळाऊ, नम्र, शालीन व्यक्तिमत्त्व. आई एलफिन्स्टनमधून इंग्रजी साहित्याची सुवर्णपदक मानकरी. बाबा, काका यांचा समृद्ध साहित्यिक वारसा, संस्कारिता.

या 'ग्लोबल साहित्यसफरी'ची फलश्रुती म्हणजे वाचकाला विनासायास कुठल्या जागतिक साहित्यकृती वाचाव्यात त्याविषयी थोडी सजगता व स्पष्टता येते. प्रत्येक लेखात मुख्य कादंबरी व लेखकाच्या इतर कलाकृतींची यादी आहे.

कल्पक नाटककाराला रूपांतरित करू शकू अशी नाटकांची बीजं कादंबरींच्या सारांशामध्ये मिळतील. फिल्मवाल्याला पटकथा व संवाद असलेली बीजं दिसतील.

वाचनाची आवड असलेल्या श्रीमंती गवसेल. राजीवजींच्या इतर खंडांची मालिका लवकर प्रकाशित होवो ही सदिच्छा.

– मुकेश थळी
anushanti561963@gmail.com

ग्रंथाली

वाचकदिनी प्रसिद्ध झाली...

मीरा कुलकर्णी लिखित
ग... गप्पांचा



मूल्य २०० रुपये • सवलतीत १२० रुपये

सुरेश वांदिले लिखित
बिब्लीओबिबुलीचा सापळा



मूल्य २०० रुपये • सवलतीत १२० रुपये

चित्रा नित्सुरे लिखित
समयकथा

मूल्य ३०० रुपये • सवलतीत १८० रुपये

धनराज खरटमल लिखित
खस्ता



मूल्य ४०० रुपये • सवलतीत २५० रुपये

ग्रंथालीचा ५१वा वाचकदिन ठाण्यात साजरा

'ग्रंथाली'चा वाचकदिन दरवर्षी मुंबईत साजरा होतो. या वर्षी 'ग्रंथाली'ने मुंबईत २५ डिसेंबर रोजी होणाऱ्या वाचकदिनासह मुंबईबाहेर ठाणे, वसई-विरार आणि वाशी येथील साहित्यप्रेमी संस्थाना अनुदान देऊन वाचकदिन करण्याचे योजले. त्यातील पहिला वाचकदिन २९ व ३० नोव्हेंबर २०२५ रोजी, मराठी ग्रंथसंग्रहालय, ठाणे यांच्या सहकार्याने पार पडला. २९ रोजी, 'मालिका-साहित्यकलेचा संगम' हा परिसंवाद आयोजित केला होता. ज्येष्ठ लेखिका रोहिणी निनावे आणि अभिनेत्री अश्विनी महांगडे यांनी या परिसंवादात भाग घेतला. लेखक मकरंद जोशी यांनी त्यांच्याशी संवाद साधला.

'मराठीच्या तुलनेत हिंदी मालिकांचा कॅनव्हास खूप मोठा असतो. त्यांचे बजेटही तितकेच मोठे असते. मात्र मराठी मालिकांचा आशय अधिक उजवा असतो. मराठी कलावंतांच्या अभिनय कौशल्याविषयी हिंदीत आदराने बोलले जाते', असे निरीक्षण परिसंवादात उपस्थित वक्त्यांनी नोंदवले.

दूरचित्रवाणीच्या विश्वातील मनोरंजनाचा मोठा भाग असलेल्या मालिकांविषयी परिसंवादात चर्चा करण्यात आली. 'मालिकालेखन अनेक टप्प्यांत करावे लागते. आधी कथा, मग महिन्याचे भाग, मग दोन, तीन, सहा महिन्यांचे भाग, त्यातील व्यक्तिरेखा, त्यांचे गुण-दोष, प्रत्येक भागाच्या अखेरीस असलेला उत्कर्षबिंदू अशा अनेक गोष्टींचा विचार मालिका लिहिताना करावा लागतो. पूर्वीच्या तुलनेत मालिका लेखनातील स्वातंत्र्य आता कमी झाले आहे,' असे मत रोहिणी निनावे यांनी मांडले.

'मालिकेत अभिनयाला निश्चितच वाव असतो. मालिकेतील व्यक्तिरेखा प्रेक्षकांना आवडतात. प्रेक्षक त्या व्यक्तिरेखांच्या प्रेमात असतात. अनेकदा मालिकेतील व्यक्तिरेखेने प्रभावित होऊन आपल्या आयुष्यातील महत्त्वाचे निर्णय घेतात, असे अश्विनी महांगडे यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वृंदा दाभोलकर यांनी केले.

लेखक मकरंद जोशी यांच्याशी संवाद साधताना ज्येष्ठ लेखिका रोहिणी निनावे आणि अभिनेत्री अश्विनी महांगडे.

यानंतर ज्येष्ठ गझलकार सदानंद डबीर यांच्या गझलांचा कार्यक्रम रंगला. त्यांच्या गझलांना चाल लावणारे संगीतकार विवेक काजरेकर यांनी काही गझला गाऊन सादर केल्या.

३० तारखेला साहित्यिक, संशोधक डॉ. सुनीलकुमार लवटे, किशोर बेडकिहाळ आणि रणधीर शिंदे यांनी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी आणि वि.स. खांडेकर यांच्या लेखन आणि विचार यावर चिंतनात्मक विश्लेषण केले. ''आधुनिक समाजात सांस्कृतिक आकलन आणि स्मरण कमी होत असल्याची खंत व्यक्त करत, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी आणि वि.स. खांडेकर यांच्या विचारांचे चिंतन होणे गरजेचे आहे. यासाठी आपण आपले पूर्वसंचित ह्रदयाने वाचण्यापेक्षा डोक्याने वाचायला पाहिजे,'' असे मत यावेळी डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी व्यक्त केले.

गझल सादर करताना सदानंद डबीर आणि संगीतकार विवेक काजरेकर

किशोर बेडकिहाळ

रणधीर शिंदे

डॉ. सुनीलकुमार लवटे

'माझ्या दृष्टीने तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी आणि वि.स. खांडेकर' या विषयावर डॉ. लवटे यांनी मार्गदर्शन केले. भारतातील सांस्कृतिक वैविध्याचा उल्लेख करत जगातील बहुतांश धर्मांना एकच धर्मग्रंथ, भाषा, एक माय, एक संस्कृती आहे असेदेखील त्यांनी सांगितले. रणधीर शिंदे यांनी वि. स. खांडेकर यांच्या साहित्याची चिकित्सक मांडणी केली. किशोर

बेडकिहाळ यांनी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे संशोधन, त्यांची तात्त्विक भूमिका, त्याचे आजच्या काळात गरजेचे असलेले भान याविषयी सविस्तर विवेचन केले.

यावेळी ग्रंथालीच्या नीलकंठ कदम यांचे 'पोटजाळ', डॉ. स्मिता दातार यांचे 'एक होती हिडिंबा' या दोन पुस्तकांचे आणि अनघा प्रकाशनच्या दोन पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. निर्मोही फडके यांनी केले.

❖

डॉ. स्मिता दातार लिखित 'एक होती हिडिंबा' या पुस्तकाचे प्रकाशन

नीलकंठ कदम यांच्या 'पोटजाळ' या कवितासंग्रहाचे प्रकाशन

अनघा प्रकाशनच्या दोन पुस्तकांचे प्रकाशन

पन्ना नायक यांच्या सुषमा शाळिग्राम अनुवादित 'गोष्ट नलिनभाईंची आणि इतरांची...' पुस्तकाचे प्रकाशन

ग्रंथालीचा ५१वा वाचकदिन वसई-विरारमध्ये संपन्न

ग्रंथालीच्या वाचकदिनच्या पहिल्या पुष्पात मळलेली पायवाट सोडून स्वतंत्र पायवाट निर्माण करणाऱ्या अपर्णा पाडगावकर, मकरंद सावंत, मंगेश सातपुते या तरुण ''अवलिया'' लेखक, दिग्दर्शकांशी संवाद साधताना अपर्णा पाडगावकर, मंगेश सातपुते, मकरंद सावंत या तरुण लेखक, दिग्दर्शकांशी संवाद साधताना सुप्रसिद्ध लेखिका वीणा गवाणकर म्हणाल्या, की दोन पिढ्यांमधील संवाद आज तुटत चालला आहे, जो या कार्यक्रमाच्या निमित्ताने साधता आला. वीणाताईंनी अतिशय आस्थेने विचारलेल्या प्रश्नांमधून मुलाखत अधिकाधिक रंगत गेली.

ग्रंथाली आणि कोकण मराठी साहित्य परिषद विरार शाखा व विवा महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार, ११ डिसेंबर रोजी नवीन विवा महाविद्यालयाच्या सेमिनार हॉलमध्ये ग्रंथालीचा ५१वा वाचकदिन उत्साहात पार पडला. कोकण मराठी साहित्य परिषदेचे अध्यक्ष अजीव पाटील व ग्रंथालीचे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर उपस्थित होते. यावेळी कोकण मराठी साहित्य परिषदेच्या केंद्रीय अध्यक्ष नमिता कीर अध्यक्षस्थानी होत्या, तर कोमसापचे पालघर जिल्हाध्यक्ष प्रवीण दवणे यांची विशेष उपस्थिती होती. या समारंभात ग्रंथालीद्वारा प्रकाशित स्टॅन्ली गोन्सालविस यांचे 'अबोलीचे बोल' हे पुस्तक, तर लेस्ली डायस यांचे 'साँग ऑफ इंडिया' या पुस्तकांचे प्रकाशन पार पडले. या कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात कोमसाप विरार शाखेच्या कोषाध्यक्षा सुरेखा कुरकुरे यांनी उपक्रमांची माहिती दिली. सुदेश हिंगलासपूरकर यांनी ग्रंथालीद्वारा आयोजित आतापर्यंतच्या वाचकदिनाचा प्रवास व भविष्यकालीन वाटचाल याबाबत मनोगत मांडले. विवा महाविद्यालयाच्या प्राचार्या दीपा वर्मा यांनी महाविद्यालय साहित्य व शिक्षण क्षेत्रातील विविध उपक्रमामध्ये आपल्यासोबत सदैव कार्यरत राहील असे सांगितले. स्टॅन्ली गोन्सालविस यांच्या कथांमधून इथल्या मातीचा गंध दरळवतो तर लेस्ली डायस यांच्या 'साँग ऑफ इंडिया' या पुस्तकामधून सबंध भारताचे चित्र पाहायला मिळते; तसेच, कोमसाप सदैव वाचन चळवळीत ग्रंथालीसोबत संयुक्तपणे कार्यरत राहील असे प्रतिपादन नमिता कीर यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतातून केले. ग्रंथालीच्या कार्यक्रम समन्वयक व कोमसाप विरार शाखेच्या कार्याध्यक्ष अश्विनी भोईर यांनी सुलेखनकार पद्मश्री अच्युत पालव यांची मुलाखत घेतली. त्यांच्या जीवनातील अनुभव त्यामधून उलगडत गेले. 'अक्षर' हे श्वास असून त्यामागील भाव वाचता आला पाहिजे', असे विधान पालव यांनी यावेळी बोलताना केले. आपले नानाविध अनुभव त्यांनी मनमोकळेपणाने ऐकवले. तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या भेटीचा प्रसंग असेल किंवा त्यांनी रशिया येथे केलेल्या सुलेखनातून त्यांना आलेला अनुभव असेल, ते अनुभव ऐकताना श्रोते मंत्रमुग्ध झाले होते. कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन कोमसाप विरार शाखेचे सदस्य व लेखक-कवी अमोल पाटील यांनी मानले. ग्रंथाली वॉच या यूट्यूब चॅनेलवर हा कार्यक्रम पाहता येईल.

❖

अच्युत पालव यांची मुलाखत घेताना अश्विनी भोईर

वीणा गवाणकर, अपर्णा पाडगावकर यांच्याशी संवाद साधताना सोबत अश्विनी भोईर, मकरंद सावंत आणि मंगेश सातपुते

लेस्ली डायस यांच्या 'साँग ऑफ इंडिया' पुस्तकाचे प्रकाशन

स्टॅन्ली गोन्सालविस लिखित 'अबोलीचे बोल' पुस्तकाचे प्रकाशन

‘चला, पुन्हा शाळेत जाऊ या’चे प्रकाशन

ग्रंथाली प्रकाशित, मोहन काळे लिखित, ‘चला, पुन्हा शाळेत जाऊ या’ या बालकुमार कवितासंग्रहाचे प्रकाशन १४ नोव्हेंबर या बालदिनाचे औचित्य साधून शालेय विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत झाले. ‘विविध ॲपचा प्रभाव असलेल्या डिजिटल युगात माणसे शब्दांपासून दूर जात आहेत. अशावेळी शब्दांचे हे आनंदी विभ्रम घेऊन मुलांना खेळते आणि बोलते करण्यासाठी मोहन काळे यांची कविता मराठी साहित्यात मोलाची भर घालते’, असे प्रतिपादन कवी अरुण म्हात्रे यांनीप्रकाशनावेळी बोलताना केले. अरुण म्हात्रे यांच्यासह कवी प्रसाद कुलकर्णी, संदेश ढगे, जिल्हा ग्रंथालय अधिकारी प्रशांत पाटील उपस्थित होते.

यावेळी ग्रंथालीचे सुदेश हिंगलासपूरकर यांनी बालवाचक चळवळीचे महत्त्व अधोरेखित केले. कवी मोहन काळे यांनी त्यांच्या काव्यलेखनाचा प्रवास विशद केला. कवी संदेश ढगे, प्रसाद कुलकर्णी यांनी काळे यांचे कौतुक केले. प्रसाद कुलकर्णी म्हणाले, बालवाचकांसाठी लिहिणे ही कठीण बाब आहे, ती मोहन काळे यांनी लीलया पेलली आहे. जिल्हा ग्रंथालय अधिकारी प्रशांत पाटील यांनी अशा पुस्तकातूनच वाचक चळवळ फोफावेल, असा आशावाद व्यक्त केला.

याप्रसंगी पुस्तकातील चित्रे रेखाटणारे पुंडलिक वझे आणि संग्रहाच्या शंभर प्रती घेणारे प्रवीण शिंदे, शशिकला येणपुरे यांचा सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन अश्विनी भोईर यांनी केले.

❖

॥ग्रंथाली॥

मोहन काळे यांचे गाजणारे बालकुमार कवितासंग्रह

एकदा आपणच व्हावे मोर



मूल्य १२५ रुपये ● सवलतीत ८० रुपये

चला, पुन्हा शाळेत जाऊ या!

मूल्य १५० रुपये ● सवलतीत १०० रुपये

गझलकार ज्योती बालिगा राव यांची मुलाखत

ज्योती बालिगा राव यांची मुलाखत घेताना अश्विनी भोईर

ग्रंथालीच्या वांद्रे बँडस्टँड येथील प्रतिभांगणमध्ये १९ सप्टेंबर २०२५ रोजी 'साहित्यव्रती' या अभिनव साहित्यिक उपक्रमाच्या आरंभाच्या कार्यक्रमात ज्येष्ठ गझलकार ज्योती बालिगा-राव यांची मुलाखत अश्विनी भोईर यांनी घेतली. आजही स्वतःतील निरागसत्व जपलेलं ज्योतीताईंचं व्यक्तिमत्त्व प्रतिभेच्या अंगणात पाहताना आनंद वाटला,

मुलाखत रंगत गेली. मुलाखतकार अश्विनी भोईर यांनी मार्मिक प्रश्न विचारले. उदा. – 'गझल तंत्रप्रधान काव्यप्रकार आहे, रचनेत तंत्राचा अतिरेक होत असेल तर कवीनं काय करावं?' ताईंनीही उत्तरादाखल कवीच्या स्वायत्ततेला, रचनेच्या आशयाच्या खोलीला अधिक महत्त्व दिलं. एकूण मुलाखतीमध्ये मुख्यत्वे ताईंच्या मनोगताचा प्रवाह अश्विनींनी वाहता ठेवला. ज्योतीताईंच्या कविता आणि गझला यांच्या उत्स्फूर्त सादरीकरणाला प्राधान्य दिलं. त्या सर्वच रचना साध्या आणि मनाचा ठाव घेणाऱ्या होत्या. तरीही त्यांत कुशल रचनावैशिष्ट्यं होती, नकळत झालेले प्रयोग होते. विशेष म्हणजे त्यांना स्वतःच्या सर्व रचना मुखोद्गत होत्या. समकालीन इतरही काही त्यांना आवडलेल्या रचनांचा त्यांनी तितक्याच आत्मीयतेनं उल्लेख केला.

ज्योतीताईंच्या कित्येक गीतांचं आकाशवाणीवरही प्रसारण झालेलं आहे. यातली काही चांगली लोकप्रिय मराठी गाणी कालप्रवाहात गहाळ झालेली आहेत. ताईंनीही यातलं अट्टहासानं काहीही जपून ठेवलेलं नाही. त्यांचा हस्तलिखितांचा संग्रहही कुठल्यातरी स्थलांतरात गायब झाला आहे, पण कमाल म्हणावी अशी बाईंची स्मरणशक्ती! त्या स्मरणातून त्यांनी कित्येक गझला, शेर, काही कविता, काही लावण्या हे सगळं उद्धृत केलं. वयाच्या पंचाहत्तरीतील त्यांचं हे कसब आश्चर्यचकित करणारं होतं, मन प्रसन्न करणारं होतं.

ताईंनी काही मतं मुलाखतीच्या ओघात विशेषत्वानं मांडली. एवढ्या प्रदीर्घ लेखनकाळात त्यांचा एकच कवितासंग्रह का निघाला या प्रश्नावर ताई म्हणाल्या की स्वखर्चानं कवितासंग्रह काढणं मला पटत नाही. हा एकच संग्रह एका प्रकाशकानं स्वतःहून प्रकाशित केला आहे म्हणून मी तो निघू दिला. पुस्तकं कोण वाचतं? असा प्रश्न आजच्या काळात आहे. तसंच स्वखर्चानं गाण्यांची निर्मिती करणंही त्यांना अजिबात पटत नाही. हे सगळं ऐकताना खेदही वाटला की कविता आणि गाणी या हौसेपोटी स्वखर्चानं करण्याच्या गोष्टी मराठी सारस्वताच्या जगात झालेल्या आहेत, इतकं त्यांचं अवमूल्यन झालेलं आहे.

ताईंच्या रचनांना अनेक चांगल्या संगीतकारांनी संगीतबद्ध केलेलं आहे, त्यांच्यामध्ये यशवंत देव, अरुण दाते, माधव भागवत अशी मोठी नावं आहेत. यूट्यूबवर या रचना सहज सापडता, असेही त्या म्हणाल्या. कविश्रेष्ठ सुरेश भटांशी तर ताईंचा लेखनकाळातील उमलत्या वयापासून अनुबंध जुळलेला आहे आणि त्या सगळ्या आठवणी त्या रंगवून सांगितल्या. सुरेश भटांनी महाराष्ट्रात गझल विकसित करताना स्वतःमधला श्रेष्ठ गीतकार गमावला असं प्रामाणिक मत त्यांनी मांडलं.

ज्योती बालिगा राव यांची मुलाखत ऐकून कुठल्याच शर्यतीत नसलेल्या आणि आपल्याच आनंदात विलसलेल्या अशा एका दिलखुलास प्रतिभेचा परिचय झाला. संपूर्ण मुलाखत ग्रंथाली प्रतिभांगण या युट्यूब चॅनेलवर पाहता येईल.

– भारती बिर्जे डिग्गीकर

कवयित्री व लेखिका डॉ. मीनाक्षी पाटील यांच्याशी संवाद

डॉ. मीनाक्षी पाटील आणि अश्विनी भोईर

ग्रंथालीच्या बँडस्टँड वांद्रे येथील प्रतिभांगणमध्ये दिनांक २७ सप्टेंबर २०२५ रोजी 'साहित्यव्रती' या 'साहित्य क्षेत्रातील महिलांचे योगदान' या विषयावरील साहित्यिक उपक्रमाच्या दुसऱ्या भागात महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या सचिव आणि कवयित्री-लेखिका डॉ. मीनाक्षी पाटील यांची मुलाखत अश्विनी भोईर यांनी घेतली.

डॉ. मीनाक्षी पाटील हे मराठी साहित्य क्षेत्रातल्या एका चतुरस्र अशा प्रतिभेचं नाव आहे. डॉ. मीनाक्षी कवयित्री, समीक्षक, चित्रकार, तत्त्वचिंतक- ललितलेखक तर आहेत. त्यांची संपूर्ण शैक्षणिक कारकीर्द अव्वल दर्जाची आहे आणि अजूनही त्यांच्यातलं मूल आणि विद्यार्थीपण त्यांनी गमावलेलं नाही. या सर्वच महत्त्वाच्या पैलूंवर मुलाखतकार अश्विनी भोईर यांनी मीनाक्षींना क्रमशः बोलतं केलं. त्यांच्या कवितासंग्रहांच्या विचक्षण नावांबद्दल ('इज इट इन युवर डीएनए' आणि 'ललद्द्दस ललबाय') त्यांना प्रश्न विचारले. यातून या शीर्षकांचा छान उलगडा झाला. त्यांच्या उत्तराधुनिक मराठी साहित्याच्या पीएचडी प्रबंधावर त्यांना बोलतं केलं. या संवादातून त्यांची समकालीन महत्त्वाच्या तरीही उपेक्षित राहिलेल्या १९९०च्या दशकातील उत्तराधुनिक कवितेबद्दलची कळकळ प्रकट झाली.

मुलाखत ऐकताना जाणवलं की मीनाक्षी यांचं आयुष्य हीच सौंदर्यानुभवाच्या कुतूहलपूर्ण अभ्यासाची आणि त्या अभ्यासातल्या आनंदाची अशी एक मालिका आहे. यातल्या प्रत्येक प्रतिक्षेत्रात त्यांनी स्वतःचा ठसा उमटवला आहे. गेल्या पिढीतल्या कविवर्य दिलीप पुरुषोत्तम चित्रेंसारखी त्यांना कलेच्या सर्व क्षेत्रांत मुशाफिरी करण्याची खूप असोशी आहे आणि प्रत्येकच प्रवासातल्या वैयर्थाचीही ओळख आहे.

'मेल
फिमेल
लेस्बियन
गे
बायसेक्शुअल
ट्रांसजेंडर
क्विअर
दगडधोंडेमाती
सारे चराचर
केवढी ही दुःखाची गलबतं
प्रत्येकासाठीच गलबलून येतं
हजारो वर्षांचा थकवा
वाहतोय साऱ्यांच्या धमन्यांतून
हरवलीय झोप युगायुगांपासून
खूप खूप गरज आहे एका शांत झोपेची
कदाचित एखादं सुंदर स्वप्न तरी पडेल
किंवा खडखडीत जाग तरी येईल कायमची!'
(ललद्यदस ललबाय) -

अतिशय चिंतनशील कविता त्यांनी कार्यक्रमाच्या अखेरीस सादर केली. सतत अंतर्मुख आणि अस्वस्थ असलेला मीनाक्षींमधला कलाकार त्यांना निरनिराळ्या प्रकारे सत्त्वाचा शोध घ्यायला लावतो आणि त्यांना विनम्र आणि प्रश्नांकित ठेवतो. त्यांच्याकडून मराठी साहित्याला अजून खूप काही मिळण्यासारखं आहे.

संपूर्ण मुलाखत ग्रंथाली प्रतिभांगण यूट्यूब चॅनेलवर पाहता येईल.

- भारती बिर्जे डिग्गीकर

कवयित्री, लेखिका व संशोधक डॉ. सिसिलिया कार्व्हालो यांची मुलाखत

डॉ. सिसिलिया कार्व्हालो यांच्याशी संवाद साधताना अश्विनी भोईर

दिनांक ४ नोव्हेंबर २०२५ रोजी ग्रंथालीप्रतिभांगणच्या वांद्रे येथील वास्तूत 'साहित्यव्रती' या मालिकेचं तिसरं पुष्प गुंफलं गेलं.

या कार्यक्रमात सुप्रसिद्ध कवयित्री, लेखिका आणि संशोधिका डॉ. सिसिलिया कार्व्हालो यांची मुलाखत अश्विनी भोईर यांनी घेतली. कार्यक्रमात येणाऱ्या लेखिकांच्या व्यक्तिमत्त्व-वैविध्यामुळे मालिका अधिकाधिक वैचित्र्यपूर्ण आणि आनंददायी होत असल्याचं जाणवलं.

डॉ. सिसिलिया कार्व्हालो हे तसं मराठी साहित्यक्षेत्रातलं सर्वपरिचित नाव आहे. त्यांची आतापर्यंत कविता, ललितबंध, संशोधनात्मक अशी पंचेचाळीस पुस्तकं प्रकाशित झालेली आहेत. अनेक मानाची पदं, माध्यमिक शैक्षणिक महामंडळांची, साहित्यसंमेलनांची अध्यक्षपदं त्यांनी भूषवली आहेत. वसई येथे राहणाऱ्या सिसिलिया प्राचार्यपद भूषवलेल्या प्राध्यापिका आणि संशोधिका आहेत.

मुलाखतीत डॉ. सिसिलिया यांच्या विविध पैलूंचा उलगडा होत गेला. शिक्षणक्षेत्रातील करिअरच्या अगदी सुरुवातीच्या टप्प्यातच त्यांना बोलीभाषेच्या समृद्ध योगदानाची जाणीव झाल्यामुळे त्या दिशेने त्यांनी विशेष अभ्यास व सखोल संशोधन केले.

ख्रिस्तीधर्मीय मराठी साहित्यिकांवर त्यांचे 'प्रसादचिन्हे' हे ग्रंथालीने प्रकाशित केलेले आकर्षक पुस्तक म्हणजे एक छोटेसे ग्रंथदालनच आहे. त्यात अगदी मध्ययुगीन सतराव्या शतकातील फादर स्टीफन्सपासून आजवरच्या अडीचशे ख्रिस्ती साहित्यिकांचा समग्र धांडोळा घेण्याचे मोठे काम सिसिलिया कार्व्हालो यांनी केले आहे. साहित्याला धर्म नसतो अशी त्यांची पक्की धारणा आहे जी त्यांनी मुलाखतीत वारंवार बोलून दाखवली. विशुद्ध साहित्याचेच निकष लावून त्यांनी यातील ख्रिस्ती साहित्यिकांची निवड करून हे ख्रिस्ती मराठी साहित्यिकांचे तारांगण मराठी वाचकांसाठी खुले केले आहे.

लोकसाहित्य काय किंवा ख्रिस्ती साहित्य काय या प्रकारच्या सर्वच धारा प्रमाण-अभिजात मराठीच्या मुख्य धारेला अधिक विस्तृत करणाऱ्या आणि समृद्ध करणाऱ्या अशाच आहेत याची जाणीव डॉ. सिसिलिया कार्व्हालो यांचे विचार, अनुभव ऐकताना सतत होत राहिली. धर्माच्या पलीकडे जाणारे सांस्कृतिक संचित खोलवर झिरपत राहिले. लोकसाहित्यातल्या आदिबंधांमध्ये गुंफले गेलेले विभिन्न धर्मीय पण समानार्थी अनुबंध त्यांनी कविमनाने उकलून दाखवले.

मुलाखतीत त्यांना त्यांच्या साहित्यिक कारकिर्दीच्या महत्त्वाच्या वळणांवर बोलते करण्याचे काम अश्विनी भोईर यांनी आत्मीयतेने आणि सजगतेने केले, कारण अश्विनी या त्यांच्या शिष्यासुद्धा आहेत. त्यामुळे हा संपूर्ण संवाद एका आंतरिक जिव्हाळ्याच्या, सौहार्दाच्या आणि आदराच्या धाग्याने गुंफला गेला.

कार्यक्रमाच्या शेवटी, लोकवाङ्मय, लोकसाहित्य याच्या अभ्यासातून अधिक परिपक्व झालेली डॉ. सिसिलिया कार्व्हालो यांची काव्यजाणीव त्यांच्या कविताविषयक चिंतनातून आणि एका छोट्याशा कवितेच्या अभिवाचनातून अनुभवायला मिळाली, जिच्यात प्रेम नावाचे मृगजळ शोधत निबिड जीवनारण्यात हरवणाऱ्या मुलींचे शोकमय चित्रण होते.

डॉ. सिसिलिया कार्व्हालो यांनी खरोखरच एखाद्या प्रदीर्घ व्रतासारखे साहित्याचे अध्ययन आणि अध्यापन अंगिकारले आहे. याही अर्थाने 'साहित्यव्रती' मालिकेत त्यांची उपस्थिती आशयगर्भ वाटली. संपूर्ण मुलाखत लवकरच ग्रंथाली प्रतिभांगण यूट्यूब चॅनेलवर पाहता येईल.

– भारती बिर्जे डिग्गीकर

संदीप नेमळेकर यांच्याशी संवाद

ग्रंथाली-प्रतिभांगण आयोजित 'काहीतरी विशेष' कार्यक्रमाच्या सोळाव्या भागात, १० नोव्हेंबर २०२५ रोजी दीप अर्चन धर्मादाय न्यासाचे विश्वस्त प्रा. डॉ. संदीप नेमळेकर यांनी 'समस्या, समाधान, सक्षमते'साठी या विषयावर मार्गदर्शन केले. सुधा हुजूरबाजार तुंबे यांनी डॉ. नेमळेकर यांची मुलाखत घेतली. नेमळेकर यांचं शालेय शिक्षण वसईतील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये झालं तर अकरावी-बारावीचं शिक्षण रुईया महाविद्यालयात झालं. ते डिप्लोमा इंजिनीअर होते. प्रोडक्शन इंजिनीअरिंग आणि नंतर चार्टर इंजिनीअरिंग देखील केलं. नोकरी करता करता शिक्षण घेतलं. जन्म वसईतील. एका चाळीत वास्तव्य. मोठ्या भावामुळे वाचनाची आवड निर्माण झाली. जे मराठी साहित्य त्यांनी वाचलं, त्याचा उपयोग त्यांना व्यावसायिक जीवनात झाला, असं त्यांनी सांगितलं. 'बदल घडवण्यासाठी 'एक माणूस पुरेसा आहे.' परफॉर्मन्स नसेल/नाही म्हणून काढलं जायचं. राजीनामा मेलवर पाठवला. डायरेक्टरनी माझं बोलणं गांभीर्यानं घेतलं आणि ही पॉलिसी रद्द केली. ते म्हणाले, 'काही करण्यामागचा हेतू विशुद्ध असावा, कोणताही स्वार्थ नसावा म्हणजे हा बदल घडतो. प्रत्येकात सामर्थ्य आहे, फक्त त्याची जाणीव करून देणं आवश्यक आहे. जो जीवनाची लढाई हरला आहे, जो आत्महत्या करतो त्याच्यासाठी काम करायचं मी ठरवलं. हे काम करताना लक्षात आलं, आपण लोकांपर्यंत गेलं पाहिजे, लोक आपल्यापर्यंत येणार नाहीत. आत्महत्या प्रतिबंध या विषयावर काम करताना लक्षात आलं की शेवटचं टोक गाठण्यापूर्वीच कुठेतरी अडवलं पाहिजे. चेतना इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटचा फॉर्म भरला. आणि मुलाखतीत निवडलो गेलो. पहिलं काम करायचं आणि मग संस्था रजिस्टर करायची ठरलं. नशाबंदी मंडळाच्या कार्यक्रमांना जायचो, तेव्हा त्यांनी विचारलं, की लिहाल का? दारू पिणं, व्यसन करणं यावर अधिकाधिक बोललं गेलं पाहिजे पाहिजे.

❖

संदीप नेमळेकर यांची मुलाखत घेताना सुधा हुजूरबाजार-तुंबे

ग्रंथपान

चांगदेव काळे
९८६९२०७४०३

शेतकऱ्यांचा राजा : श्री छत्रपती शिवाजी महाराज
रवींद्र छोटू पाटील



इतिहास जाणावा नव्याने

'सदैव चंद्रासारखी विकसित होत जाणारी ही शिवमुद्रा विश्वाला वंद्य आणि लोककल्याणकारी ठरो. या मुद्रेत स्वराज्याचा उदात्त व भव्य दृष्टिकोन दिसतो. राज्याचा विस्तार होत राहावा. ही मुद्रा शहाजीराजांकडूनच तयार झाली. त्यात महाराष्ट्राची मर्यादा नाही. त्यात संत ज्ञानेश्वरांच्या पसायदानातील विश्व दिसते. विश्व व लोककल्याण हे दोन शब्द वापरल्याने जात, पंथ, धर्माच्या पलीकडील विशालता दिसते. या घोषणेवरून स्वराज्याची दिशा व हेतू समजतो. या मुद्रेत भव्यदिव्य मनाचे स्वप्न अंतःर्भूत होते.'

श्री छत्रपती शिवाजीमहाराज यांच्याविषयी सातत्याने लेखन होत आहे. नवनवीन शोध आणि नवनवीन दृष्टिकोन समोर ठेवून महाराजांच्या अलौकिक अशा दृष्टिकोनाचा, साहसाचा, उदात्ततेचा, पराक्रमाचा, मुत्सद्दीपणाचा, शोध घेताना रयतेचा राजा हे बिरुद विसरता येत नाही. महाराजांनी हे श्रींचे राज्य व्हावे हा ध्यास अखेरपर्यंत जपला. यात शेतकरी हा घटक होता आणि त्यामुळेच महाराज शेतकऱ्यांचा राजा होते, असे रवींद्र पाटील आपल्या या ग्रंथात स्पष्ट करतात. रवींद्र पाटील यांनी केलेला शोध आणि मांडलेली मते यांचा हा ग्रंथ होय.

श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे कार्य, कर्तृत्व आणि व्यक्तित्व उभे करताना अनेक ग्रंथ खर्ची पडलेले आहेत. रवींद्र पाटील हे शेतकरी हा एक घटक समोर ठेवून महाराजांच्या कार्याचा, कर्तृत्वाचा आणि व्यक्तित्वाचा एक एक पैलू उलगडून दाखवत आहेत. परंतु तेवढेच नाही तर महाराजांचा एकूण जीवनआलेख त्यांनी समोर ठेवलेला आहे. यात महाराजांनी घेतलेले निर्णय, वेळोवेळी करावा लागलेला संघर्ष आणि त्यातून काढलेला मार्ग यांचा तपशील शोधताना रवींद्र पाटील त्या त्या घटनांच्या / प्रसंगाच्या थेट मुळाशी जाऊन शोध घेतात. यासाठी ज्या संदर्भांचा त्यांनी उपयोग केलेला आहे त्यांची नोंद त्याच ठिकाणी त्यांनी दर्शवलेली आहे. त्यांच्या या शोधामुळे अनेक संदर्भ नुसते नव्याने आले आहेत असे नाही, तर त्या त्या प्रसंगाला उठाव देण्यासाठी त्यांचा समर्पक असावा उपयोग केलेला दिसून येतो. शाहिस्तेखानाचा पराभव, अफजलखानाचा वध, पुरंदराचा तह, आग्र्याहून सुटका, हे अगदी मोजके प्रसंग आपण समोर ठेवून या ग्रंथाचा सारांश पाहिला तर आपल्या लक्षात येईल, की रवींद्र पाटील यांनी महाराजांच्या व्यक्तित्वाचा आणि कर्तृत्वाचा शोध किती समर्पकपणे या ग्रंथातून सादर केलेला आहे. यात कुठेही भाबडेपणा नाही की अंधभक्ती नाही. जे आहे ते स्पष्टपणे मांडण्याची परखड शैली दिसून येते.

महाराजांचे एकूण चरित्र आणि कर्तृत्व कुठल्याही एका ग्रंथात साकार होईल इतके लहान नक्कीच नाही. अशावेळी लेखकाला अनेक मर्यादांचे भान ठेवावे लागते. ग्रंथाची मांडणी, विषयाची मांडणी आणि आपली मते यांना विभागणी करून सुटसुटीत पणे सादर करावे लागते. यात नेमकेपणा साधण्याचा हा यथोचित असा भान राखणारा जाणकार प्रकार होय. तो रवींद्र पाटील यांनी राखलेला आहे. या ग्रंथाची मांडणी करताना त्यांनी चार भागांत विभागणी केलेली आहे. प्रत्येक भागासाठी समर्पक असे शीर्षक दिलेले आहे. आणि प्रत्येक भागात स्वतंत्र अशी प्रकरणे आहेत. प्रकरणांची मांडणी करतानादेखील प्रत्येक परिच्छेद स्वतंत्र राहील आणि नेमकेपणाने तो स्पष्ट होईल यासाठी त्यांना उपअंक दिलेले आहेत. तसेच उपशीर्षकांना मोठ्या ठळक टाइपात छापलेले आहे. ज्या मुद्द्यांवर आपला लेखनाचा भर आहे त्यांना देखील अशाच ठळकपणे छापलेले आहे. आवश्यक तेथे संदर्भ म्हणून नोंद व्हावी यासाठी चौकटीत नोंदी दिलेल्या आहेत. या प्रकरणांची यथोचित सिद्धता साध्य व्हावी यासाठी त्यांनी यात नकाशांच्या रेखाटणांचाही उपयोग केलेला आहे.

ऐतिहासिक लेखन करताना अनेक संदर्भांचा उपयोग करावा लागतो. अशा ज्या संदर्भांचा त्यांनी आधार घेतलेला आहे त्यांची सूची शेवटी दिलेली आहे. ती थक्क करणारी आहे. प्रत्येक घटनेच्या नोंदी साठी सनावळीची योजना केलेली आहे. घटनाक्रमाचा तक्ता जोडलेला आहे तो तारीख व सनानुसार आहे. त्यामुळेच सिद्ध झालेला ग्रंथ हा जरी शेतकऱ्यांचा राजा इतकाच मर्यादित आहे असे वाटत असेल तरी ते पुरेसे नाही. महाराजांचा समग्र इतिहास संक्षिप्तपणे आपणाला येथे अभ्यासता येतो.

त्यामुळे एक अभ्यासनीय असा ग्रंथ सिद्ध झालेला आहे. कोणाही अभ्यासकाला उपयुक्त ठरावा इतके त्याचे संदर्भ मूल्य आहे. आणि तेच प्राचार्य दत्ता पवार यांनी त्यांच्या प्रस्तावनेत नमूद केलेले आहे. या ग्रंथाचे मुखपृष्ठ सतीश भावसार यांनी सजविलेले आहे.

मूल्य ६०० रुपये । सवलतीत ३६० रुपये

ग्रंथपान

भौगोलिक सहली
संकलक – रवींद्र छोटू पाटील

सहल समजून घेताना

‘माझी संस्कृती झाडावर आधारलेली आहे. ती झाडे तोडलीत म्हणजे आम्हाला तोडलंत. आमच्यासाठी एवढंच करा, आमचं एकही झाड तोडू नका. आमची जमीन विकत घेऊ नका. आमची जमीन विकत घेता म्हणजे नक्की काय विकत घेता? त्या जमिनीवर अव्यहात वाहणाऱ्या नद्यांतील पाणी, पाण्यातील मासे विकत घेता? त्या माशांची किंमत कशी काढलीत? त्या जमिनीवर कोसळणारा पाऊस, फळांच्या फुलांच्या वनस्पती, प्रचंड वृक्ष, गाणारे पक्षी, रंगीत फुलपाखरे, वाहणारे सुखद वारे, यांची किंमत किती झाली? आणि केवढ्या वर्षांची? आणि हो, आमच्या पूर्वजांच्या जपलेल्या आठवणींच्या स्मशानाची किंमत केवढी?’

सहल म्हटली की, आनंद. घर सोडून मोकळ्या जागेत, जगात, निसर्गात जाणे. मनमुराद भटकणे, पाहणे, निरीक्षण करणे, फोटो काढणे आणि धमाल! ही आपला सहली विषयीची सुखद कल्पना. परंतु आणखी एक सहल आहे जी आपल्याला निसर्गाकडे घेऊन जाते; तिचे नाव आहे भौगोलिक सहल. या सहलीत नेहमीच्या सहलीपेक्षा वेगळा विचार अपेक्षित आहे. पर्यावरणाच्या दृष्टीने देखील महत्त्वाचा ठरतो. म्हणून लेखकाने त्याचे विवेचन करताना स्पष्ट केले आहे की हे पर्यावरण दोन टप्प्याचे असते. एक आहे नैसर्गिक पर्यावरण; ज्योत जमीन, हवामान, पाणी, वनस्पती या चार घटकांचा समावेश होतो. आणि सांस्कृतिक पर्यावरण; यात लोकवस्ती, वाहतूक–दळणवळण, व्यवसाय–उद्योगधंदे, अन्न– वस्त्र–निवारा, या चार घटकांचा समावेश होतो. या दोन्ही पर्यावरणासाठी व्याकरणीय भाषेत कारण आणि कार्य अशा संज्ञा वापरलेल्या आहेत. ही सहल म्हणजे भूगोलात आपण जे शिकतो त्याचा प्रत्यक्ष सहवास आणि अनुभव घेणे. हा अनुभव कोणत्या पातळीवर आणि कसा घेता येतो याचे वर्णन या पुस्तकाच्या पहिल्या प्रकरणात केलेले आहे. यासाठी मुंबईचे उपनगर भाईंदर– उत्तनच्या सहलीचे वर्णन संदर्भ म्हणून दिलेले आहे. प्रवास, प्रत्यक्ष ठिकाण, जमिनीचा वापर, जमिनीचा प्रकार, झाडे, दीपगृह, डोंगर, भूशिरावरील घरे, मासेमारी, भरतीओहोटी, साधने, असा तपशील ते अभ्यास म्हणून समोर ठेवतात.

सहलीत छायाचित्रण हा खूप आवडीचा विषय आहे. परंतु छायाचित्रण करताना आपल्याला नेमके कुठले छायाचित्रे घ्यायचे आहे आणि त्यासाठी कोणती काळजी घ्यायला हवी हे महत्त्वाचे ठरते. भौगोलिक सहलीत स्वतःच्या छायाचित्रणापेक्षा आपण जो निसर्ग पाहतो आहोत त्याचे चित्र अपेक्षित आहे. ते कसे असावे याचे तज्ज्ञ मार्गदर्शन दुसऱ्या प्रकरणात केलेले आहे.

आपल्याला लाभलेला सागरी किनारा आणि डोंगरदऱ्यांचे सौंदर्य हे नैसर्गिक वरदान होय. हा भूभाग व समुद्री भाग गड किल्ल्यांनी सजलेला आहे. गडकिल्ले पाहणे म्हणजे केवळ ऐतिहासिक स्थळाला भेट देणे इतकेच नव्हे हे लेखक आवर्जून सांगतात. किल्ला पाहताना तो कसा पाहावा, तो ज्या ठिकाणी उभारलेला आहे तेथील जमीन, खडक, पाण्याची सोय, हे फार महत्त्वाचे ठरते. तरच किल्ल्याची वैशिष्ट्ये आणि त्या मागील हेतू स्पष्ट होतो. यासाठी लेखकाने मुंबईत असलेल्या किल्ल्याचे उदाहरण आपल्यासमोर ठेवलेले आहे. यातच छत्रपती शिवाजीमहाराज यांनी जमिनीच्या ठरवलेल्या १२ प्रती कोणत्या, व त्यांची मोजण्याची पद्धती यांचाही संदर्भ दिलेला आहे. गडाची रचना व बांधणी, भूगोलाच्या दृष्टीने किल्ल्याकडे कसे पाहावे, त्यांची संपूर्ण यादी, ही माहिती खूप उपयुक्त आहे.

प्रकरण सात मध्ये अरुणाचल आसाम व मेघालय येथील सहलीचे वर्णन दिलेले आहे. त्यासाठी त्यांनी पत्र या माध्यमाचा उपयोग केलेला आहे. ते वर्णन वाचल्यानंतर आपल्यालाही तो भाग पाहण्याची इच्छा नक्कीच होईल. त्याचप्रमाणे राजस्थानाचा सहलीचा अनुभव देखील तितकाच उत्कट आहे.

रवींद्र पाटील यांनी भौगोलिक सहलीचे महत्त्व विशद करताना केवळ ठिकाणांची वर्णने केलेली नाहीत व तेथील केवळ वैशिष्ट्ये सांगून मनोरंजनदेखील केलेले नाही; तर एक जाणीव आपल्यात निर्माण केलेली आहे ती डोळसपणे निसर्गाकडे पाहण्याची. सहलीविषयी प्रत्यक्ष अनुभवावर आधारित दहा प्रकरणे यात आहेत. रवींद्र पाटील, विद्याधर अमृते, मिलिंद जोशी यांच्या लेखांचा हा संग्रह आहे. यातच शशिकांत जुन्नरकर सर यांच्या लेखाचा समावेश असून त्याचे शब्दांकन सविता दामले यांनी केलेले आहे. हे सर्वच लेख अभ्यासनीय आहेत तसेच सहलीचे उत्तम मार्गदर्शन करणारे आहेत. त्यामुळे शाळा–कॉलेज यांना हे पुस्तक उपयुक्त तर ठरेलच, सहल म्हणून जाणाऱ्या प्रत्येकासाठी उपयुक्त ठरावे असे हे पुस्तक आहे.

या पुस्तकाचे संकलन रवींद्र पाटील यांनी केलेले असून ते ‘मुंबई भूगोल अभ्यास प्राध्यापक मंडळ’ याचे कार्यवाह आहेत. छबीलदास हायस्कूल दादर, मुंबई येथे त्यांनी अध्यापनाचे काम केलेले असून त्यांची अनेक पुस्तके प्रकाशित आहेत. या पुस्तकातील छायाचित्रे व रेखाटने रवींद्र पाटील यांची आहेत मुखपृष्ठ सतीश भावसार यांनी सजवलेले आहे.

मूल्य २५० रुपये । सवलतीत १५० रुपये

ग्रंथपान

माझी बिरादरी : क्रांती शाह

शब्दांकन : सुमेध वडावाला



एका संघटनेचा सुनियोजित प्रवास

युवक बिरादरी हे नाव केवळ महाराष्ट्रातच सगळ्यांना माहिती आहे असं नाही तर संपूर्ण भारतात ओळखली जाणारी ही युवकांची संस्था होय.

युवक बिरादरीचे संस्थापक क्रांती शाह हे होत. घरची सुसंपन्नता असलेले क्रांती शाह हे युवक संघटन आणि सामाजिक जाणिवांमुळे एका वेगळ्याच चळवळीत झेपावले आणि त्यांची झेप कॉलेजपासून देशपातळीपर्यंत विस्तारत गेली.

'स्टुडन्ट कौन्सिल' या नावाने तरुणांचा एक समूह समाजोपयोगी ठरणाऱ्या कार्यात सहभागी झाला तो विशेषतः १९७२ च्या दुष्काळाच्या काळात. त्या दुष्काळाने माणूस, त्याची जगण्याची धडपड, आणि त्याला हवी असणारी मदत यांची प्रकर्षाने जाणीव झाली. त्यानंतर किल्लारीला झालेला भूकंप! येथेही अनेक स्तरावर मदतीची आवश्यकता होती. या मदतीसाठी जो तरुणांचा समूह सहभागी झाला तो युवक बिरादरी हाच होय. या दोन घटना समाजाकडे पाहण्याच्या नजरेला अंतर्मुख करणाऱ्या ठरल्या. विद्यार्थी/तरुण युवक-युवती यांना घेऊन त्यांना संस्कारक्षम बनवणे, त्यांच्या कलागुणांना वाव देणे, त्यांच्यावर उत्तम संस्कार करणे, यासाठी स्थापन झालेली संस्था म्हणजे स्टुडन्ट कौन्सिल! युवा उत्सव, शिबिरे, व्याख्याने, छावणी, श्रमदान, यातून उद्दिष्ट प्राप्ती करायची हा हेतू. परंतु पुढे अनेक विषय येत गेले अनेकांचे मार्गदर्शन मिळाले सूचना आल्या आणि त्यातून एक मोठी चळवळ उभी राहिली. तिचे नाव युवक बिरादरी!

युवक बिरादरीची रीतसर स्थापना झाली ती ९ ऑगस्ट १९७४ रोजी. या संस्थेचे 'बिरादरी' असे जे नामकरण झाले ते मात्र सुप्रसिद्ध गुजराती ही कवी उमाशंकर जोशी यांच्या संकल्पनेतून. १९४२ सालात ब्रिटिशांच्या विरोधात केलेल्या आंदोलनानंतर जे सर्व स्वातंत्र्यसैनिक एकत्रितपणे तुरुंगात होते त्या सगळ्यांचा जो समूह होता त्याला बिरादरी असे नामकरण होते तेच नाव या समूहाला देण्यात आले.

युवक बिरादरी ही युवकांची आहे हे मान्यच परंतु ती जात, धर्म, पंथ, लिंग, भाषा, भौगोलिक मर्यादा, या भेदांच्या पलीकडे आहे. जी देश, मानवसमूह, शांतता, बंधुता आणि एकता, संस्कृती, संस्कार यांच्याशी नाते सांगणारी आहे. युवक बिरादरी ही युवकांची आहे आणि ती युवकांसाठीच काम करील असे मात्र झाले नाही. युवक बिरादरीने काय काय केले आणि कसे कसे केले, याचा इतिहास पाहिला तर असे लक्षात येते की राजकारणविरहित केवळ समाज आणि देशकल्याण यासाठीच या संघटनेचा जन्म झालेला आहे. भाऊसाहेब नेवाळकर यांनी ठेवलेल्या प्रस्तावानुसार, युवक बिरादरी लोकप्रबोधन करेल. एकात्म भारतासाठी राष्ट्रीय पातळीवर अभियान राबवेल. जनसामान्यांवर लोकशाही मार्गाचे राष्ट्रीय संस्कार करेल. हा प्रस्ताव म्हणजे युवक बरादरीची कार्य/उद्दिष्टे स्पष्ट करणारी व्याख्याच ठरली.

युवकांना वेगवेगळ्या संस्कृतींचे आकलन व्हावे यासाठी त्यांची वेगवेगळ्या राज्यांमध्ये आदानप्रदान योजना करून परस्परसंस्कृतींचा परिचय करून देणे, हा उपक्रम वडवला होता. याच जोडीला विविध कारणांच्या निमित्ताने केलेली अभियाने सुद्धा तितकीच महत्त्वाची ठरलेली आहेत. जसे की, जोडो भारत, शाहूभूमी ते दीक्षाभूमी, ऑगस्ट क्रांती से साबरमती, ऑगस्ट क्रांती से सेवाग्राम, सेवाग्राम ते दांडी, साबरमती से ब्रह्मपुत्रा, वसुंधरा बचावअंतर्गत मांडवी आणि यमुना यांना जोडणारे गोवा ते दिल्ली अभियान, अशा विविध अभियांनातून भारत जोडण्याचे मोठे उद्दिष्ट पार पाडले. या अभियानांतून सामाजिक जागृती, मूल्यसंस्कार, ग्रामविकास, स्वच्छता, स्वदेशी, पाणी वाचवा, स्त्रियांचा सन्मान, कुटुंबव्यवस्था बळकट करणे, या व अशा विविध उपक्रमांत अग्रेसर राहून युवक बिरादरीने आपला खारीचा वाटा उचललेला आहे.

या सगळ्या चळवळीच्या प्रवासात क्रांती शहा यांच्या वैयक्तिक आयुष्याविषयीदेखील तपशील आहे.

'माझी बिरादरी' हे पुस्तक म्हणजे युवक बिरादरी या संस्थेचा आणि तिला दिशा देणाऱ्या क्रांती शाह यांचा चरित्रात्मक आलेख होय. कुठलेही कार्य अभियान व उपक्रम हाती घेतल्यानंतर तो जसजसा प्रवास करत जातो तसा त्यात आलेला अनुभवांचा तपशील कसा असावा याचे उत्तम उदाहरण म्हणजे 'माझे बिरादरी' हे पुस्तक होय.

या पुस्तकाचे शब्दांकन केले आहे ते सुप्रसिद्ध सिद्धहस्त साहित्यिक सुमेध वडावाला यांनी. या पुस्तकात काही छायाचित्रांचा समावेश करण्यात आलेला आहे. कुमार केतकर यांची सुंदर प्रस्तावना लाभलेली आहे. क्रांती शाह यांनी थोडक्यात आपले मनोगत ही व्यक्त केलेले आहे. हेमंत जोशी यांनी या पुस्तकाचे मुखपृष्ठ साकारलेले आहे.

मूल्य ४०० रुपये । सवलतीत २४० रुपये

ग्रंथपान

अभिजात साहित्याचे अक्षरविश्व!
(परिचय वेचक जागतिक पुस्तकांचा – १५३२ ते २००१)
राजीव श्रीखंडे



शीर्षकात सार्थकता असलेला ग्रंथ

जागतिक स्तरावर अत्युच्च दर्जाच्या साहित्यकृती निर्माण झालेल्या आहेत. कुठल्या, कशा, कोणत्या या वैशिष्ट्यांसह त्या आपल्याला कळतात त्या वाचकाच्या सहज ओझरत्या गप्पांमधून, त्यांच्या झालेल्या अनुवादामुळे अथवा त्यावर आधारित आलेल्या नाटक–सिनेमामुळे. परंतु ते तेवढेच. नुसती साहित्यकृती कळली आणि ती वाचायची उत्सुकता निर्माण झाली, असे उत्सुकता असणाऱ्यांच्या बाबतीत घडतेही. परंतु ती साहित्यकृती, जिने अक्षरविश्वामध्ये स्वतःचे आढळ स्थान निर्माण केलेले आहे; तिची वैशिष्ट्ये, तिच्यात असलेला वेगळेपणा, भाषाशैली, मांडणी, धाटणी, परिणाम यासह कोणी दृष्टीस आणून दिले, तर ही उत्सुकता अधिक वृद्धिंगत होऊ शकते. त्याही पलीकडे जर त्या साहित्यकृतीचा लेखक, त्याचे वैयक्तिक जीवन, त्याचा एकूण साहित्यप्रवास, त्याची स्वतःची मानसिकता, लेखनाकडे पाहण्याचा त्याचा दृष्टिकोन, त्यातून तो दाखवू पाहत असलेली वैशिष्ट्ये, त्याने जे जग उभे केलेले आहे ते आणि तो स्वतः जगला ते जग, त्याचे अनुभव, असा समग्र पट एकत्रित स्वरूपात निदर्शनास आला तर ही उत्सुकता न राहता वाचक थेट त्या साहित्यकृतीला जाऊन भिडतो. हे शक्य आहे का, तर हो, असे याचे उत्तर आहे. त्यासाठी संदर्भ आहे 'अभिजात साहित्याचे अक्षरविश्व!' हा ग्रंथ आणि या ग्रंथाचे लेखक राजीव श्रीखंडे! हा ग्रंथ खरोखरच अभिजात साहित्याचे अक्षरविश्वच आहे. याची दोन कारणे, एक जागतिक स्तरावरील (ज्याला ग्लोबल असे म्हणता येईल.) आयर्लंड, पॅरिस, अमेरिकन, स्कॉटिश, इंग्लिश, नार्वेजियन अशा अनेक पाश्चात्त्य देशांतील लेखकांनी लिहिलेल्या या अभिजात साहित्यकृती आहेत. आणि दुसरे कारण म्हणजे त्या अभिजातच आहेत, सर्वांगीण वांङ्मयीन दृष्ट्या अजरामर ठरलेल्या आहेत. राजीव श्रीखंडे यांच्या मते 'क्लासिक म्हणजे कालप्रवाहात तेवढ्याच ताकदीने टिकून राहणारी कलाकृती, जिच्यावर काळाच्या चढ–उतारांचा फारसा परिणाम होत नाही, तिची योग्यता कमी होत नाही, जी कालातीत आहे.' निकोलो मॅकेव्हेली, डॅनियल डेफो, जोनाथन स्विफ्ट, व्हॉल्टेअर, अँथनी होप, जे.बी. प्रिस्टले, ओरहान पामुक, अशा एकूण २२ लेखक व त्यांच्या साहित्यकृती, यांचा परिचय थोडक्यात तरी नेमकेपणाने करून देणाऱ्या लेखांचा हा ग्रंथ आहे. या लेखांमधून जे दर्शन घडते त्यात लेखक म्हणून राजीव श्रीखंडे यांचा व्यासंगही ठळकपणे दिसून येतो. हा व्यासंग रसिकता दाखवतो आणि त्या जोडीला आस्वादकतादेखील. त्यामुळे प्रत्येक साहित्यकृती, तिची भाषाशैली, तिच्या कथानकाची वैशिष्ट्ये, तिचे कथनतंत्र कसे आहे, ती जागतिक स्तरावर अजरामर का ठरली, याचे विश्लेषण ते करतात तेव्हा हे लक्षात येते. हे विश्लेषण कुठलेही भलावण करणारे नाही, हे लक्षात घ्यायला हवे. एक साहित्यकृती आणि तो लेखक यांच्यावर लिहिताना त्यांनी इतर संदर्भांचे तपशील दिलेले आहेत, ते वाचताना आपण थक्क होतो. विखारी विडंबनाची एक उत्कृष्ट कलाकृती म्हणून जग–मान्यता मिळालेली 'गलिव्हर्स ट्रॅव्हल्स' ही एक असामान्य कादंबरी आहे. (लेखक : जोनाथन स्विफ्ट) जगातली पहिली बेस्ट सेलिंग कादंबरी म्हणून ओळखली जाणारी 'अंकल टॉम्स केबिन' ही एका तऱ्हेने निषेध (Protest) साहित्याची पहिली कलाकृती आहे. (लेखक : हॅरिएट बीचर स्टोव्ह) 'द स्ट्रेंज केस ऑफ डॉ. जॅकिल अँड मिस्टर हाइड' या लघुकादंबरीचे नाव इतके चर्चेत आहे, की अजूनही दुहेरी व्यक्तिमत्त्वाबद्दल बोलताना सगळे जग या कादंबरीचा संदर्भ देते. (लेखक : रॉबर्ट लुई स्टीव्हनसन) हॅगार्डने हरवलेल्या संस्कृतीचा आणि अज्ञात जगाचा मागोवा घेणारा एक नवाच वांङ्मय प्रकार साहित्यात आणला. (शी : हेन्री रायडर हॅगार्ड) अशा प्रत्येक साहित्यकृतीविषयी त्यांनी केलेले विश्लेषण आहे. ह्याच जोडीला या साहित्यकृतींचा अनुवाद ज्यांनी मराठीत केलेला आहे त्यांचेही संदर्भ येथे दिलेले आहेत.'द स्ट्रेंज केस ऑफ डॉक्टर जेकील अँड मिस्टर हाइड' चा अनुवाद नारायण धारप यांनी 'द्वैत' या नावाने केलेला आहे. 'ॲलीस इन वंडरलैंड'चा अनुवाद भा.रा. भागवत यांनी 'जाईची नवलकहाणी' या नावाने मराठीत केलेला आहे. या ग्रंथाला सुप्रसिद्ध साहित्यिक कुमार केतकर यांची प्रस्तावना लाभलेली आहे. ते लिहितात राजीव श्रीखंडे हे एक अतिशय चोखंदळ जिज्ञासू आणि बहुश्रुत असे व्यक्तिमत्त्व आहे पाश्चात्य वाङ्मयाचा अभ्यास आणि प्रवास यांचा आवाका इतका प्रचंड आहे की त्यांच्याकडून विविध ग्रंथांबद्दल व वा लेखकाबद्दल ऐकताना आपलीच दमछाक होते. परंतु आपल्याला ते कधीही रसहीन वा कंटाळवाणे वाटत नाही. कुमार केतकर म्हणतात त्याप्रमाणे खरोखरच एक मोठे व्यावसायिक असूनदेखील त्यांचा वाचनाचा आणि अभ्यासाचा आवाका प्रचंड आहे. त्यांच्या या व्यासंगाचा पुरेपूर प्रत्यय 'ग्रंथाली'च्या 'शब्द रुची' या मासिकातील 'ग्लोबल साहित्य परिचय' सदरातून आलेला आहे. या ग्रंथाला हेमंत जोशी यांचे मुखपृष्ठ लाभलेले आहे त्याविषयी राजू श्रीखंडे लिहितात, साहित्याच्या अफाट विश्वातील काही चांदण्या मी वेचण्याचा प्रयत्न केला आहे, ते मुखपृष्ठावर नेमकेपणे हेमंत जोशी यांनी दाखवलेले आहे. सदरचा ग्रंथ हा जिज्ञासू आणि रसिक वाचकांसाठी संदर्भग्रंथ मानायला हवा. ग्लोबल साहित्यात रुची असणाऱ्या प्रत्येकाने आपल्या संग्रही ठेवावा असा हा संदर्भग्रंथ आहे.

मूल्य ३५० रुपये । सवलतीत २१० रुपये

मुंबई जिल्हा साहित्य संमेलन.... क्षणचित्रे



RNI No. MAHMAR/2013/50137
Published on 10th of Every Month.
Postal Registration No. MCW/310/2022-2024
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th & 11th of Every Month.

मुद्रक, प्रकाशक, संपादक : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.